**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेसंबंधी आम्ही नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधी जी सूचना दिलेली आहे त्यासंबंधी मी बोलण्यासाठी उभा आहे.

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. सर्वश्री विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, मधुकर चव्हाण, अरविंद सावंत, संजय केळकर, ॲड.अनिल परब, रामनाथ मोते, परशुराम उपरकर यांनी एक सूचना दिलेली असून दुसरी सूचना सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, कपिल पाटील यांनी दिलेली आहे. दोन्ही सूचनांचा विषय एकच आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गेल्या वर्षी कोकणामध्ये अतिवृष्टी झाली होती. यावर्षी सुरुवातीला खूप पाऊस झाला. त्यामुळे कोकणातील शेतकऱ्यांची अपेक्षा होती की, आंबा पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात झाले तर पावसामुळे जे घराचे व शेतीचे नुकसान झाले ते काही प्रमाणात भरुन निघेल. परंतु पाऊस लांबला, थंडीचे प्रमाण कमी झाले, दव पडले, पुन्हा पाऊस झाला. यामुळे आंब्याच्या झाडांना आलेला मोहर पूर्णपणे गळून पडला व फळधारणा कमी झाली. दरवर्षी साधारणपणे 800 कोटी रुपयांचे आंबा पिकापासून उत्पन्न मिळते. यंदा आंब्याचे फक्त 25 टक्के पीक बाजारामध्ये आले आहे. मार्च महिन्यामध्ये जी आवक बाजारामध्ये दिसते ती एप्रिलचा दुसरा आठवडा संपत आला तरी तितकी आवक दिसून येत नाही. सर्वसाधारण लोकांना असे वाटते की, एकदा आंब्याचे कलम लावले की, 5 वर्षानंतर दरवर्षी फळधारणा होऊन भरघोस उत्पन्न मिळते. परंतु कोकणातील शेतकऱ्यांना या कलमांची जपणूक करावी लागते. दरवर्षी खत घालावे लागते, फवारणी करावी लागते आणि ही मेहनत कोकणातील शेतकरी करीत असतो. यासाठी शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज घ्यावे लागते. पश्चिम महाराष्ट्रातील नेत्यांचे म्हणणे आहे की, कोकणातील शेतकरी आंब्याचे पीक घेतात आणि इतर वेळेस आरामात बसून असतात. परंतु ही वास्तविकता नाही. कोकणामध्ये सिंचनाची व्यवस्था नाही, सुविधा नाही. कोरडवाहू जमीन आहे. आज शासनाच्या मंत्रिमंडळामध्ये कोकणातील मातब्बर मंत्री आहेत. सभागृहात उपस्थित असलेले सन्माननीय सर्वश्री गणेश नाईक, सुनील तटकरे, रविशेठ पाटील हे मंत्री कोकण भागातील आहेत. आज आंबा पिकाचे उत्पादन घटले आहे, कोकणातील शेतकरी हवालदिल झाले आहेत. असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

13-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) A.2

SGB/ MHM/ SBT/ 11:00

श्री.विनोद तावडे........

असताना शासनाकडून या संदर्भात जी अपेक्षा होती ती पूर्ण झालेली नाही. ऊसाचे अतिरिक्त उत्पादन झाल्याबद्दल शासनाने काल जी आर्थिक मदत जाहीर केली त्याला आमचा विरोध नाही. परंतु कोकणामध्ये आंब्याचे उत्पादन कमी झाले आहे. आंबा परदेशात पाठवून राज्याला जे परकीय चलनातून उत्पन्न मिळते त्या आंबा पिकाला शासनाकडून अद्याप कोणत्याही प्रकारची मदत जाहीर झालेली नाही. शासनाकडून एकरी 50 हजार रुपये आर्थिक मदत दिली गेली पाहिजे अशी आमची मागणी आहे. कोकणातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाचा हा विषय असल्यामुळे या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणण्यासाठी नियम 289 अन्वये आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा आणि या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी मी विनंती करतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य विनोद तावडे, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी नियम 289 अन्वये आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रस्ताव दिलेला आहे. प्रश्नोत्तराचा तास रद्द करुन आंबा उत्पादक शेतक-याच्या संदर्भात या सदनात चर्चा घडवून आणावी व शासनाने आंबा उत्पादक शेतक-यांना न्याय मिळवून द्यावा यासंदर्भात हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. आंबा उत्पादक शेतक-यांवर सातत्याने अन्याय होत आहे. शेतकरी कोठलाही असला तरी तो शेवटी शेतकरीच असतो. मराठवाडयातील शेतकरी असो, विदर्भातील शेतकरी असो किंवा कोकणातील शेतकरी असो तो सारखाच असतो. कोठलाही शेतकरी म्हटला की, शेतकरी हा शेतकरीच असतो. सभापती महोदय, हापूस आंब्याला फळांचा राजा म्हटले जाते. परंतु आज हापूस आंब्याचे उत्पादन करणा-या शेतक-यावरच अन्याय होत आहे. आंबा पिकविणा-या किंग मेकरवरच आज अन्याय होत आहे. कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी भिकारीच राहिलेला आहे. आंब्याच्या प्रत्येक झाडामागे शेवटच्या सहा महिन्यात 200 रुपये खर्च येत असतो तसेच आंब्याचा झाडावर सहा हजार रुपयांपेक्षा जास्त खर्च येत असतो. आंबा हे नाशवंत पीक आहे. दव जरी पडले तरी आंब्यांचा मोहर गळून जातो, आंब्यावर खार पडली तरी मोहर गळतो. अशा पध्दतीने आंबा मार्केट मध्ये जरी आला तरी त्याला भाव मिळत नाही. यावर्षी 25 टक्के सुध्दा आंब्याचे पीक आलेले नाही. आतापर्यंत आंब्याच्या संदर्भातील व्हेपर सिस्टीम बंद होती ती व्हेपर सिस्टीम काल परवा सुरु झालेली आहे. ज्यावेळेस युती शासन होते त्यावेळेस आंब्याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. युती शासनाने आंबा उत्पादक शेतक-यांना 10 हजार रुपये हेक्टरी नुकसान भरपाई दिली होती. आज आंबा उत्पादक शेतकरी संकटात सापडलेला असल्यामुळे आंबा उत्पादक शेतक-याला हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई शासनाने द्यावी अशी माझी मागणी आहे. त्यामुळे या सभागृहात नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा व्हावी अशी माझी मागणी आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, आंबा हे भारताला परकीय चलन मिळवून देणारे पीक आहे. आंबा हे कोकणातील प्रमुख फळ आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी म्हटल्या प्रमाणे आंब्याच्या प्रती झाडाला 6 हजार रुपये खर्च येत असतो. युतीचे शासन होते तेव्हा युती शासनाने आंबा उत्पादक शेतक-यांना हेक्टरी 10 हजार रुपये नुकसान

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर.......

भरपाई दिली होती. आता महागाई वाढलेली आहे तसेच औषधांचा आणि इतर खर्च वाढल्यामुळे आंबा उत्पादक शेतक-यांना शासनाने प्रती हेक्टरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. अवेळी पाऊस पडल्यामुळे यावर्षी आंब्याचे पीक 20-25 टक्के सुध्दा आलेले नाही. कोकणामध्ये आंब्याबरोबर जांभळाचे पीक सुध्दा घेतले जाते. मार्च महिन्यामध्ये जांभूळ येण्यास सुरुवात होत असते. जांभळाचा आयुर्वेदिक औषधामध्ये उपयोग केला जात असतो. जांभूळ हे डायबेटीजच्या रुग्णांसाठी गुणकारी औषध आहे. यावर्षी जांभळाचे पीक सुध्दा फार कमी प्रमाणात आल्यामुळे जांभूळ उत्पादक शेतक-याचे नुकसान झालेले आहे त्यामुळे आंब्या बरोबरच जांभळासाठीही शासनाने नुकसान भरपाई द्यावी अशी माझी माननीय मंत्रीमहोदयांनी विनंती आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. मागील काही दिवसापूर्वी कोकणाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा सुरु होती त्यावेळेस "कोकणातील आंबा जगात गेला पाहिजे व जगातील पर्यटक कोकणात आले पाहिजेत" असे विचार मी प्रकट केले होते. वातावरणातील बदलामुळे आंब्याचा पहिला मोहर गळून गेला व दुसरा मोहर आला तो सुध्दा वांझ निघाला त्यामुळे आंब्याचे पीक फार कमी प्रमाणात आलेले आहे. 15 ते 20 टक्के सुध्दा यावर्षी आंब्याचे पीक आलेले नाही. वातावरणात बदल झाल्यामुळे आंब्यावर वेगवेगळे रोग पडतात व त्यामुळे फळ धारणा होत नाही. त्यामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकरी अतिशय त्रस्त झालेले आहेत. आंबा उत्पादक शेतक-यांने आंबा पिकावर खूप मोठया प्रमाणात खर्च केलेला आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर..........

एका झाडाला किमान हजार रुपये खर्च येतो आणि साधारणत: 1400 ते 1500 रुपये उत्पन्न मिळते. या वर्षी आंब्याचा मोहर गळून पडल्यामुळे कोकणातील शेतकरी विवंचनेत आहेत. त्यांच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर आहे. त्यांना यातून बाहेर काढले पाहिजे. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगिल्याप्रमाणे कोकणातील शेतकऱ्यांना एकरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई दिली पाहिजे अशी माझी सुध्दा मागणी आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, कोकणात आंब्याचे साधारणत: 800 ते 900 कोटी रुपयांचे उत्पादन होते. या वर्षी आंब्याचा मोहर गळून पडल्यामुळे हे प्रमाण 25 टक्क्यांनी घटलेले आहे. त्यामुळे या वर्षी आंब्याचे फक्त 200 ते 250 कोटी रुपयांचे उत्पादन झालेले आहे. आंब्याचा मोहर गळून पडल्यामुळे आंबा बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तेव्हा त्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने ठामपणे निर्णय घेणे आवश्यक आहे. या अधिवेशनातच आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची घोषणा शासनाने केली पाहिजे.

सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतकऱ्यांना एकरी नुकसान भरपाई देण्यापेक्षा त्यांना प्रत्येक झाडामागे नुकसान भरपाई दिली पाहिजे. कारण प्रत्येक एकरामध्ये झाडाचे प्रमाण कमी जास्त असू शकते. तेव्हा मी अगोदर सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांना प्रत्येक झाडामागे नुकसान भरपाई दिली पाहिजे. कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी नियम 289 अन्वये आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीसंदर्भात उपस्थित केलेल्या विषयावर शासनाच्या वतीने अपेक्षा व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे शासन शेतकऱ्यांचे आहे, गोरगरिबांचे आहे, हे या शासनाने कृतीने सिध्द करुन दाखविलेले आहे. यावर्षी महाराष्ट्रात ऊसाचे मोठया प्रमाणावर झाले म्हणून ऊस गाळण्याकरिता शासनाने 31 मे पर्यंत साखर कारखाने सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला. तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना 25 हजार रुपये हेक्टरी नुकसान भरपाई देण्याचे मान्य केलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव........

तसेच ट्रान्सपोर्ट सबसिडी देण्याचे मान्य केलेले आहे. विदर्भात कापसाला चांगला भाव देण्यात आला. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांचा कापूस पणन महासंघाला दिल्यानंतर पणन महासंघाला फायदा झाला तर त्यातील काही हिस्सा शेतकऱ्यांना दिला जाईल असे पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सभागृहात घोषणा केलेली आहे. याचा अर्थ स्पष्ट होतो की, हे सरकार खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे आहे. सरकार ऊस व कापूस उत्पादकांच्या पाठिशी ठामपणे उभे राहिले त्याचप्रमाणे आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. आज कोकणातील आंबा पीक पूर्णपणे नासला आहे, पिचला आहे. सुरुवातीस चांगली थंडी होती तेव्हा आंबा पीक चांगल्या प्रमाणात येईल असे वाटले होते. परंतु मध्येच पाऊस पडल्यामुळे आंबा डागाळला. धुके पडल्यामुळे आंब्याचा मोहर गळून गेला आहे आणि आताच्या प्रचंड उष्म्यामुळे तो करपून गेला आहे. तेव्हा सरकारने इतर शेतकऱ्यांच्या बाबतीत जी न्याय्य भूमिका घेतली तशीच भूमिका कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत घेतली पाहिजे. या वर्षी आंब्याचा मोहर गळून गेल्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. तेव्हा आंबा उत्पादक शेतकऱ्यांना एकरी 50 हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी अशी ट्रेझरी बेंचच्या वतीने सुध्दा विनंती करण्यात येत आहे. सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण शासनास निदेश देऊन शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे आहोत असे दाखवून द्यावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कोकणातील अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा विषय या माध्यमातून सभागृहापुढे चर्चेला आलेला आहे. अजूनपर्यंत बाजारात हापूस आंबा आलेला नाही याची मुंबईतसुध्दा चर्चा झालेली आहे. हा विषय घराघरात पोहोचलेला आहे. मुंबईत राहणाऱ्या प्रत्येक कोकणी माणसाला केव्हा एकदा आंबा येता आणि मी तो खातो असे झालेले आहे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

ऊस उत्पादन प्रचंड झाल्यामुळे नुकसान भरपाई दिलेली नाही. ऊस गाळपाकरिता 100 कारखाने....(अडथळा) हे रेकॉर्डवर आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, प्रत्येक विषय आम्ही मांडल्यानंतर त्यांस सन्माननीय सदस्यांनी प्रत्येकवेळी क्रॉस करावयाचे का ?

**सभापती** : सदनातील दोन्ही बाजूचे सदस्य शेतकऱ्यांचे हित जपण्याच्या दृष्टीने बोलत आहे. आंबा पीकही तेवढेच महत्वाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सरकारची पाट थोपटण्याचे काम केले आहे. अशाप्रकारे ते याठिकाणी बोललेच ना ?

**सभापती** : नाही.

( सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलतात.)

**सभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, कोकण विभागातील आंबा उत्पादक शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्यासंबंधी नियम 289 अन्वये प्रस्वात देण्यात आलेला आहे. याबाबत दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य पोटतिडकीने शेतक-यांच्या व्यथा मांडत आहेत. याबाबत आत्ताच सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, जयंत प्र. पाटील, भास्कर जाधव यांनी आपल्या भावना मांडल्या. याठिकाणी महत्वाचा विषय एवढाच आहे की, महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत आहे. मग, तो ऊसाच्या बाबतीत असेल वा आंब्याच्या बाबतीत असेल. त्यामुळे याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने विषय मांडावा, असे झालेतर दोन्ही बाजूचे एकमत होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांचा उगाचच गैरसमज झालेला आहे. मी याठिकाणी विरोध करीत नाही, विरोधाचा प्रश्नच नाही. सन्माननीय सदस्यांनी शांतपणे ऊस उत्पादकांचे व कापूस उत्पादकांचे मुद्दे मांडले. माझीही याबाबतीत वेगळी भावना आहे, ती मी मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. ऊसाच्या बाबतीतही सरकारचे अपयशच आहे. कापसाच्या बाबतीत मी दुपारी प्रस्तावाच्यावेळी बोलणारच आहे. परंतु याठिकाणी आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळालीच पाहिजे. त्यामागचे कारण मी सांगितले. आज मुंबईतील

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सामान्य कुटूंबात आंबा येत नाही, ही व्यथा आहे. अशाचप्रकारे अवकाळी पावसामुळे आमच्या भागातील संत्रा उत्पादकांचे जवळपास 3 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. याबद्दलची व्यथा मी सदनामध्ये मांडलेली आहे. अवकाळी पावसामुळे आंब्याचे नुकसान होत असताना हेक्टरी 50 हजार रुपयांप्रमाणे नुकसान भरपाई मिळण्याची मागणी आहे. ज्याप्रमाणे आंब्याचे नुकसान झालेले आहे, त्याचप्रमाणे संत्रा उत्पादकांचेही नुकसान झालेले आहे, त्यामुळे हेक्टरी 50 हजार रुपये प्रमाणे आंब्याबरोबरच संत्रा उत्पादकांनाही नुकसान भरपाई मिळावी, अशी मला भूमिका मांडावयाची आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकणामध्ये शेती परवडत नाही म्हणून आज तेथील शेती ओस पडलेली आहे. डॉ. नातू नेहमी म्हणत असत की, कोकणाच्या प्रत्येक जिल्हयातील माणसाने 5 कोकमची झाडे व 5 आंब्याची कलमे लावावीत आणि ती लोकांनी अतिशय मेहनतीने लावली. परंतु आज तेथील 5-10 गावांमध्येही आंब्याचे फळ मिळत नाही. आज कोकणातील शेतकरी हवालदिल झालेला आहे. आज त्यांना शेतीतून उत्पादन मिळत नाही. आज त्यांच्या फळझाडांचे फार मोठयाप्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी जी हेक्टरी 50 हजार रुपयांची मागणी केलेली आहे, ती मान्य करावी व या प्रस्तावावर चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी कोकणातील आंब्याचा प्रश्न उपस्थित केला. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर महाराष्ट्रातील 14 जिल्हे कापूस पिकवतात. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी ऊस पिकवतात, मराठवाडयातील शेतकरी कापूस पिकवतात, खानदेशातील शेतकरी कापूस आणि केळी पिकवतात व कोकणातील शेतकरी आंबा पिकवतो. गेल्यावर्षी अतिवृष्टी व पुरामुळे विदर्भातील आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांना आपण थोडयाफार प्रमाणात मदत केली. ज्या ज्यावेळी नैसर्गिक आपत्ती येते त्या त्यावेळी राज्य शासन शेतकऱ्यांना काही प्रमाणात मदत करीत असते. कोकणातील आंबा पीक उत्पादित करणाऱ्या शेतकऱ्यांवर मागे दोन-तीन वेळा संकट आलेले आहे. त्यावेळी सभागृहात चर्चाही झालेली आहे. ज्यावेळी ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न आला तेव्हा

..3.....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ऊसाच्या प्रश्नावर व कापसाच्या प्रश्नावर याठिकाणी चर्चा झाली. आत्महत्येच्या विषयीही याठिकाणी चर्चा झाली. आंबा पिकांवर आता संकट आलेले आहे. आज आंबा उत्पादक शेतकरी फारच संकटात सापडलेला आहे. म्हणून याबाबतीत आता जी मागणी करण्यात आली व ज्याप्रमाणे इतर पिकांच्या बाबतीत पॅकेज दिले जाते त्याप्रमाणे आंबा पिकाच्या बाबतही पॅकेज द्यावे. आपल्याकडील आंबा एक्स्पोर्ट होतो. परंतु आज आमचे हे पीक उद्ध्वस्त झाले आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर सुरु....

सभापती महोदय, या कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्याला 50 हजार रुपये हेक्टरी मदत शासनाने केली तरच हा शेतकरी जगणार आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. त्यामुळे या विषयावर आज चर्चा झाली पाहिजे. या सदनामध्ये कापसाविषयी, ऊसाविषयी व केळीविषयी देखील चर्चा होते. तेव्हा कोकणतील आंब्याच्या संदर्भात चर्चा का होऊ नये ? या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आंब्याच्या प्रश्नासंबंधी चर्चा करुन आंबा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण या चर्चेला अनुमती द्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, भारताला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी देखील शेतकऱ्याच्या स्थितीविषयी शासनाचा विचार स्थिर होऊ शकलेला नाही. स्वातंत्र्य पूर्वी शासनाचे असे मत होते की, फॉरिन अफेयर्स, डिफेन्स, लॉ अँड ऑर्डर आणि जस्टीस या चार गोष्टींसदर्भातच विचार केला पाहिजे. बाकी जे आहे ते महत्वाचे नाही. त्यामुळे मग शेती उत्पादक तर खूपच दूर राहिले.स्वातंत्र्यप्राप्ती नंतर या सर्व सर्व्हिसेस आणि प्रॉडक्शन , सामान्य जनतेसाठी आवश्यक असणाऱ्या जीवनोपयोगी वस्तू या बाबात देखील शासनास लक्ष द्यावे लागते. सभापती महोदय, आंब्याचे उत्पादन विदर्भामध्ये देखील घेतले जाते. परतु हे उत्पादन कोकणाप्रमाणे शास्त्रीय पद्धतीने घेतले जात नाही. विदर्भातील आंब्याचे उत्पादन हळू हळू कमी कमी होत नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. कोकणामधील आंब्याची फळ बागायत मात्र दृष्ट लागावी अशी आहे. ज्या वेळी एखादया नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्याचे जे नुकसान होते ते त्या शेतकऱ्यानेच सहन केले पाहिजे असा पारंपारिक सिध्दांत होता. त्या सिध्दांताला छेद देऊन शेतकऱ्यांच्या मदतीला शासनाने धावले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी कोकणातील आंबा उत्पादकांबाबत हा जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याबाबत चर्चा करुन आंबा उत्पादकांना शासनाने मदत करावी अशी मी विनंती करतो.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, 1995 साली युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आम्ही हा विषय मांडला होता. त्यावेळी प्रथमच आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करण्यात आली होती.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .......

परंतु दुर्दैवाने शेतकऱ्यांना मदत देताना एकरी उत्पादनाप्रमाणे मदत द्यावी अशी पद्धत स्वीकारली गेली होती. कोकणामध्ये रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग हे दोन्ही आंबा उत्पादन करणारे जिल्हे आहेत. सिंधुदूर्ग आणि देवगड या पट्टयामधील आंबा आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेला आहे. मळभ किंवा पाऊस यामुळे आंबा पिकाचे नुकसान झालेले आहे, आलेला मोहर करपून गेलेला आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, या प्रस्तावावर चर्चा व्हावी जेणेकरुन सिंधुदूर्ग आणि कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळू शकेल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शेतकऱ्यावर ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती येते त्या वेळी सरकार त्यांच्या मदतीला धावते . परंतु कोकणाच्या बाबतीत अपवाद आहे. शेतकऱ्यास मदत देण्याच्या संदर्भात कोकणातील शेतकऱ्याची दोन अपवाद वगळता नेहमी उपेक्षा केली जाते. आंबा उत्पादकांना मदत करण्याच्या संदर्भात निकष ठरविताना हेक्टरी न करता प्रत्येक झाडामागे नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्याला मदत मिळण्यासंदर्भात या प्रस्तावावर चर्चा होणे आवश्यक आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, आंबा उत्पादकांच्या संदर्भात येथे प्रस्ताव आणला आहे. आंबा हे कोकणातील प्रमुख पीक आहे. कोकणामध्ये 5 लाख हेक्टरीपेक्षा जास्त जमिनीवर आंब्याची लागवड केली जाते.

यानंता श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.........

महाराष्ट्रातील इतर पिकांच्या बाबतीत जसा विचार शासन करते तशाच प्रकारचा विचार कोकणातील आंबा पिकाच्या बाबतीत करणे आवश्यक आहे. यावेळी आंबा बागायतदार शेतकरी अडचणीत आला आहे. आंबा झाडांचे संगोपन, फवारणी, मशागत व इतर कामांसाठी या शेतक-याने लाखो रुपयांचे कर्ज काढले आहे व आता उत्पादन न आल्यामुळे हा शेतकरी कर्जबाजारी झााला आहे. त्यामुळे या विषयावर सभागृहात तातडीने चर्चा करणे गरजेचे आहे. ही चर्चा झाली तरच ख-या अर्थाने आंबा बागायतदारांना न्याय मिळेल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे व अन्य सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्यासंदर्भात माझे विचार मांडत असतांना मी मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. मी देखील कोकण विभागाचे प्रतिनिधित्व करतो. माझ्याकडेही आंबा उत्पादक शेतक-यांची पत्रं आलेली आहेत, अनेक तक्रारी मला प्राप्त झाल्या आहेत. सभागृहात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांशी मी सहमत आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, या विषयी सभागृहात चर्चा व्हावी आणि शासनाने आंबा उत्पादक शेतक-यांना दिलासा द्यावा.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर आहे. मी या विषयाच्या अनुषंगाने एक छोटी विनंती करणार आहे. पुणे जिल्हयातील मुळशी-मावळ परिसरात देखील आंबा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे, त्यांनाही न्याय द्यावा, अशी विनंती आहे.

**सभापती** : माझ्या मते, नियम 289 अन्वये जे प्रस्ताव माझ्याकडे आले आहेत ते कोकण आणि महाराष्ट्रातील आंबा उत्पादक शेतक-यांच्या अनुषंगाने अत्यंत जिव्हाळयाचे आहेत. आंबा उत्पादकांचे गेल्या दोन वर्षामध्ये अतिउष्णतेमुळे आणि अतिवृष्टीमुळे जे नुकसान झाले आहे ते तातडीने भरुन देऊन शेतकरी वाचविणे, असा हा प्रश्न आहे. या अनुषंगाने सन्माननीय मंत्री, श्री.गणेश नाईक किंवा सन्माननीय मंत्री, श्री.सुनील तटकरे यांना काही सांगावयाचे आहे काय ?

श्री.सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आंबा उत्पादक शेतक-यांच्या या वर्षीच्या स्थितीबद्दल गांभीर्याने भावना व्यक्त केल्या आहेत. ही वस्तुस्थिती खरी आहे की, यावर्षी आंबा उत्पादनामध्ये मोठया

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.......

प्रमाणावर घट झाली आहे व त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. या निमित्ताने दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना मंत्रिमंडळाला अवगत करण्यात येतील. मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, सन 1995 ते सन 1999 या कालखंडामध्ये आंबा उत्पादक शेतक-यांना मदत करण्याची भूमिका लोकशाही आघाडी सरकारने घेतली. अतिवृष्टीमुळे व अतिउष्णतेमुळे आंबा बागायतदार शेतक-यांचे नुकसान झाले असतांना या शेतक-यांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून मंत्रिमंडळापुढे या विषयीचे गांभीर्य आम्ही निश्चितपणे मांडू, एवढेच या निमित्ताने सांगतो.

**सभापती** : माझ्यासमोर नियम 289 चे दोन प्रस्ताव आहेत. पैकी एक प्रस्ताव सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे व अन्य सात सदस्य यांचा आहे. दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य, श्री.जयंत प्र.पाटील व अन्य दोन सदस्य यांचा आहे. विशेषत: कोकण आणि महाराष्ट्राच्या अन्य भागामध्ये गेल्या दोन वर्षात जी अतिवृष्टी झाली व या वर्षी अतिउष्णतेची लाट आली त्यामुळे आंब्याचा मोहर मोठया प्रमाणात गळाला व दुर्दैवाने आंबा उत्पादक शेतकरी हा फार मोठया नुकसानीमध्ये आलेला आहे आणि त्याला वाचविणे महत्वाचे आहे. या अनुषंगाने माझ्याकडे हे दोन प्रस्ताव दिलेले आहेत. मी तात्विकदृष्टया काय निर्णय देणार आहे, हा भाग वेगळा. पण सन्माननीय मंत्री, श्री.गणेश नाईक व सन्माननीय मंत्री, श्री.सुनील तटकरे यांना अशी विनंती आहे की, आंबा उत्पादकांच्या अनपुषंगाने विशेषत: कोकण विभागातील शेतक-यांच्या अनुषंगाने तसेच सन्माननीय सदस्य, श्री.उल्हास पवार यांनी मावळ किंवा अन्य भागाच्या स्थितीबद्दल सांगितल्याप्रमाणे आंबा उत्पादन या क्षेत्रात फार मोठया प्रमाणावर आहे.

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर....... 11:30

**सभापती**.....

हे विचारात घेऊन मला असे वाटते की, या विषयावर आपण अडीच तास चर्चा घ्यावयाची असे ठरले तर आज माझ्याकडे म.वि.प.नियम 260 अन्वयेच्या दोन चर्चा कामकाज पत्रिकेमध्ये चर्चेकरिता आहेत, याव्यतिरिक्त दोन विधेयकेही आहेत. त्यामुळे आजच ही चर्चासुध्दा घ्यावयाचे म्हटले तर एकूण तीन चर्चा होण्याची शक्यता आहे याकरिता आपण जास्त वेळ बसण्याची मानसिक तयारी करा. या प्रस्तावावर चर्चा घ्यावयाची की नाही,याबाबत मी असे सांगू इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेत सदर प्रस्ताव नसल्यामुळे तांत्रिकदृष्टया मी या प्रस्तावाला मंजूरी देणार नाही परंतु नियम 97 अन्वये विशेष बाब म्हणून मी या चर्चेला मंजूरी देण्याचे ठरविलेले आहे.

श्री.विनोद तावडे : नाही, सभापती महोदय, नियम 97 अन्वये ही चर्चा घेऊ नये, अशी माझ ी विनंती आहे.

**सभापती** : नियम 97 अन्वये अडीच तासाची अल्पकालीन चर्चा घ्यावयाचा मी निर्णय घेतलेला आहे. आता असे आहे की, आजपासून एकूण तीन दिवसच कामकाजाकरिता आपल्याकडे उपलब्ध आहेत. आजच हया सर्व चर्चा घ्यावयाचे असे ठरले तर आजच्या कामकाजपत्रिकेवरील ज्या दोन चर्चा आहेत त्यापैकी एक चर्चेचे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांच्या चर्चेचे उत्तर आज पूर्ण होईल, असे काही मला वाटत नाही म्हणून ही चर्चा सोमवार, दिनांक 16 एप्रिल,2007रोजी एका तासामध्ये पूर्ण करु. आज सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांची देखील एक चर्चा आहे ती चर्चा आणि ही आंबा उत्पादकांच्या अनुषंगाने आलेली चर्चा अशा दोन चर्चा आपल्याला घ्याव्या लागतील, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्याबद्दल त्यांचे अभिप्रायही सांगितलेले आहेत.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, आजच्या दिवसाच्या कामकाजामध्ये नियम 260 अन्वये माझा देखील एक प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे.

**सभापती** : होय, सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांचा देखील नियम 260 अन्वये एक प्रस्ताव चर्चेसाठी आहे. आता मी असे करतो की, आंबा उत्पादनाच्या अनुषंगाने जी चर्चा आहे ती सोमवार,दिनांक 16 एप्रिल,2007 रोजी सकाळी 10 ते 12.30 वाजेपर्यंत घेण्याचे मी निश्चित करतो परंतु आपण फक्त सभागृहामध्ये जास्त बसण्याची मानसिक तयारी करा, या अधिवेशनामध्ये चर्चेकरिता आलेले सर्व प्रस्ताव मी घेणार आहे.

G -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आव्हाड : समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य लवकरच पळून जातात.

श्री.विनोद तावडे : आम्ही कधीही पळून जात नाही, तुम्हीच लवकर पळून जातात.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,प्रश्नोत्तराच्या तासाचा अर्धा तास तर संपलेला आहे.

**सभापती** : ठीक आहे, आता घडयाळामध्ये 11 वाजून 33 मिनिटे झालेली आहेत. प्रश्नोत्तराच्या तासाकरिता मी एकूण 33 मिनिटे वाढवून देत आहे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर**
**असलेली शिक्षण सेवक योजना**

**(१) * २४४९५ श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. श्रीकांत जोशी , डॉ. एम. ए. अझिज , श्री. संजय दत्त , श्रीमती सुधा जोशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर शासनाने सुरु केलेली २००० पासूनची शिक्षण सेवक योजना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) शिक्षण सेवक योजनेच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयातील याचिकेसंदर्भात व मानवी हक्क आयोगाकडील तक्रारीसंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) नाही.

(२) शिक्षण सेवक योजनेच्या विरोधात मुंबई येथील मा. उच्च न्यायालयात अंतिम सुनावणीसाठी प्रलंबित असलेल्या याचिकेच्या अनुषंगाने या योजनेस वैधानिक स्वरुप देण्यासाठी चालू अधिवेशनात विधेयक सादर करण्यात आले आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सदर प्रश्न शिक्षण क्षेत्राच्या आणि शिक्षकांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असा प्रश्न आहे. या सभागृहामध्ये ज्या दिवशी यासंबंधीचे विधेयक चर्चेकरिता आले होते, त्यादिवशी ते गोंधळामध्ये मांडले गेले होते त्यामुळे आम्हाला त्या विधेयकाविषयीचे आमचे विचार व मते,मांडावयाची संधी मिळालेली नव्हती आणि म्हणून मी या निमित्ताने आपल्याला विनंती करतो की, याबाबत बोलावयाला मला थोडा जास्त वेळ देण्यात यावा.

**सभापती** : सदर शिक्षणसेवकांच्या विषयाकरिता वेगळा वेळ देण्याचे ठरलेले आहे, तेव्हा प्रश्नोत्तराच्या तासामध्ये तारांकित प्रश्नावर उपप्रश्न विचारण्याकरिता जेवढा नॉर्मल वेळ असतो तेवढा वेळ आपण घ्यावयास हरकत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय,जून,2000 पासून शासनाने शिक्षण सेवक योजना सुरु केलेली आहे. एका विशिष्ट परिस्थितीमध्ये ही शिक्षण सेवक योजना शासनाला सुरु करावी लागली असे शासनाने मुंबई उच्च न्यायालयाला ॲफिडेव्हिट दाखल करुन म्हटलेले आहे. महाराष्ट्रामध्ये 24,700 पदे एकदम भरावयाची आहेत आणि ती जर व्हॅकन्ट ठेवली तर लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होईल म्हणून एका विशिष्ट परिस्थित्मिध्ये ती पदे भरण्यासाठी मुंबई उच्चन्यायालयाने महाराष्ट्र शासनाला परवानगी दिलेली आहे. परंतु ती परवानगी फक्त विशिष्ट





श्री.रामनाथ मोते...... ता.प्र.क्र. 24495

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कालावधीपुरतीच मर्यादित होती.  त्यामुळे शिक्षणसेवक योजना आज ना उद्या शासनाने रद्द करावी, अशा प्रकारची संस्थाचालकांची व शिक्षकांचीही मागणी आहे.  संस्थाचालकांनी तर तसा ठरावच तयार करुन शासनाकडे पाठविलेला आहे.

यानंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24495** .........

श्री.रामनाथ मोते .......

म्हणून माझा पहिला प्रश्न असा आहे की, शिक्षण सेवकाला वेठबिगार करणारी शिक्षण सेवक योजना शासन रद्द करणार आहे काय आणि शासनाने त्यासंदर्भात मंजूर केलेले विधेयक मागे घेतले जाईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, नाही.

डॉ.वसंत पवार : सभापती महोदय, परवा आपण सभागृहामध्ये विधेयक पास केलेले आहे. त्या विधेयकामध्ये शिक्षण सेवक असा शब्द आहे. सेवक हा शब्द आल्यामुळे शिक्षकांची थोडीशी कमतरता भासत आहे. म्हणून माननीय मंत्री महोदय "सेवक" या शब्दाचे नाव बदलणार काय ? तसेच, विधेयकामध्ये शिक्षण सेवकाला पगार देण्याऐवजी मानधन दिले जाईल, असे नमूद केलेले आहे. माननीय मंत्री महोदय विधेयकातील "मानधन" शब्द काढून त्याऐवजी "पगार" असा बदल करणार काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, तूर्त नावामध्ये बदल करण्याचा प्रस्ताव नाही. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी "मानधन" ऐवजी "पगार" असा बदल करणार काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. मुळात म्हणजे वेतनाच्या संदर्भात किंवा मानधनाच्या संदर्भात शासन गांभीर्याने विचार करील. परवा सभागृहामध्ये विधेयक पास झालेले आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांची दखल घेतली जाईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, शिक्षण हा अतिशय महत्वाचा विषय आहे. मला असे वाटते की, शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे. विद्यार्थी आणि शिक्षक हा शिक्षणाचा प्राण आहे. आता तो अर्धमेला झालेला आहे, असे दृष्टोत्पत्तीस आले आहे. मी माननीय मंत्री महोदयांना असे विचारु इच्छिते की, शिक्षण सेवक योजना सन 2000 पासून सुरु झाली आहे. तेव्हा पासून आज पर्यंत या योजने अंतर्गत तीन वर्षे पूर्ण झालेल्या किती शिक्षकांना कायम स्वरुपी पूर्ण वेळ सेवेत सामावून घेतले आणि किती शिक्षकांना तीन वर्षे पूर्ण होऊन सुध्दा कायम स्वरुपी सेवेत सामावून घेतलेले नाही ?

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.24495** .........

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, खरे म्हणजे ज्या शिक्षण सेवकांची 3 वर्षे पूर्ण झालेली आहेत, त्यांना सेवेमध्ये नियमित करण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. सन 2003-04 ते 2005-06 मध्ये 33,451 शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या शिक्षकांना कायम करण्याची हमी शासनाने घेतलेली आहे. 4,674 शिक्षक अर्ध शिक्षित आहेत. कोणत्याही शिक्षकावर घरी जाण्याची वेळ येणार नाही. आता पर्यंत फक्त 1300 शिक्षण सेवकांना निलंबित करण्यात आले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मुळामध्ये शिक्षण सेवकाची जी कल्पना आहे, ती चुकीची आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षण सेवकांची भरती केल्यामुळे सेवक हा शब्द खराब झालेला आहे. माहिती घेण्याच्या उद्देशाने मी माननीय मंत्री महोदयांना प्रश्न विचारु इच्छितो. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, परवा सभागृहामध्ये जे विधेयक मंजूर झाले ते हायकोर्टाच्या सूचने प्रमाणे आहे काय आणि नसेल तर हरकती आणि फरक कोणत्या बाबतीत आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अन्य दोन-तीन राज्यांमध्ये ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. आपल्या राज्याची वित्तीय स्थिती सुधारेपर्यंत ही योजना सुरु करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी कोर्टाच्या सूचनेप्रमाणे विधेयक आणले आहे काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. या योजनेला वैध अधिष्ठान नव्हते. त्यामुळे ही योजना लिगल ठरु शकत नाही. या योजनेला वैधतेचे स्वरुप देण्यासाठी हायकोर्टाच्या सूचनेप्रमाणे हे विधेयक आणलेले आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबद्दल मला काही म्हणावयाचे आहे. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी सेवक या शब्दासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे. मी असे सांगू इच्छितो की, महात्मा गांधींनी सेवक श्रमा प्रतिष्ठान महाराष्ट्रात सांगितले. महानगरपालिकेमध्ये निवडून आलेल्या कार्पोरेटरला आपण नगरसेवक म्हणतो.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24495

श्री.उल्हास पवार.....

सेवक हा शब्द चांगला आहे. महात्मा गांधींनी सेवक या शब्दाचे महत्व विषद केलेले आहे. त्यामुळे सेवक या शब्दाची आपण इतर शब्दांशी तुलना करु नये, असे माझे मत आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, शिक्षण सेवक योजनेच्या संदर्भात दिनांक 3 एप्रिल रोजी बोलताना मी विरोध प्रगट केला आहे. शिक्षण सेवक ही योजना लागू होऊन 5 ते 7 वर्षे झालेली आहेत. या योजनेच्या सुरुवातीपासून प्राथमिक शिक्षकांना 3000, माध्यमिक शिक्षकांना 4000 व उच्च माध्यमिक शिक्षकांना 5000 रुपये याप्रमाणे मानधन दिले जात आहे. सध्या 35 टक्केपर्यत महागाई भत्ता वाढलेला आहे. याप्रमाणेच शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करणे अत्यंत आवश्यक आहे. शासन शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करणार का ? शिक्षण सेवकांना शिक्षकांप्रमाणे भविष्य निर्वाह निधी योजना लागू झाली पाहिजे. त्याप्रमाणे शासन त्यांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू करणार का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षण सेवक योजनेचा गांभीर्याने विचार केला तर असे दिसून येते की, खाजगी संस्थामध्ये शिक्षकांची झालेली नियुक्ती, संस्थाचालकांनी त्यांच्याकडून घेतलेले डोनेशन, त्यांना मिळणारे मानधन या सर्व बाबी योग्य वाटत नाही.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांनी तीन वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतर त्यांना कायद्याने संरक्षण देण्यात येते. सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी शिक्षण सेवकांचे मानधन वाढविण्याबाबत प्रश्न विचारला आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, शिक्षण सेवकांचे मानधन वाढीबाबत विचार करण्यासाठी एक बैठक आयोजित करण्यात येईल. शिक्षण सेवकांना भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्याबाबतही वेगळा काही विचार करता येईल का हे पाहिले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंटेड प्रश्न आहे. शिक्षण सेवकांबाबत उच्च न्यायालयाच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणेच विधेयक करण्यात येत आहे का ? किंवा काही deviation शासनाने या विधेयकात आणले आहे का ? आणखी काही सुधारणा या विधेयकामध्ये आणण्यात येत आहेत का ? याची माहिती द्यावी.

सभापती महोदय, शिक्षण सेवकाला मानधन देण्यात येते, पगार नाही म्हणून सेवक हा शब्द आलेला आहे, या अर्थाने हा प्रश्न विचारला आहे. .....2

PNG/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र.24495

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या तांत्रिक प्रश्नाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, शिक्षण सेवक योजना रद्द करण्यात येईल असे माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक प्रचाराच्या वेळी आश्वासन दिले होते. माननीय शिक्षण मंत्र्यांनीही याबाबत घोषणा केली होती. मंत्री महोदयांनाही शिक्षकांना शिक्षकांना प्रथम व शिक्षण सेवकांना दुयम्म दर्जा देणे मान्य नव्हते. शिक्षकांना प्रथम किंवा दुय्यम दर्जा देणे हा त्यांचा अपमान आहे. शिक्षण सेवकांनाही शिक्षकांचा दर्जा देण्यासाठी शिक्षण सेवक या नामविधानाचा पुनर्विचार करुन शिक्षकांना एकाच पातळीवर आणण्यात येईल का ? शिक्षकांना मिळणारे सर्व फायदे शिक्षण सेवकांना देण्यात येतील का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, महाराष्ट्रात दरवर्षी 20 हजार शिक्षकांची नेमणूक केली जाते. शासनाचा शिक्षण सेवकांना कमी लेखण्याचा कोणताही विचार नाही. याबाबत मी स्पष्ट करु इच्छितो की, शिक्षण सेवकांचे मानधन वाढविण्याबाबत विचार करण्यात येईल. परंतु शिक्षण सेवक ही योजना थांबविण्याचा शासनाचा कोणताही विचार नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, अनेक राज्यात तसेच बिहारसारख्या मागासलेल्या राज्यात शिक्षण सेवक या शब्दांऐवजी शिक्षण मित्र शब्द वापरला जातो. त्या राज्यांनी शिक्षण सेवकांच्या नेमणूकीचा कालावधी दोन वर्ष केलेला आहे, वेतन दुप्पट केलेले आहे. महाराष्ट्र शासन याबाबत माहिती घेऊन हया सुधारणा करणार आहे का ? सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी त्यांच्या प्रश्नात विचारले होते की, या कायद्यामध्ये शिक्षकांऐवजी पुन्हा शिक्षण सेवक हा शब्द आला, वेतनाऐवजी मानधन शब्द आला. त्यामुळे शिक्षक हा शब्द सर्व शिक्षकांना लागू होईल काय, ही रास्त शंका आहे, याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षण सेवकांनी तीन वर्ष सेवा पूर्ण केल्यानंतर ते शिक्षक होणारच आहेत. शिक्षण सेवकांचा सेवेचा कालावधी तीन वर्षाऐवजी दोन वर्ष करण्याचा तुर्त शासनाचा काही विचार नाही.

-------

नंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

## झुणका भाकर केंद्र ताब्यात घेण्याबाबत

**(२) * २६१५९ श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. लक्ष्मण जगताप, श्री.भास्कर जाधव, श्री. राजेंद्र जैन, श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. गोपीकिसन बाजोरिया, श्री. मधुकर सरपोतदार, डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. अनिल परब , श्री. अरविंद सावंत , डॉ. निलम गोऱ्हे , श्री.परशुराम उपरकर , श्री. सुरेश जेथलिया :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील झुणका-भाकर केंद्र पाडण्याऐवजी या जागा लिलावाच्या माध्यमातून चालविण्यासंदर्भात विचार सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुनील तटकरे** : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही विचारलेल्या पहिल्या प्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिलेले आहे. ...

एक सन्माननीय सदस्य (बसून) : सभापती महोदय, प्रश्न विचारणाऱ्यांमध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांचे नाव नसतानाही आपण त्यांना प्रथम प्रश्न विचारण्याची संधी दिली आहे ...

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहात विरोधी पक्षनेत्यांना प्रथम बोलण्याची, प्रश्न विचारू देण्याची संधी दिली जावी असा लोकशाही संकेत आहे आणि त्याप्रमाणे मी येथे माननीय विरोधी पक्षनेत्यांना प्रश्न विचारण्याची सर्वप्रथम संधी दिली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या संदर्भातील माझा प्रश्न असा आहे की, 15 दिवसापूर्वी ही झुणका भाकर केंद्रे ताब्यात घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून 'ही केंद्रे खाली करावीत' अशा प्रकारच्या नोटीसा दिलेल्या होत्या, हे खरे आहे काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या झुणका भाकर केंद्रांच्या बाबतीत राज्य सरकारने निर्णय घेतलेला आहे आणि त्या विरोधात या केंद्र चालकांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तेव्हा उच्च न्यायालयाने याबाबत सरकारचा निर्णय कायम केला आहे. त्यावर केंद्र चालक सर्वोच्च न्यायालयामध्ये गेले असता तेथेही राज्य सरकारचाच निर्णय कायम केला

...... जे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ MHM/ श्री. गागरे नंतर --- 11:45

श्री. तटकरे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 26159 ....

गेला. त्यामुळे या झुणका-भाकर केंद्रांच्या जागा खाली करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना नोटीसा दिल्या ही गोष्ट खरी आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या झुणका-भाकर केंद्रांच्या जागा कलेक्टरने ताब्यात घेतल्यानंतर सरकार तेथे काय करणार आहे ? कारण तेथे केंद्र चालकांनी अनधिकृत बांधकाम देखील केलेले आहे, त्यांना सरकार कायदेशीर स्वरूप देणार आहे की, या जागा ताब्यात घेतल्यानंतर त्या लिलावामध्ये विकणार आहे ? आता जी काही झुणका-भाकर केंद्रे चालू आहेत ती लीज पद्धतीने दुसऱ्याला दिलेली आहेत. तेव्हा ही सर्व केंद्रे सरकार ताब्यात घेण्याची कारवाई सरकार करणार आहे का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, ही झुणका-भाकर केंद्रे राज्य सरकारने दिलेली असल्याने, ती केंद्रे अधिकृत जागांमध्ये होती म्हणूनच सरकारने त्यांना अनुदान दिलेले होते. त्यामुळे याबाबतीत नेमके धोरण तपशीलामध्ये जाऊन ठरवायचे आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या झुणका-भाकर केंद्रांसाठी राज्य सरकारने 50 टक्के अनुदान दिलेले आहे आणि 50 टक्के पैसा सदर केंद्र चालकाने उभा केलेला आहे. अशा परिस्थितीत म्हणजे 50 टक्के रक्कम केंद्र चालकाने त्यात स्वत:ची घातली असेल तर ते संपूर्ण केंद्र सरकार कसे काय ताब्यात घेणार आहे ?" म्हणून या बाबतीत सभापती महोदय, जोपर्यंत हा प्रश्न मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णय होत नाही तोपर्यंत सुरू केलेली सारी प्रक्रिया थांबवावी असे जे निर्देश आपण दिलेले आहेत. त्या निर्देशांचे पालन करून मंत्रिमंडळासमोर हा प्रश्न नेऊन या केंद्र चालकांना आपण न्याय देणार काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला आहे की, या केंद्रांसाठी सरकारने 50 टक्के अनुदान दिलले आहे आणि केंद्र चालकाने उर्वरित 50 टक्के खर्च केलेला आहे, किंवा यासाठी दिलेल्या अनुदानापेक्षाही अधिक रक्कम केंद्र चालकाने स्वत: खर्च केला असण्याची शक्यता आहे. परंतु या सर्व गोष्टी न्यायालयामध्ये मांडल्या गेल्यानंतरही न्यायालयाने सरकारच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. तेव्हा सभापती महोदय, आपण या संदर्भात जे निर्देश दिलेले आहेत त्यानुसार हा प्रश्न मंत्रिमंडळापुढे नेला जाईल आणि मंत्रिमंडळामध्ये याबाबत जे काही ठरेल, जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे अमलबजावणी केली जाईल.

...... जे 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26159 ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे की, 1998-99 चा हा विषय आहे आणि आता आपण 2007 मध्ये आलो आहोत. या संबंधात न्यायालयांचा निर्णय काहीही असो, परंतु याबाबत माननीय सभापतींनी तीन वेळा निर्णय दिलेला आहे. तेव्हा या संबंधात कोठलाही प्रेस्टिज इश्यू न करता काही लोकांच्या रोजगाराचा हा प्रश्न आहे, जवळपास 6 हजार लोकांच्या आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या जवळपास 25 हजार लोकांचा हा प्रश्न आहे., हे लक्षात घेऊन त्यांच्याबाबतीत सहानुभूतीचा दृष्टीकोन ठेवून शासन या लोकांना न्याय देईल काय ? प्रत्येक वेळेस न्यायालयाचा निर्णय कठोरपणे न दाखविता मानवतावादी दृष्टीकोन शासनाने ठेवावा. सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.तटकरे हे कोकणातील असून मानवतावादी आहेत. तेव्हा त्यांनी या प्रश्नाबाबत सहानुभूतीचा दृष्टीकोन, भूमिका आतापर्यंत घेतलेली आहे. त्यावर आणखी शिक्कामोर्तब करा आणि या लोकांच्या डोक्यावर जी टांगती तलवार आहे ती तशी राहणार नाही या दृष्टीने आपण काय करणार आहात ते सांगावे.

( यानंतर श्री. सरफरे .... के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26159...

**सभापती** : मंत्रिमहोदय, बेरोजगार तरुण किंवा अन्य गरजू लोकांच्या जीवनमरणाचा हा प्रश्न आहे. याबाबतीत हायकोर्टामध्ये किंवा सुप्रिम कोर्टामध्ये जो निर्णय देण्यात आला आहे, त्यापेक्षा माणुसकीच्या दृष्टीकोनातून हा प्रश्न महत्वाचा आहे. हजारो कुटुंबे या योजनेवर अवलंबून आहेत या माझ्या मताशी आणि सभागृहातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांच्या मताशी आपण सहमत आहात. झुणका भाकर योजनेच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना चांगल्या प्रकारचे जीवन जगता यावे यासाठी हा विषय मंत्रिमंडळापुढे नेण्याबाबत आपण जरुर प्रयत्न करावेत असे मी सांगितले होते. त्या अनुषंगाने शासनाने काळजी घेण्याची आवश्यकता असल्यामुळे दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांनी हा प्रश्न गांभीर्याने विचारला आहे. त्याबाबतीत आपली भूमिका काय आहे?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या विषयासंदर्भात मागील अधिवेशनामध्ये चर्चा झ ाली होती. त्यावेळी आपण निर्देश दिले असतांना हा मंत्रिमंडळाचा निर्णय असल्याचे मी सांगितले होते. आणि म्हणून मंत्रिमंडळाचा हा निर्णय असल्यामुळे या योजनेला स्थगिती देण्याचा विषय माझ या अखत्यारीत येत असला तरी सभागृहातील सर्व माननीय सदस्यांच्या भावना मंत्रिमंडळापुढे मांडण्यात येतील असे म्हटले होते. त्याप्रमाणे येत्या 15 ते 20 दिवसांमध्ये हा विषय मंत्रिमंडळापुढे नेण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याशी मी चर्चा करीन.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शिक्षकांना जुलै-२००४ ते जानेवारी-२००५ पर्यंतचे वेतन अनुदान मंजूर न करणे

**(३) * २४५३९ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १००% अनुदानास पात्र ठरलेल्या माध्यमिक शाळांतील शिक्षकांना (दिनांक १८ ऑगस्ट, २००५ च्या शासन निर्णय) बिगर आदिवासी क्षेत्रातील शिक्षकांप्रमाणे जुलै २००४ ते जानेवारी, २००५ पर्यंतचे वेतन अनुदान मंजुर करावे या व इतर मागण्याचे एक निवेदन सरकार्यवाह विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ यांनी मा. मुख्यमंत्री यांना पाठवून दिनांक ६ डिसेंबर, २००६ रोजी विधान भवन, नागपूर येथे धरणे आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळांतील शिक्षकांना मिळणाऱ्या अनुदानाबाबत केलेला भेदभाव दूर करण्याचे दृष्टीने शासनाने काय कारवाई किंवा उपाययोजना केली आहे,

(३) उपाययोजना केलेली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके** : (१) होय, हे खरे आहे.

(२) अनुदान हे निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. मा. विधीमंडळाच्या निदर्शनास नवीन शाळा आणून दिल्यानंतर अनुदान वितरीत केले जाते. मागणी केल्यानुसार नियमव्यय उपलब्ध न झाल्यामुळे आदिवासी क्षेत्रातील शाळा जुलै, २००४ पासून अनुदानावर आणणे शक्य झालेले नाही. त्यामुळे आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील शिक्षकांना मिळणाऱ्या अनुदानाबाबत भेदभाव करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये म्हटले आहे की, "आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील शिक्षकांना मिळणाऱ्या अनुदानाबाबत भेदभाव करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही". सभापती महोदय, हा भेदभाव कसा झाला आहे हे मी आपणास सांगतो. याठिकाणी आदिवासी आणि बिगर आदिवासींच्या संदर्भात वेगवेगळे नियम आहेत. या अनुषंगाने सन २००४-०५ व २००५-०६ मध्ये २९० निकष पात्र तुकडयांना व १७० शाळांना अनुदान दिले . शासनाच्या जी.आर. प्रमाणे बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळांना अनुदान दिले. याठिकाणी आपण

DGS/ SBT/ MHM/

*** २४५३९ ....**

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे...

अन्याय केला नाही असे म्हणत आहात, परंतु आपण आदिवासी क्षेत्रातील शाळांवर अन्याय केला आहे. खरे म्हणजे आदिवासी विकास विभाग आणि शालेय शिक्षण विभाग या दोन विभागांमध्ये भांडण आहे. जुलै २००४ पासून सात महिन्यांची थकबाकी देण्याचे मान्य केले आहे. परंतु ती अद्यापि दिलेली नाही, ती देणार काय?

**सभापती** : माननीय सदस्यांनी प्रश्न डेव्हलप न करता मूळ प्रश्न विचारावा.

श्री. व्ही. यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, जुलै २००४ पासून सात महिन्यांची थकबाकी देण्यात येईल काय? ७५ शाळांना फेब्रुवारी २००६ या एका महिन्याचे अनुदान दिले, त्यापुढील दिले नाही. त्याचप्रमाणे सप्टेंबरपासून अनुदान दिले नाही. बिगर आदिवासी विभागातील शाळांना जो न्याय दिला तो न्याय आदिवासी विभागातील शाळांना व तुकडयांना देणार काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, बिगर आदिवासी शाळांना अनुदान देण्याचा प्रस्ताव होता व तो रास्त होता. त्याप्रमाणे आदिवासी विभागातील शाळांना अनुदान देण्याचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु त्यावेळी नियतव्यय उपलब्ध न झाल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाला, त्यांच्यावर भेदभाव झाला हे मान्य आहे. म्हणून पुन्हा हा प्रस्ताव आदिवासी विकास मंत्र्यांकडे सादर करुन पूर्वलक्षी प्रभावाने उर्वरित अनुदान देण्यासाठी मी आग्रही राहीन.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे..... 11:55

ता.प्र.क्र.24539 (पुढे सुरू.....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, बिगर आदिवासी क्षेत्रातील शाळांना फेब्रुवारी 2005 पर्यन्त अनुदान दिले आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये काम करणाऱ्या आदिवासी क्षेत्रातील शाळांना जुलै 2004 पर्यन्तचे अनुदान दिले. सात महिन्याचे अनुदान द्यावयाचे राहिलेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, बिगर क्षेत्रामध्ये जे अनुदान जुलै 2004 पासून द्यावयाचे आणि आदिवासी क्षेत्रातील शाळांना फेब्रुवारी 2005 पासून अनुदान द्यावे, अशाप्रकारे मंत्रिमंडळाचा निर्णय झालेला आहे काय ? झाला असेल तर तो केव्हा झालेला आहे ?

प्रा.वसंत पुरके : असा वेगळा निर्णय निश्चितच झालेला नव्हता. त्याचवेळेस आदिवासी मंत्रालयाकडे हा नियतव्यय प्राप्त करून द्यावा यासाठी मी स्वत: पाठपुरावा करत आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आदिवासी शिक्षकांचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.डायगव्हाणे यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासी विभागातील शाळांना 7 महिन्याचे अनुदान मिळालेले नाही. ते अनुदान मिळण्याच्या संबंधात एक महिन्यामध्ये निर्णय घेणार अहात काय ? त्याबाबतची तारीख सांगावी. या संबंधात मंत्री महोदयांना घेरावही घातलेला होता.

प्रा.वसंत पुरके : मला घेराव घालण्याबाबत काही अडचण नाही. परंतु प्रश्न असा आहे की, यासबंधातील प्रस्ताव आदिवासी विभागाला सादर केलेला आहे. अनुकूल निर्णय घेण्याच्या दृष्टीने आम्ही भूमिका घेतलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : आपण याबाबत प्राधान्याने अनुकूल निर्णय घेत आहात. तसा तो घेण्याची गरज आहे. या ठिकाणी भेदभाव झालेला आहे, हे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. मंत्री महोदयांनी बिगर आदिवासी आणि आदिवासी क्षेत्रातील शाळांसाठीचा निर्णय सारखाच घेणे आवश्यक आहे. काही चतूर अधिकारी आहेत. चुका झालेल्या आहेत हे मान्य करून देखील उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, अनुदान हे निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. "Grant is firmed committment by the government." आदिवासी विभागावर आपण अन्याय करतो आहोत म्हणून अनुकूल निर्णय घ्यावा. एक-दोन महिन्यामध्ये याबाबतचा भेदभाव दूर करण्याविषयीचा निर्णय मंत्री महोदय घेतील काय ?

प्रा.वसंत पुरके : याबाबत त्वरित निर्णय घेण्याचा आम्ही प्रयत्न करू.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : एक महिन्यात निर्णय घेण्यास मंत्रीमहोदय कॅपेबल नाहीत म्हणून आम्ही निषेध करून सभात्याग करतो.

(शिक्षक मतदार संघामधील सन्मानीय सदस्य सभात्याग करतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MHM/

**ठाणे-बेलापूर मार्गावरील घणसोली येथील स्टॅण्डर्ड अल्कली या रसायनिक कारखान्याच्या कामगारांना पुन्हा कामावर घेण्याबाबत**

**(4) * 26596 श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जितेंद्र आव्हाड : दिनांक 7 डिसेंबर, 2006 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या आठव्या यादीतील प्र.क्र.18606 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **कामगारमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे-बेलापूर मार्गावरील घणसोली येथील स्टॅण्डर्ड अल्कलीच्या कामगारांना काम मिळवून देण्याच्या दृष्टीने व टाळेबंदी उठविण्याच्या दृष्टीने करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक** : (1) व्यवस्थापनाने कामगार संघटनेबरोबर स्वेच्छानिवृत्ती करार करुन सर्व कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्विकारली असल्याने आता टाळेबंदी उठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय,स्टॅडर्ड अल्कली या कंपनीच्या व्यवस्थापनाने स्वेच्छा निवृत्तीचा करार केला होता. त्या अगोदरच व्यवस्थापनने टाळेबंदी केली होती हे खरे आहे काय ?

श्री.गणेश नाईक : टाळेबंदी अगोदरच झालेली होती. टाळेबंदी उठविण्याचा प्रयत्न चालू असतानाच व्यवस्थापनाने कामगारांच्या समोर दररोज कंपनी घाट्यामध्ये चालली होती ही वस्तुस्थिती मांडल्यानंतर व्यवस्थापनाने कामगारांसमोर व्हीआरएसची योजना मंजूर केली. त्या ठिकाणच्या सर्व कामगारांचे सर्व हिशोब चुकते करण्यात आले आहेत.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, संपूर्ण करार पहाता कंपनीला क्लोझरची परवानगी नसतांना इल लिगल कंपनी बंद करण्यात आली. त्यानंतर कामगार संघटनेबरोबर व्हीआरएसचा करार करण्यात आला. मुंबई, ठाणे येथील औद्योगिकरणाला उतरती कळा लागलेली आहे. याचे प्रमुख कारण असे आहे की, शासनाची भीती राहिलेली नाही

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26596 ...... श्री. जितेंद्र आव्हाड ....

त्यामुळे अनेक कारखाने बेकायदेशीरपणे बंद केले जात आहेत. त्या ठिकाणच्या जमिनी विकल्या जात आहेत. कामगारांची देणी दिली जात नाहीत. याच सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी असे जाहीर केले होते की, जोपर्यंत कामगारांची देणी दिली जात नाहीत तोपर्यंत इंचभरही जमीन विकू देणार नाही. ज्या कंपन्यांनी बेकायदेशीर क्लोजर केलेले आहे त्या कंपन्यांच्या बाबतीत शासन काय भूमिका घेणार आहे आणि कोणत्या कायद्याव्दारे त्यांच्यावर कारवाई करणार आहे ? बेकायदेशीर क्लोजर केल्यानंतर जी व्ही.आर.एस. योजना लागू केली ती अवैध ठरविणार काय ? त्या ठिकाणी क्लोजरची परमीशन न घेता किंवा शासनाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता जर बांधकाम सुरु असेल आणि कामगारांची देणी दिली नसतील तर त्याबाबत शासन कारवाई करणार काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, स्टॅण्डर्ड अल्कली या कंपनीतील काही उत्पादने ही हजर्डस केमिकल असल्यामुळे उत्पादित करण्यास शासनाने मनाई केली. त्या खात्यातील काही कामगार कमी करीत असताना स्थानिक कामगारांना कमी केले गेले आणि त्यातून तो लढा निर्माण झाला. आम्हाला त्या ठिकाणी प्राधान्याने नोकऱ्या द्याव्यात यासाठी आंदोलन सुरु झाले असताना आजूबाजूच्या गावातील लोक स्थानिक कामगारांच्या मदतीला आले. त्यांनी कायम स्वरुपी कामगारांना कामावर जाण्यास मनाई केली. पर्यायाने त्या ठिकाणी कारखान्यामध्ये प्लँट चालू करण्यासाठी मजूर नव्हते तसेच क्लोरीन हा अतिशय घातक वायू तेथील टाकीमध्ये साठविण्यात आला होता. अशा परिस्थतीमध्ये हा कारखाना बंद झाला. त्याला शासनाने मंजुरी दिली नव्हती परंतु युनियनबरोबर वाटाघाटी चालू असताना त्यांच्या आणि व्यवस्थापनाच्या संगनमताने अशा प्रकारचा मार्ग निघाला आणि सर्वांनी व्ही.आर.एस. घेतली.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, बेलापूर पट्टयातील हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. स्टॅण्डर्ड अल्कली कंपनी बंद केल्यामुळे हजारो कामगार बेरोजगार झालेले आहेत. त्या ठिकाणी व्यवस्थापनाने कामगारांवर दबाव आणला. तुम्ही जर व्यवस्थापनाचे म्हणणे ऐकले नाही, तुम्ही जर तुमचे पैसे घेतले नाही, तुम्ही जर व्ही. आर. एस. स्वीकारली नाही तर तेही पैसे देणार नाही अशा प्रकारचा दबाव आणला. गावकरी एक दोन महिने आंदोलन करीत होते. परंतु कंपनीच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26596 ......

व्यवस्थापनाने अगोदरच टाळेबंदी केली होती. एम.आय.डी.सी.तील अशा काही कंपन्या अल्प दरामध्ये जागा घेतात आणि नंतर कंपनी बंद करुन सोडून जातात. तेथील शेतकरी त्या ठिकाणी कामगार म्हणून काम करीत असतात. अशा ज्या कंपन्या अल्प दरामध्ये जागा घेऊन नंतर निघून जातात त्यांच्यावर शासन काही कारवाई करणार काय ?

श्री. गणेश नाईक : त्या ठिकाणी सर्व कामगारांनी व्ही. आर. एस. घेतली आहे. त्याचा प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युईटी याच्या व्यतिरिक्त कमीतकमी 6 ते 7 लाख रुपये आणि जास्ती जास्त 10 ते 12 लाख रुपये एवढी रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद आव्हाड तसेच सन्माननीय सदस्य श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, अल्प दरामध्ये जमिनी घेऊन कारखाने उभे केल्यानंतर, नफा मिळविल्यानंतर काही मालकांनी आपल्या जमिनी विकावयास काढलेल्या आहेत. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये कामगारांची देणी दिल्याशिवाय त्या जमिनीचा विनियोग करता येणार नाही अशी अट शासनाने घातलेली आहे. भविष्य काळामध्ये कोणत्याही कामगाराला वंचित राहावे लागणार नाही अशी शासनाची ठोस भूमिका आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या ठिकाणी फार मोठे मासलेवाईक उत्तर माननीय कामगार मंत्र्यांनी दिलेले आहे. हे मासलेवाईक उत्तर आहे असे मी यासाठी म्हणतो की, त्या कारखान्यामध्ये टाळेबंदी करुन कामगारांना बाहेर ठेवले आणि एक प्रकारे कामगारांवर दबाव आणला तसेच टाळेबंदी करुन त्या ठिकाणी कामगारांसाठी स्वेच्छा निवृत्ती योजना म्हणण्यापेक्षा जबरदस्तीने निवृत्ती घेण्याची योजना राबवून तो कारखाना बंद करण्यास शासनाने परवानगी दिली असे चित्र माझ्या नजरेसमोर दिसते. हा प्रश्न गंभीर आहे. एक तर ती जागा एम. आय. डी. सी. मध्ये आहे. त्या ठिकाणी टाळेबंदी झाली. टाळेबंदी पाठोपाठ व्ही.आर.एस. आली. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, "व्यवस्थापनाने कामगार संघटनेबरोबर स्वेच्छानिवृत्ती करार करुन सर्व कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली असल्याने आता टाळेबंदी उठविण्याचा प्रश्न उद्भवत नाही."

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 26596... (श्री. मधुकर सरपोतदार...

प्रश्न असा निर्माण होतो की, टाळेबंदी उठवून नंतर स्वेच्छा निवृत्तीची संपूर्ण योजना आखणे हे कायदेशीर आहे की, टाळेबंदी करुन कामगारांना बाहेर ठेवून त्यांच्यावर स्वेच्छा निवृत्ती लादून त्यांना बेकार करणे हे कायदेशीर आहे ?

श्री. गणेश नाईक : टाळेबंदी झालेली आहे. टाळेबंदीला शासनाने मान्यता दिलेली नाही. टाळेबंदी कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे हा प्रश्न न्यायालयापुढे येऊ शकेल. त्या ठिकाणची टाळेबंदी उठविण्याच्या दृष्टीने मी स्वत: व्यवस्थापन आणि कामगार प्रतिनिधी यांच्या सोबत तीन वेळा बैठका घेतल्या. कामगार युनियनचे म्हणणे असे होते की, सर्व कामगारांना कामावर घ्यावे. व्यवस्थापनाचे म्हणणे असे होते की, कारखान्यातील काही खाती बंद असल्यामुळे सर्व कामगारांना कामावर घेतले तर कारखाना चालविणे शक्य होणार नाही. त्यामुळे कामगार कपात मान्य करावी, त्या कामगारांचे हिशेब देण्याची तयारी आहे. या गोष्टीला कामगार संघटना परवानगी द्यायला तयार नव्हती आणि मॅनेजमेंट देखील मागे येण्यास तयार नव्हती. अशा स्थितीमध्ये कारखाना चालू राहिला तर शेवटी व्यवस्थापनाकडे कामगारांची देणी देण्यासाठी कोणतीही गंगाजळी शिल्लक राहिली नसती ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. म्हणून कामगार युनियन आणि व्यवस्थापन या दोघांनी एकत्र बसून यातून मार्ग काढावा असे मी त्यांना सांगितले. कामगार युनियन आणि व्यवस्थापन यांनी कोणाच्याही दबावाखाली निर्णय घेतलेला नाही. या कारखान्याला दिलेली जागा महाराष्ट्र शासनाची असून ती कारखान्याला लीजवर दिलेली आहे. युझर चेंज करुन त्या ठिकाणी अन्य स्वरुपाचे उद्योग काढण्यास शासनाने मुभा दिलेली आहे. आता कामगारांची तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे टाळेबंदी उठविण्या आधी किंवा नंतर कामगारांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली हा विषय गौण ठरतो. या प्रकरणी कामगार आणि मालक यांच्यामध्ये चर्चा होऊन स्वेच्छा निवृत्तीस स्वीकृती दिलेली आहे.

श्री. संजय दत्त : ज्या मालकांनी कामगारांची देणी दिलेली नाहीत त्या मालकांना बांधकामाची परवानगी दिली जाणार नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. ठाण्यातील डब्ल्यूजी फोर्ज कंपनीला क्लोझरची परवानगी दिलेली असून त्या कंपनीने कामगारांची देणी दिलेली नाहीत. असे असताना त्या ठिकाणी बांधकाम करण्याची परवानगी कशी काय देण्यात आली. ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 26596...

श्री. गणेश नाईक : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी हा विषय माझ्याकडे मांडावा. त्या कंपनीच्या कामगारांवर अन्याय झाला असेल तर तो दूर करण्याचा मी निश्चित प्रयत्न करीन.

श्री. प्रकाश शेंडगे : ठाणे-बेलापूर पट्टयामध्ये उद्योगासाठी सवलती जाहीर केल्यानंतर अनेक उद्योजकांनी त्या ठिकाणी कारखाने काढले. आज त्या भागातील 50 टक्क्या पेक्षा जास्त कारखाने बंद आहेत. या बंद असलेल्या कारखान्यांपैकी किती कारखान्यांना क्लोझरची परवानगी दिलेली आहे ? ज्या उद्योजकांनी क्लोझरची परवानगी न घेता कारखाने बंद केलेले आहेत त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? या उद्योजकांना स्वस्त दराने दिलेल्या जमिनी शासन परत घेणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : तेथील कारखाने बंद झालेले आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु ब-याचशा कारखान्यांच्या ठिकाणी अन्य उद्योग सुरु झालेले आहेत. पूर्वी जेथे केमिकल कारखाने होते त्या ठिकाणी आय.टी.सेंटर्स् सुरु झालेली आहेत. काही ठिकाणी मॉल्स उभे राहिलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न हा विस्तृत स्वरुपाचा आहे. त्यांनी जर स्पेसिफिक प्रश्न विचारला तर त्याबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. कामगारांची देणी दिल्या शिवाय मालकाला कोणत्याही प्रकारचे बांधकाम करायला परवानगी दिली जाणार नाही.

.....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ KGS/ 12:10

ता.प्र.क्र.26596........

ॲड.अनिल परब : माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, माझ्या दालनामध्ये बैठका झाल्या होत्या. ज्यावेळेला युनियनने मागणी केली की, सर्व कामगारांना कंपनीत घेतले पाहिजे. परंतु व्यवस्थापनाने सांगितले की, सर्व कामगारांना आत घेता येणार नाही, कारण आम्ही काही खाती बंद केली आहेत. कामगार मंत्री या नात्याने मंत्रीमहोदयांना जे अधिकार आहेत त्या अधिकारामध्ये या कंपनीला क्लोजर परवानगी नाकारता आली असती, मंत्रीमहोदयांनी ही परवानगी नाकारली की नाही? कागदोपत्री रेकॉर्डवर नेमकी काय वस्तुस्थिती आहे? ज्या कामगारांना कंपनीत घेण्यास कंपनीने नकार दिला त्या संदर्भात कामगार खात्याच्या वतीने कामगारांच्या बाजूने निर्णय देता आला असता. तसा मंत्रीमहोदयांना अधिकार आहे. त्या अधिकाराचा मंत्रीमहोदयांनी वापर केला का?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, ज्यावेळी कामगार आणि व्यवस्थापन यांचे संगनमत झ ाले, त्यांच्या संमतीने त्यांनी करार केला. त्या करारामध्येच एकूण मागच्या संपकाळातील वेतन, टाळेबंदी, सस्पेंशन याबाबत दोघांनी मिळून प्रश्न संपुष्टात आणले. त्यामुळे अंतिम टप्प्यात व्यवस्थापनाला अडचण भासू नये म्हणून टाळेबंदीला परवानगी दिली.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कंपनीने जागा शेतकऱ्यांकडून घेतली होती. ज्या कारणासाठी जागा घेण्यात आली ते कारण आता संपुष्टात आले आहे. कंपनीचे प्रॉडक्शन बंद झाले असल्यामुळे ती जागा पुन्हा शेतकऱ्यांना देण्यासाठी शासन कोणती कारवाई करणार आहे? एखादी नवीन कंपनी ही जागा विकत घेऊन त्या जागेवर प्रॉडक्शन करणार असेल तर स्टॅण्डर्ड अल्कली कंपनीला होणा-या नफ्याचा मोबदला स्थानिक शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे का?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, कंपनीच्या व्यवस्थापनाने कॉस्टिक क्लोरिनचे उत्पादन बंद केले आहे. सध्याची जागा कोणाला विकलेली नाही. व्यवस्थापन नवीन कारखाना काढणार आहे का याची प्रतिक्षा केली पाहिजे.

-------------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात पब्लिक स्कूलच्या धर्तीवर मॉडेल शिक्षण संस्था उभारण्याबाबत**

**(५) * २४६५६ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे :** सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रात पब्लिक स्कूलच्या धर्तीवर मॉडेल शिक्षण संस्था उभारण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षण संस्थेत मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी सरकारच भरेल, हे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे व सदर शिक्षण संस्था केव्हापर्यंत कार्यान्वित करण्यात येणार आहेत ?

**प्रा.वसंत पुरके** : (१) नाही,

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सध्या बाब प्रस्तावित नसली तरी भविष्यात शासन यासंबंधी विचार करणार आहे का? तसा विचार झाल्यास यासंबंधी शासनाची योजना काय असणार आहे? यासंबंधी केंद्र सरकारकडून योजना प्राप्त झाली आहे का?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, ज्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत, अनौपचारिक शाळा निर्माण झाल्या आहेत त्याच व्यवस्थित चालाव्यात एवढ्यापुरती ही योजना आहे. दुसरा कोणताही प्रस्ताव नाही.

श्री.श्रीकांत जोशी : मॉडेल शिक्षण संस्था याचा अर्थ आदर्श शिक्षण संस्था असे म्हटले जाते. या आदर्श शिक्षण संस्थेचा कारभार पाहून इतर संस्थांचा कारभार सुधारावा असे अपेक्षित आहे. परंतु सरकारचा नकारात्मक दृष्टीकोन का? औरंगाबाद जिल्हयात एकही चांगली शाळा नाही. पब्लिक स्कूल आदर्श होते. केंद्र शासनाने नवोदय विद्यालय निर्माण केले तशी महाराष्ट्रात एक तरी चांगली शैक्षणिक संस्था आहे का? आदर्श शाळा सुरु करण्यासाठी आर्थिक अडचण वगळता इतर कोणत्याही अडचणी येणार नाहीत.

प्रा.वसंत पुरके : आहेत त्या शाळांची स्थिती अतिशय निराशाजनक आहे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती कशी वाढेल, त्यांची शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढेल हीच भूमिका शासनाने स्वीकारली आहे. मॉडेल स्कूलचा कोणताही प्रस्ताव नाही.

..३..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२४६५६.............

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, १९६७ साली गव्हर्मेंट पब्लिक स्कूल सुरु झाले. मॉडेल स्कूलचे उदाहरण दिले तो भाग वेगळा आहे. सन्माननीय श्री.मधुकरराव चौधरी यांनी गव्हर्मेंट पब्लिक स्कूल सुरु केले होते. मी त्याच शाळेतील विद्यार्थी आहे. ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घ्यायची आणि त्यांना या शाळेत आणून चांगले शिक्षण द्यायचे, त्यांचे व्यक्तिमत्व सुधारावे अशा भूमिकेतून नाशिक, सातारा, औरंगाबाद आणि चिखलदरा याठिकाणी गव्हर्मेंट पब्लिक स्कूल सुरु झाले. आजही त्या शाळांची २८-२९ वर्षातील उपलब्धी विचारात घेता त्या शाळांमधून बाहेर पडलेले विद्यार्थी शासनाच्या वेगवेगळया खात्यांमध्ये उच्चपदावर कार्यरत आहेत. आज त्या शाळांची जी दुरावस्था आहे त्याकडे शासन लक्ष देणार आहे का? अशा प्रकारच्या शाळांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिक ठिकाणी ज्याला शासकीय विद्यानिकेतन किंवा गव्हर्मेंट पब्लिक स्कूल म्हणतो अशा शाळा सुरु करणार आहात काय?

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :24656** .........

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, राज्यात केंद्रसरकारच्या योजनेतून नवोदय विद्यालय, शासकीय विद्यानिकेतन चालविले जातात. या शाळांना मुलभूत सुविधा, शाळेला शिक्षकांचा स्टाफ, शाळेतील विद्यार्थ्यांची उपस्थिती तसेच विद्यार्थ्यांना सुविधा देण्यासाठी शासन विशेष लक्ष देत आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मंत्री महोदय का उत्तर सुनकर बहुत अफसोस हो रहा है, क्योंकि "पब्लिकस्कूल च्या धर्तीवर" का कॉंस्पेस्ट यह है कि स्कूल का दर्जा अच्छा हो. माननीय सदस्य श्रीकांत जोशी ने आदर्श स्कूल के निर्माण के बारे में पूछा तो आपने कहा कि स्थिति निराशाजनक है. हमारे स्कूलों का दर्जा सुधरे, हमारे स्कूल आदर्श स्कूल हों, इसलिए शासन क्या प्रयास करने वाला है ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा , त्यांचे लेखन, वाचन तसेच त्यांची गुणवत्ता सुधारावे यासाठी सभागृहाचे अनुकूल मत हवे आहे. नवोदय विद्यालय, शासकीय विद्यानिकेतन या शाळा चांगल्या प्रकारे चालाव्यात यासाठी आम्हाला सर्व लोकप्रतिनिधींची मदत हवी आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ठराविक विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळया शाळा काढण्याला विरोध आहे. निरक्षरतेचे प्रमाण ज्या ठिकाणी जास्त आहे त्या ठिकाणी केंद्रसरकारने कस्तुरबा स्कूल, मॉडेल स्कूल काढलेले आहेत. या शाळांवर राज्यसरकारचे नियंत्रण असते त्यामुळे अशा प्रकारच्या शाळा किती काढल्या आहेत तसेच या शाळा कोणाला दिलेल्या आहेत?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना माहिती हवी असेल तर त्यांना ती दिली जाईल.

---------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. नंदकुमार जत्रे यांनी अधिकाराचा गैरवापर करुन मुरबाड शहरातील बसस्थानकासमोर नियमबाह्य बांधलेल्या व्यापारी गाळ्यांना मंजूरी दिल्याबाबत**

**(६) * २४८०३ श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **उद्योगमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. नंदकुमार जत्रे यांनी अधिकाराचा गैरवापर करुन मुरबाड शहरातील बसस्थानकासमोर नियमबाह्य बांधलेल्या व्यापारी गाळ्यांना मंजूरी दिल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी डिसेंबर, २००६ या महिन्यात विभागीय आयुक्त (कोकण) यांचेकडे निवेदन देऊन खुलासा मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, श्री जत्रे यापूर्वी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असतांना सुध्दा असेच नियमबाह्य कामांना मंजूरी दिल्याप्रकरणी प्रकरण शासनस्तरावर विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे तद्नुसार या प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) नाही,

मात्र मुरबाड शहरालगत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २२२ लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर १९ जणांनी अतिक्रमण करुन व्यावसायिक कामाकरीता अनधिकृत गाळे बांधले असल्याबाबत मा.श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी विभागीय आयुक्त (कोकण) यांना दिनांक १९.९.२००६ रोजी पत्र दिले आहे.

(२) या व्यापारी गाळयांना ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी मंजूरी दिलेली नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) व (४) होय,

आयुक्त, औरंगाबाद यांच्या अहवालानुसार आवश्यक ती कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत सुरु आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, हा विषय गेल्या वर्षभरापासून गाजत आहे. डीपीडीसीच्या मिटींगमध्ये अनेक आमदारांनी हा विषय उपस्थित केलेला आहे. परंतु त्याला ज्या पध्दतीने शासनाकडून उत्तर मिळावयास पाहिजे होते ते मिळाले नाही तसेच जिल्हा अधिकारी आणि पालक मंत्र्यांकडून सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात योग्य उत्तर न मिळाल्यामुळे या ठिकाणी आम्हाला प्रमश्न उपस्थित करावा लागलेला आहे. मुरबाड शहीरालगत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 222 लगत बेकायदेशीर गाळे बांधण्यात आलेले आहेत. हे गाळे अनाधिकृत आहेत असे उत्तरात सुध्दा म्हटलेले आहे. वेळोवेळी ही बाब निदर्शनास आणून देऊन सुध्दा त्यावर काहीही कार्यवाही

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : २४८०३ .........

श्री. संजय केळकर.....

झालेली नाही. या विषयाला न्याय मिळावा यासाठी आम्ही कोकण आयुक्तांकडे पत्रव्यवहार केलेला आहे, डीपीडीसीच्या मिटींगमध्ये सुध्दा हा मुद्दा उपस्थित केलेला आहे असे असून सुध्दा या ठिकाणच्या बेकायदेशीरपणे बांधण्यात आलेल्या गाळयांवर काही सुध्दा कारवाई होत नाही. त्यामुळे या पुढील काळात तरी शासनाकडून यासंदभार्त कारवाई होणार आहे काय?

श्री. राणा रणजितसिंह पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी बेकायदेशीरपणे गाळे बांधण्यात आलेले आहेत याबद्दल दुमत नाही. या ठिकाणी जे बेकायदेशीर गाळे बांधण्यात आलेले आहेत ते तोडण्यासाठी नोटीस सुध्दा दिलेली आहे. तसेच दोन वेळेस हे गाळे तोडण्यासाठी पोलिसांची मदत सुध्दा घेण्यात आली होती.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, हे गाळे बेकायदेशीर बांधण्यात आलेले असल्यामुळे संबंधित गाळे पाडण्याची नोटीस दिलेली होती. हे गाळे बेकायदेशीर असल्यामुळे ते कधी पाडणार आहेत याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी द्यावयास पाहिजे. त्यामुळे सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे आहे.

**सभापती** : उत्तर योग्य दिले जात नसेल तर मी निश्चितपणे हस्तक्षेप करीन.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, उत्तरात म्हटले आहे की,"मात्र मुरबाड शहरालगत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 222 लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर 19 जणांनी अतिक्रमण करुन व्यावसायिक कामाकरीता अनाधिकृत गाळे बांधले असल्याबाबत माननीय श्री. संजय केळकर यांनी विभागीय आयुक्त(कोकण) यांना दिनांक 19.9.2006 रोजी पत्र दिलेले आहे." तसेच यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आला होता की, ठाणे जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. नंदकुमार जंत्रे यांनी अधिकाराचा गैरवापर करुन या गाळयांना मंजुरी दिलेली आहे काय? या प्रश्नाला " तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिली नाही त्यामुळे कारवाईचा प्रश्नच उद्भवत नाही असे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे हे काय उत्तर झाले काय?

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा रणजितसिंह पाटील : सभापती महोदय, प्रश्न असा विचारण्यात आला होता की, ठाणे जिल्हयाचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री. जंत्रे यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन बेकायदेशीर गाळयांना मंजूरी दिली आहे काय? त्यामुळे यासंदर्भात "नाही" असे उत्तर देण्यात आलेले आहे. तत्कालीन जिल्हाधिका-यांचा यामध्ये काहीही संबंध नाही. यांसदर्भात काय झालेले आहे त्याची माहिती खाली देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24803.....

श्री.मधुकर चव्हाण : सभापत महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अतिशय मुद्देसूद प्रश्न विचारलेला आहे. मान्यता नसलेले अनधिकृत गाळे त्वरित पाडण्यात येतील असे उत्तरात नमूद केले पाहिजे होते. सरकारने श्री.गोविंद स्वरुप यांच्या बाबतीत सुध्दा दोन वर्षे घोळ घातला आणि श्री.जत्रे यांच्याही बाबतीत असाच घोळ सरकार घालत आहेत. उत्तरात म्हटले आहे की, ".... आयुक्त औरगांबाद यांच्या अहवालानुसार आवश्यक ती कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेमार्फत सुरु आहे." माझे मंत्रिमहोदयांना प्रश्न आहेत की, श्री.जंत्रे यांच्यावर कोणते आरोप ठेवण्यात आलेले आहेत ? ही कार्यवाही केव्हापासून सुरु आहे ? एखाद्या चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याने घोटाळा केला तर त्याला दुसऱ्या दिवशी घरी बसविले जाते. आय.ए.एस. अधिकारी सरकारचे जावई आहेत का ? तेव्हा श्री.जंत्रे यांना बडतर्फ करणार काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच स्पष्ट करतो की, आय.ए.एस.अधिकारी सरकारचे जावई नाहीत. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, विधानसभा सभागृहात हा प्रश्न उपस्थित झाला होता. त्यावेळी प्रश्न विचारण्यात आले होते की, ठाणे जिल्ह्यात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत काय ? बीड मतदार संघातील बीड व चौसाळा या ठिकाणी विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी स्थानिक विकास योजनेंतर्गत 45 लाख रुपयांचे नियमबाह्य बांधकाम मंजूर झाले का ? त्यावेळी वित्त व नियोजन मंत्रिमहोदयांनी खुलासा मागविला होता. चौकशीअंती असे समजले की, याप्रकरणात गैर असे काही घडले नाही म्हणून ती फाईल बंद करण्यात आली. त्यानंतर श्री.जत्रे यांच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक निवेदन आले त्याबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत चौकशी सुरु आहे...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून संरक्षण हवे. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी हा प्रश्न डिसेंबर 2006 मध्ये डीपीडीसीच्या बैठकीत उपस्थित केला होता. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, त्याठिकाणी अनधिकृत बांधकाम झालेले आहे हे मंत्रिमहोदयांनी सुध्दा मान्य केलेले आहे. उत्तरात म्हटलेले आहे की, ".... मुरबाड शहरालगत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 222 लगत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागेवर 19



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24803.....

श्री.दिवाकर रावते.....

जणांनी अतिक्रमण करुन व्यावसायिक कामाकरिता अनधिकृत गाळे बांधले असल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी विभागीय आयुक्त (कोकण) यांना दिनांक 19.9.2006 रोजी पत्र दिले आहे. या व्यापारी गाळ्यांना ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिलेली नाही त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही." उत्तरात "प्रश्न उद्‌भवत नाही" असे म्हटलेले आहे त्याचा अर्थबोध होत नाही. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, हे गाळे अनधिकृत आहेत, तेव्हा हे गाळे किती दिवसांत पाडण्यात येणार आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी अनधिकृत गाळे उभारण्यात आलेले आहेत यात दुमत नाही. दुसरा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली असा होता त्याचे उत्तर "प्रश्न उद्‌भवत नाही" असे देण्यात आलेले आहे........

( अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पहिल्या प्रश्नाचे उत्तर ठाणे जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी श्री.नंदकुमार जत्रे यांनी अशा पध्दतीच्या बांधकामास परवानगी दिलेली नाही असे आहे. त्याठिकाणी बेकायदेशीर बांधकाम झालेले आहे असे सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिलेले आहे. तेव्हा हे अनधिकृत बांधकाम केव्हा पाडणार आहात असा सन्मानीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचा सरळ प्रश्न आहे की, सरकार हे अनधिकृत बांधकाम केव्हा पाडणार आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, पंधरा दिवसांच्या आत हे बांधकाम पाडण्यात येईल.

---------------

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नवी मुंबई, ठाणे रायगड परिसरातील प्रदुषण करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(७) * २४७३७ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **पर्यावरणमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई, ठाणे व रायगड परिसरातील ज्या कंपन्या प्रदुषणाची मोठया प्रमाणावर वाढ करीत आहेत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी विरोधी पक्षनेता विधानपरिषद यांनी दिनांक २२ जून २००६ रोजी त्या कंपन्यांची नावे व पत्ते देवून त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे दिपक फर्टीलायझर्स आणि पेट्रोकेमिकल लि., मे.हिकल केमिकल्स इंडस्ट्रिज, मे. सविता केमिकल्स, मे. रॅलीज इंडिया लि. या व इतर कंपन्या मोठया प्रमाणावर प्रदुषण करीत असतांना देखील त्यांच्याविरोधात कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) कारवाई झाली असल्यास वा तपासणी झाली असल्यास त्याचे निष्कर्ष काय आहेत,

(४) कारवाई झाली नसल्यास ती केव्हा होणार आहे ?

**श्री. गणेश नाईक** : (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार सदर कारखान्यांनी स्वत:ची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आहे. तसेच प्रक्रियाकृत सांडपाणी तळोजा व ठाणे बेलापूर येथील औद्योगिक वसाहतीतील सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात पुढील प्रक्रियेसाठी पाठविले जाते. प्रदूषण नियंत्रण यंत्रणा अस्तित्वात असल्याने कारवाई केलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नवी मुंबई, ठाणे परिसरातील तळोजा औद्योगिक क्षेत्रात असलेल्या कारखान्यातील सांडपाण्यामुळे व दुषित पाण्यामुळे तेथील काही शेतकऱ्यांनी व नागरिकांनी माझ्याकडे तक्रारी दिल्या होत्या. मे. दीपक फर्टीलायझर्स आणि मे.दीपक पेट्रोकेमिकल लि., मे.हिकल केमिकल्स इंडिस्ट्रिज, मे.सविता केमिकल्स, मे.रॅलीज इंडिया, मे.कोरोमंडल फर्टीलायझर्स व मे.गॅलेक्सी लिमिटेड या कारखान्यांच्या बाबतीत तक्रारी दिलेल्या आहेत. याबात मी संबंधित विभागाकडे चौकशी केली असता, विभागाकडून अशी माहिती मिळाली की, उक्त कारखान्यांपैकी कुठल्याही कारखान्यातून दुषित पाणी निघत नाही, त्यामुळे त्या कारखान्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. परंतु तेथ्ील नागरिकांनी याबाबत माहिती दिलेली आहे. आज उक्त सातही कारखान्यांतून 4 दशलक्ष लिटर पाणी बाहेर टाकले जात आहे. त्या परिसरामध्ये या सात कारखान्यांबरोबरच एकूण 14 हजार कारखाने आहेत. या सर्व 14 हजार कारखान्यांतून पाणी बाहेर फेकले जात आहे. त्या बाहेर टाकलेल्या दुषित पाण्यावर

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24737.....

श्री.पांडुरंग फुंडकर...

कुठल्याही प्रकारची प्रक्रिया होत नाही, अशाप्रकारची तेथील नागरिकांची तक्रार आहे. परंतु याठिकाणी आपण उत्तरामध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार प्रदुषण होत नसल्याचे सांगितलेले आहे. आपण प्रदुषण मंडळाच्या माहितीवर विश्वास ठेवता, परंतु नागरिकांनी तक्रारी करुनही आपण त्यांना न्याय देत नाहीत, हे योग्य नाही. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, आपण उक्त सात कारखाने व तळोजा औद्योगिक क्षेत्रातील जे कारखाने सांडपाणी व दुषित पाणी सोडतात, त्यांची चौकशी करुन त्या कारखान्यांवर कारवाई करणार का ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी 7-8 कारखान्यांसंबंधी प्रश्न उपस्थित केले. त्यामध्ये मे.दीपक फर्टीलायझर्स, मे.दीपक नाएट्रेट केमिकल्स आणि मे.गॅलेक्सी हे कारखाने तळोजा औद्यागिक क्षेत्रातील असून मे.सविता केमिकल्स, मे.कोरोमंडल फर्टीलायझर्स हे दोन कारखाने ठाणे-बेलापूर पट्टयातील आहेत व पारले ब्रेवेरिज हा कारखाना मुंबईत असून सध्या तो बंद पडलेला आहे. त्यामुळे त्याठिकाणच्या प्रदुषणाचा प्रश्न नाही. तळोजा व ठाणे-बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना आपण सक्तीने ई.टी.पी. बसविण्यास सांगिलेले आहे. त्यांनी ट्रीट केलेले पाणी पाईपलाईनद्वारे सी.ई.टी.पी.मध्ये आणले जाते व त्याठिकाणी त्यांवर सार्वत्रिक प्रक्रिया केली जाते, तसेच ते पाणी ट्रीट केल्यानंतर समुद्रामध्ये सोडले जाते. याबाबतीतील दोन पत्रे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एमपीसीबीला दिली होती. त्यामुळे सर्व कारखान्यांची माहिती आम्ही मागवून घेतली होती. याबाबतची पाहणी करण्याच्या दृष्टीने आमच्या विभागाचे अधिकारी वारंवार त्याठिकाणी जात असतात. कधी कधी असे होते की, बाहेरचे टँकर येऊन त्याठिकाणी नदीच्या पात्रामध्ये धुतले गेल्यामुळे मासे मेल्याचे आपण पाहिलेले आहे. अशाचप्रकारे तळोजा औद्योगिक क्षेत्रामध्ये टँकर धुतल्यामुळे मासे मेले होते, याबाबतची माहिती मी स्वत: भेट देऊन घेतली होती. परंतु आजच्या स्थितीमध्ये तळोजा औद्योगिक परिसरामध्ये व ठाणे-बेलापूर औद्योगिक परिसरामध्ये सामुहिक प्रक्रिया ट्रीटमेंट करण्याच्या दृष्टीने सयंत्रे कार्यरत आहेत, त्यामुळे त्याठिकाणी अशाप्रकारचा प्रश्न निर्माण झालेला नाही, एवढे मी सांगू इच्छितो.

..3.....



SSP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री.अजित.... 12:25

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सांडपाण्याची प्रक्रिया करण्याची क्षमता तळोजा येथे 10 दशलक्ष लिटरची प्रतिदिन आहे, ठाणे व बेलापूर येथे याबाबतीतील क्षमता 27 दशलक्ष लिटरची आहे. अशाप्रकारे एकूण 37 दशलक्ष लिटरची प्रतिदिन क्षमता आहे. असे असताना प्रत्यक्षात 100 दशलक्ष लिटर पाण्यांवर प्रक्रिया कशी काय होते ? कारण त्याठिकाणी तेवढी क्षमताच नाही. त्यामुळे याबाबतीतील नियमाप्रमाणे बी.ओ.डी. तपासली पाहिजे, ती आपण तपासावी व ज्या कारखान्यांचे पाणी आपण सोडता त्यांची बी.ओ.डी. ही किती दिवसांत तपासली जाते ? व ती तपासल्यानंतर ती योग्य होती का ? तसेच, त्याचा रिपोर्ट काय आला ? याचीही माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी असा प्रश्न विचारला की, केमिकल कंपन्यांमधून ।सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाण जास्त आहे आणि त्यावर प्रकिया करणारी जी CETP यंत्रणा आहे त्या यंत्रणेची क्षमता कमी आहे. CETP ची क्षमता कमी असेल तर सर्व सांडपाण्यावर प्रक्रिया कशी होते ? मी त्या संदर्भात सांगू इच्छितो की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार सदर कंपन्यांची स्वत:ची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आहे . या प्रत्ये कंपनीने आपल्या यंत्रणेचा वापर करावयाचा असतो. दूध पॅकींग करणारी जी कंपनी आहे त्या कंपनीसही CETPउभारण्यास सांगितले आहे. आज ठाणे बेलापूर एम.आय.डी. सी्. क्षेत्रासाठी CETP 1आणि CETP 2 अशी यंत्रणा सुरु असल्यामुळे सांडपाण्यावर प्रकिया करणारी जी यंत्रणा आहे तिची क्षमता वाढलेली आहे.तसेच BOD संबंधी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत असे सांगू इच्छितो की, केमिकल कंपनीने सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्या पाण्याचे नमूने तपासले जातात आणि त्याची लॅबोरेटरीमध्ये ॲनालिसिस केले जाते. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी CETP ची जेवढी क्षमता आवश्यक आहे त्यापेक्षा जास्त क्षमता सध्या आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय त्या संदर्भात निश्चित माहिती द्यावी.

श्री. गणेश नाईक सभापती महोदय, संबंधित माहिती पटलावर ठेवण्यात येईल. कंपन्यांनी प्रक्रिया केल्यानंतर पाण्याचे नमूने घेतले जातात व त्यातील BODची तपासणी करुन आक्षेपार्ह आढळल्यास संबंधित कंपन्यांना नोटीसेस दिल्या जातात. केमिकल कंपन्यांची स्वत:ची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बिघडली तरी त्यांना नोटीस देण्यात येते व त्या पाण्यावर CETP कडून प्रक्रिया केली जाते. त्यामुळे मी येथे सांग,इच्छितो की, सांडपाण्याच्या प्रक्रियेबाबत पूर्वी जी परिस्थिती होती तशी परिस्थिती आज राहिलेली नाही. ठाणे, बेलापूर या पटट्यामध्ये आता मॅंग्रोव्हजची वाढ झालेली आहे व पूर्वी तेथे जी दुर्गंधी होती ती देखील आता कमी झालेली आहे. मी त्या पट्टयातीलच असल्यामुळे मला या विषयी अधिक माहिती आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या ज्या 8 केमिकल कंपन्या आहेत त्या स्वत:चे ETP बंद ठेवतात आणि सांडपाणी CETP मध्ये पाठवितात. या कंपन्यामधील सांडपाण्याची BOD टेस्ट झालेली आहे का ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ..... ता.प्र. क्र.24737

गेल्या सहा महिन्यातून किती वेळा ही टेस्ट केलेली आहे ? त्या टेस्टचे रिपोटर्स काय आहेत ? , या कंपन्यांचे ETP बंद असून त्यांचे सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ते ATP मध्ये सोडले जाते. त्या ऐवजी सांडपाण्यावर आधारित 500 मेगावॅटचा थर्मल पॉवरचा प्रोजेक्ट उभारला तर ते जास्त योग्य होईल.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, मासे मरण्याबाबत कोणतीही तक्रार अजून आलेली नाही. या कंपनीच्या सांडपाण्याची तपासणी केली जाते. परंतु त्या संदर्भात प्रत्येक कंपनीची विस्तृत माहीती सध्या माझ्याजवळ नाही. या प्रत्येक कंपनीचे स्वत:चे ETP आहेत. त्यांचे ETP बंद असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाते. या कंपन्यांचे ATP मधून निघालेल्या पाण्यावर CETP मध्ये प्रक्रिया केली जाते.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे यांनी या संदर्भात लक्षवेधीची सूचना सभागृहात मांडली होती. पावसाळयामध्ये तळोजा परिसरामधील कंपन्यांच्या प्रक्रिया न केलेल्या सांडपाण्यामुळे हजारो मासे मेले होते. सन्माननीय मंत्री महोदयानी उत्तरात सांगितले की, एका टँकरने आपली टँक त्या पाण्यात धुतली त्यामुळे तेथील मासे मेले. अशी घटना आतापर्यंत 2 ते 3 वेळा घडलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, त्या कारखान्यामध्ये जाऊन काही अधिकाऱ्यांनी टँकरचा बहाणा तयार केला व चुकीची माहीती सन्माननीय मंत्री महोदयांना दिली. त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर काही कारवाई करणार आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, परराज्यातून आलेल्या एका टँकर मालकाने आपली टँक त्या पाण्यात धुतली व त्या टँकरच्या केमिकलमुळे त्या पाण्यातील मासे मेले हे खरे आहे.

अधुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. रोझेकर...

**ता.प्र.क्र.24737 पुढे सुरु**..........

श्री.गणेश नाईक.........
परंतु, ही गेल्या वर्षीची घटना आहे व त्या अनुषंगाने संबंधित घटकांवर कारवाई केलेली आहे. पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेत आहोत.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

---------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्रीमती प्रमिला भानुशंकर याज्ञिक, माजी वि.प.स.व मंत्री यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव

डॉ.विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, श्रीमती प्रमिला भानुशंकर याज्ञिक, माजी विधान परिषद सदस्या व मंत्री यांच्या निधनाबद्दल मी खालील शोकप्रस्ताव मांडतो :-

"कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक, माजी वि.प.स.व मंत्री यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते."

सभापती महोदय, कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक यांचा जन्म 11 जुलै 1921 रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे शिक्षण इंटर पर्यंत झाले होते.

कै.याज्ञिक यांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला होता. मुंबई मधील 'सी' वॉर्ड महिला काँग्रेसच्या अध्यक्षा, मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा, औदिच्छा महिला समाजाच्या अध्यक्षा, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ कार्याकारिणीच्या सदस्या, इंटरनॅशनल फिल्म सोसायटीच्या अध्यक्षा, सर्वोदय एज्युकेशन सोसायटीच्या तसेच 'स्त्री निकेतन' च्या अध्यक्षा म्हणून त्यांनी कार्य केले.

कै.याज्ञिक यांनी गुजराथी भाषेमध्ये कथा, कविता व लेख लिहिले. महिलांना गृहोद्योग मिळवून देण्यासाठी तसेच, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले.

कै.याज्ञिक 1974 मध्ये राज्यपालांव्दारा नामनियुक्त व 1980 मध्ये विधानसभा सदस्यांव्दारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाल्या होत्या. राज्याच्या मंत्रीमंडळामध्ये गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण, समाजकल्याण व आदिवासी कल्याण या खात्यांचे मंत्रीपद त्यांनी भूषविले होते.

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे सोमवार, दिनांक 2 एप्रिल 2007 रोजी दुःखद निधन झाले. मी व्यक्तिशः माझ्यातर्फे, माझ्या पक्षातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

-------------

..3........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, राज्याचे आदिवासी विकास मंत्री, डॉ.विजयकुमार गावित यांनी जो शोकप्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक या सन 1974 व सन 1980 मध्ये या सभागृहाच्या सदस्या होत्या. कै.याज्ञिक या गुजराथी भाषिक असल्याने साहजिकच सदनामध्ये मराठी भाषेत बोलतांना त्यांना अडचण येत होती. परंतु, या अडचणीवर मात करुन त्यांनी महिलांचे विविध प्रश्न मांडले होते. ज्यावेळी त्या सन 1980 मध्ये गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती सुधार मंत्री झाल्या त्यावेळी मी विधानसभेचा सदस्य होतो. त्यांचे काम मी अतिशय जवळून पाहिले आहे. गुजराथी भाषिक असतांना सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या वेळी उत्तर देत असतांना प्रश्नाला न्याय कसा देता येईल, असा त्यांचा सततचा प्रयत्न असायचा. कुठल्याही सन्माननीय सदस्याने प्रश्न विचारला की त्या सदस्याला अपेक्षित उत्तर व समाधान होईल असे उत्तर त्या देत असत. उत्तर देत असतांना "मी चौकशी करते" हे त्यांचे नेहमीचे वाक्य असायचे. वर्तमानपत्रातही त्यांच्या नावापुढे कंसामध्ये कधी कधी 'मी चौकशी करते' असे छापून येत असे. परंतु, त्या मराठी बोलण्याचा प्रयत्न करीत असत. गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती सुधार हे महत्वाचे खाते त्यांच्याकडे देण्यात आले होते. मंत्रीपदी असतांना मुंबईच्या गृहनिर्माण विषयक समस्या सोडविण्याचा त्यांनी विशेष प्रयत्न केला. स्वातंत्र्य संग्रामामध्ये सहभाग घेतला. विशेष करुन महिलांच्या चळवळीमध्ये त्यांनी विशेष सहभाग घेतला होता. एवढेच नव्हे तर, गुजराथी भाषेमध्ये सर्व प्रकारचे लेखन करुन त्यांनी गुजराथी वाङमयावर आपला ठसा उमटविला होता. मृदु स्वभाव आणि विनम्रता हे त्यांचे महत्वाचे दोन गुणविशेष होते. विधानसभा सदस्य किंवा विधान परिषद सदस्य त्यांच्याशी बोलण्यासाठी आला तर विनम्रपणे त्या त्यांच्याशी दोन शब्द बोलत असत. एवढे विनम्र असे हे आगळेवेगळे व्यक्तिमत्व होते. अशा या समाजसेविकेचे 2 एप्रिल 2007 रोजी निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व त्यांच्या कुटुंबियांना हे दु:ख पेलण्यासाठी परमेश्वर शक्ती प्रदान करो, अशी प्रार्थना करुन माझे दोन शब्द संपवितो.

---------------------

यानंतर कुमारी जयश्री..........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.विजयकुमार गावित यांनी या सभागृहामध्ये जो शोक प्रस्ताव मांडला त्या प्रस्तावाला समर्थन देण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे.

स्वर्गीय श्रीमती प्रमिला भानुशंकर याज्ञिक,माजी वि.प.स.व मंत्री यांच्या दु:खद निधनाबद्दल हा शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आला आहे. या शोकप्रस्तावास अनुसरुन सन्माननीय विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर यांनी देखील समर्थन व्यक्त केलेले आहे. मीही या प्रस्तावाला समर्थन देण्याकरिता उभा आहे. श्रीमती प्रमिला भानुशंकर याज्ञिक यांचा आणि माझा परिचय तसा चांगला होता. माझ्या सबंध आयुष्यात त्यांची आणि माझी दोन - तीन वेळा भेट झाली होती. विशेषत: त्या ज्यावेळी त्या गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती सुधार या खात्यावर मंत्री म्हणून निवडून आल्या होत्या त्यावेळी आमची आणि त्यांची हाऊसिंग बोर्डाच्या कारभारानिमित्त एक दोन वेळा बैठक झाली होती. सभापती महोदय, भाषेची अडचण ही फार मोठी अडचण आहे कारण त्या गुजराथी भाषिक होत्या तरीदेखील त्यांचा मराठी बोलण्याचा प्रयत्न सभागृहात तर असावयाचाच पण बाहेरही अगदी आटोकाट असावयाचा. श्री.भानुशंकर याज्ञिक हे श्रीमती प्रमिला भानुशंकर याज्ञिक यांचे यजमान स्वत: महाराष्ट्र राज्यात मंत्रिमहोदय म्हणून कार्यरत होते तसेच ते मुंबई कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते त्यामुळे या कुटुंबाचे मुंबई शहरातील जनतेशी अत्यंत जिव्हाळयाचे असे संबंध होते. आज हे दाम्पत्य आपल्यात नाही. या उभयंतांचे एक वैशिष्टय म्हणजे ते लोकांशी अतिशय विनम्रतेने बोलत असत व तसे वागतही असत. कोणाशीही कधीही कोणत्याही प्रकारचा संघर्ष न करणे व सतत मिळेल ते काम करीतच राहणे ही जी प्रवृत्ती त्या उभयंतांमध्ये होती ती अतिशय वाखाणण्याजोगी होती. गुजराथी समाजाचे एक वैशिष्टय म्हणजे ते कोणाच्याही अंगावर कधीही छोटया छोटया बाबींवरुन धावून जात नाही, समोरचा माणूस काय बोलत आहे किंवा त्याला काय बोलावयाचे आहे ते प्रथम ऐकून घेतील तसेच समजून घेण्याचाही प्रयत्न करतील व पटल तर ठीक आणि नाही पटल तर सोडून देतील पण विनाकारण कोणाशीही संघर्ष करण्याची प्रवृत्ती सहसा या समाजामध्ये आढळून येत नाही अशा या गुजराथी समाजाच्या वैशिष्टयाप्रमाणेच हे दाम्पत्य होते. आज हे दाम्पत्य आपल्यामध्ये नाही. पण त्यांच्या स्मृती पाठीमागे राहिलेल्या आहेत. कोणत्याही स्मृतीतील चांगले गुण घेऊन पुढे जावयाचे असते आणि शोक प्रस्तावाचा मुख्य उद्देश तोच असतो. त्या दृष्टीकोनातून मी एकच म्हणेन की, आम्ही आमच्या पक्षातर्फे व तद्वत या सदनातील अन्य

U - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

सन्माननीय सदस्य यांच्यातर्फेदेखील त्यांना अतिशय विनम्र अशी श्रध्दांजली अर्पण करतो. या दाम्पत्यामागे त्यांचे जे कुटुंबिय आहेत, त्यांना हे दु:ख सहन करण्याचे परमेश्वर सामर्थ्य देवो, अशी विनम्र प्रार्थना करुन आणि माझ्या सद्‌भावना व्यक्त करुन तसेच, आम्ही त्यांच्या दु:खामध्ये सहभागी आहोत असे त्यांच्या कुटुंबियांना कळविण्याची विनंती करतो. स्वर्गीय प्रमिला भानुशंकर याज्ञिक यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



JPK/ MHM/ KGS/ 12:40

प्रा.बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग,पदवीधर ) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री.विजयकुमार गावित यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला पाठिंबा व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

स्वातंत्र्यसंग्रामामध्ये पती पाठीशी आहे म्हणून किंवा पत्नी पाठीशी आहे म्हणून भाग घेतला अशी अनेक उदाहरण आपण ऐकत आलो आहोत परंतु उभयंतांनी स्वातंत्र्यसंग्रामामध्ये हिरीरीने भाग घेतल्याची व धडाडीने काम केल्याची मोजकीच उदाहरणे आपल्याला ऐकावयास मिळतील, त्यापैकीच श्री व श्रीमती भानुशंकर याज्ञिक दाम्पत्य हे एक असेच उदाहरण आहे. श्रीमती प्रमिला भानुशंकर याज्ञिक या सदनामध्ये दोन टर्म निवडून आल्या होत्या व सभागृहाच्या सदस्या म्हणून त्यांनी काम केलेले आहे. ज्यावेळेस त्या गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती सुधार यासारख्या गुंतागुंतीच्याखात्यावर मंत्री म्हणून निवडून आल्या त्यावेळेस मला त्यांचे काम जवळून पाहण्याची संधी मिळाली होती. श्रीमती याज्ञिक यांची जन्मभाषा मराठी नव्हती परंतु प्रत्येक वेळेस त्यांनी सभागृहामध्ये व बाहेरही लोकांच्या प्रश्नांना आणि सदस्यांच्या प्रश्नांना मराठीतूनच उत्तर देण्याचा प्रयत्न केला. माझ्या एक गोष्ट आजही लक्षात आहे की, मराठी भाषेवर विशेष प्रभुत्व नसतांना देखील प्रत्येक वेळी मराठीतून बोलण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न हा सभागृहामध्ये नेहमीच आदराचा विषय होता आणि राहील.

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .........

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, "चौकशी करुन सांगते," असे त्या म्हणायच्या. त्यातील एक बारकावा मी पुन्हा नमूद करु इच्छितो. चौकशी करतो, हे ठरलेले उत्तर आहे. अनेक मंत्री तसे उत्तर देतात. परंतु त्यांनी प्रयत्न करुन सुध्दा आणि अनेकांनी त्यांना सांगून सुध्दा त्या "चौकशी" शब्दाला "चोकशी" असे म्हणायच्या. त्यांच्या अशा उत्तरामुळे आणि त्यांच्या भाषा वापराबद्दल सभागृहामध्ये मनापासून प्रसन्नता व्हावयाची. त्या नेहमी मराठीतून उत्तर देण्याचा प्रयत्न करीत होत्या, हा आदराचा विषय होता. त्या उत्तम प्रकारच्या स्वातंत्र्य सेनानी होत्या. त्या राजकीय जीवनात चांगल्या पदापर्यंत पोहोचल्या होत्या. त्यांचे वय 85 ते 86 च्या जवळपास होते. त्यांच्या विनम्रतेच्या गुणांचा जो उल्लेख करण्यात आला तो घेण्यासारखा आहे. मंत्री असतांना सुध्दा त्या त्यांच्या दालनामध्ये किंवा सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांना अतिशय उत्तम वागणूक देत होत्या. सन्माननीय सदस्य त्यांना भेटण्यासाठी गेले तर त्या त्यांचे म्हणणे ऐकून घेत होत्या आणि कार्यवाही करीत होत्या. मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि परमेश्वर त्यांच्या कुटुंबियांना दुःख सोसण्याची शक्ती देवो, अशी प्रार्थना करतो.

---------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित यांनी कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडलेला आहे. त्या शोक प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अनुमोदन दिलेले आहे. त्या प्रस्तावावर माझ्या सहसंवेदना व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे. कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक यांचे नुकतेच निधन झालेले आहे. कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक आणि मी काँग्रेस पक्षामध्ये एकत्र काम केलेले आहे. पक्षाच्या कामामध्ये त्या अतिशय उत्साहाने सहभागीय व्हायच्या, हिरिरीने भाग घ्यायच्या. त्यांचा स्वभाव अतिशय मनमिळावू होता. त्यामुळे त्यांच्या बरोबर काम करतांना मोकळेपणा वाटायचा. त्या किती गोड होत्या याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर त्या आपल्या पर्समध्ये नेहमी चॉकलेट ठेवायच्या आणि आम्हा कार्यकर्त्यांना, नेत्यांना चॉकलेट वाटायच्या. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे म्हणाले की, त्या आपल्या पर्समध्ये नेहमी चॉकलेट ठेवत असत आणि सर्व सन्माननीय सदस्यांना चॉकलेट वाटत असत. त्यांचा स्वभाव चॉकलेट प्रमाणे अतिशय गोड होता. त्या मृदूभाषी होत्या. त्या गुजराती भाषिक असल्यामुळे त्यांचे मराठी भाषेवर म्हणावे तसे प्रभूत्व नव्हते. तरी सुध्दा मराठीतून बोलण्याचा त्यांचा आग्रह होता. सभागृहामध्ये त्या मराठीतूनच बोलायच्या. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला त्या समाधानकारक उत्तर देण्याचा कसोशीने प्रयत्न करायच्या. कसोशीने उत्तर देण्याचा प्रयत्न करीत असतांना कधी कधी मुद्दे अपुरे सुध्दा असायचे, त्या अपु-या मुद्यांच्या संदर्भात त्या नेहमी असे म्हणायच्या की, मी चोकशी करुन सांगते. "चौकशी" शब्दाला त्या "चोकशी" असे म्हणायच्या. त्यामुळे पुष्कळ वेळा त्यांचे सहकारी त्यांना चोकशी मंत्री असे म्हणायचे. गमतीचा भाग सोडला तर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळाले पाहिजे, याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच त्या चोकशी करुन सांगते, असे उत्तर देत होत्या. काही तरी ठोकून द्यावयाचे अशा प्रकारचे उत्तर त्या देत नव्हत्या, हे सर्वात महत्वाचे होते. त्यांनी मंत्रालयामध्ये उत्तम प्रकारे काम केलेले आहे. मी ज्यावेळी महिला काँग्रेसची अध्यक्षा होते त्यावेळी त्यांनी मला अतिशय उत्तम प्रकारे साथ दिली होती. मी त्यांच्याबद्दल माझ्या भावना आवर्जून व्यक्त करते.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती सुधा जोशी.....

त्यांच्या कुटुंबियावर हा आघात झालेला आहे. परमेश्वर त्यांच्या कुटुंबियांना हा आघात सहन करण्याची शक्ती देवो. त्यांचे पती कै.भानुशंकर याज्ञिक यांचे पूर्वीच निधन झालेले आहे. नुकतेच कै.प्रमिला याज्ञिक यांचे निधन झालेले आहे, त्यामुळे त्यांची मुले आता पोरकी झालेली आहेत. याज्ञिक कुटुंबियांना झालेले तीव्र दु:ख सहन करण्याची शक्ती त्यांना मिळो, अशी मी परमेश्वर चरणी प्रार्थना करते व माझे दोन शब्द संपविते.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : कै.प्रमिला भानुशंकर याज्ञिक या जेष्ठ समाजसेविकेचे दिनांक 2 एप्रिल 2007 रोजी दु:खद निधन झालेले आहे. जुन्या पिढीतील सर्व कार्यकर्त्यांना सार्थ अभिमान वाटावा असे त्यांचे कार्य होते. कै.प्रमिला याज्ञिक आणि त्यांचे पती कै.भानुशंकर याज्ञिक यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयामध्ये सक्रीय भाग घेतला होता. त्यानंतरच्या काळात मुंबई प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या माध्यमातून 35 वर्षे पक्ष सेवा केली. कै.प्रमिला याज्ञिक 1980 साली मंत्री झाल्या, त्यावेळेला मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्यासारखाच विधानसभेचा सदस्य होतो. त्यावेळी कै.प्रमिला याज्ञिक यांच्याशी विविध कामाच्या अनुषंगाने सातत्याने संबंध आला. त्या अत्यंत आपुलकीने वागणाऱ्या, अत्यंत प्रेमळ व्यक्तिमत्वाच्या होत्या. कोणत्याही कामाच्या अनुषंगाने आम्ही कार्यकर्ते किंवा सभागृहाचे सदस्य म्हणून त्यांना भेटलो तर, त्या कामाचा सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या अशा त्या आमच्या भगिनी होत्या. त्याच माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रात व विशेषत: मुंबईमध्ये समाजाची विविध प्रकारे सेवा केली. राजकीय क्षेत्रामध्ये अनेक कार्यकर्त्यांना त्यांनी चांगल्या प्रकारे वाढविले. अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व म्हणून कै.प्रमिला याज्ञिक यांचा उल्लेख करणे गरजेचे आहे.

कै.प्रमिला याज्ञिक हया 1974 मध्ये राज्यपालांद्वारा नामनियुक्त व 1980 मध्ये विधानसभा सदस्यांद्वारा विधानपरिषदेवर निर्वाचित झाल्या होत्या. अशा प्रकारे 12 वर्षे या सदनाच्या सदस्य होत्या. अशा जेष्ठ समाजसेवक असलेल्या आमच्या भगिनीचे दुख:द निधन दिनांक 2 एप्रिल, 2007 रोजी झाले आहे. मी त्यांना श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांनी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबियाकडे पाठविण्यात येईल.

कै.प्रमिला याज्ञिक यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 12 वाजून 54 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली )

नंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभागृह स्थगितीनंतर ... )

**सभापतीस्थानी - माननीय उपसभापती**

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.**

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने लोक आयुक्तांचे दिनांक 5 फेब्रुवारी, 2002 व 26 डिसेंबर 2002 चे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : लोक आयुक्तांचे विशेष अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळाचा (जळगाव) सन 2002-03 चा महालेखापाल-2 यांचा अलग लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने मराठवाडा विकास महामंडळ मर्यादितचा सन 2003-04 चा सदतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादितचा सन 2003-04, 2004-05 चा तेहतिसावा व चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचा सन 2005-06 चा चौतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा सन 2003-04 चा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

**

( यानंतर श्री. सरफरे .... वाय 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी
मु.शी } लो□ले□ा समितीचा अहवाल सादर □र□

प्रा. बी. टी. देशमुख (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ लो□ले□ा समितीचा सहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उपसभापती** : लो□ले□ा समितीचा अहवाल सभा□ृहाला सादर झाला आहे.

----

पृ.शी
मु.शी } विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर □र□

श्रीमती उषा दराडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□ विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा चौथा व पाचवा अहवाल सभा□ृहाला सादर □रते.

**उपसभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अहवाल सभा□ृहाला सादर झाले आहेत.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 97 अन्वये अल्पकालीन सूचनेवरील
अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सक्तीच्या कर्जवसूलीमुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्त्या" या विषयावरील श्री. पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेच्या वेळी दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

---

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>औचित्याच्या मुद्दयासंबंधी</u>**

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील एका महत्वाच्या व गंभीर विषयासंबंधी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. राज्यामध्ये सुरु असलेली अक्षय प्रकाश योजना शासनाने बंद करण्याचा, तिला स्थगिती देण्याचा जो निर्णय घेतला आहे तो अत्यंत दुर्दैवी आहे. राज्य अंधारात असतांना आणि ग्रामीण भागात जवळपास 17 ते 18 तासाचे लोड शेडींग असतांना वीज वाचविण्याच्या दृष्टीने एक अतिशय चांगली योजना राज्यामध्ये सुरु होती. या योजनेच्या माध्यमातून जवळपास 21 तासाहून अधिक अखंडीत वीज या गावांना मिळत होती. नाशिक जिल्हयातील 1500 गावे, कोल्हापूर जिल्हयातील 1814 गावे, अकोला जिल्हयातील 467 गावे, औरंगाबाद जिल्हयातील 200 गावे, लातूर जिल्हयातील 85 गावे, कल्याणमधील 384 गावे, नागपूरमधील 449 गावे आणि नागपूर शहरातील 81 गावे, पुणे जिल्हयातील 584 गावे इतक्या गावांना अक्षय प्रकाश योजनेची स्थगिती दिली गेली. मुळात ही योजना संगमनेर जवळच्या गावामधील सरोज कडलग आणि सुरेश सुर्वे या दोन मुलांनी वीज बोर्डाच्या लाईनमनना प्रश्न विचारला होता. त्यावेळी श्री. बी.डी. पवार या लाईनमनच्या डोक्यामध्ये ही कल्पना आली. त्यांनी या बाबत राज्य विद्युत मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. जयंत कावळे यांना माहिती दिली. त्यानंतर या योजनेचा राज्यामध्ये प्रचार सुरु झाला. सकाळी 5 ते सायंकाळी 6 या वेळेमध्ये थ्री फेज वीजेचा वापर बंद केल्यामुळे ग्रामीण भागामध्ये 20 टक्के व शहरी भागामध्ये 33 टक्के वीजेचा वापर कमी झाला. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये वीज चोरी बंद झाली. त्यामुळे अक्षय प्रकाश योजनेमधून त्या गावांना वीज मिळणे सुरु झाले. ठरवून दिलेल्या क्षमतेपेक्षा जास्त वीज वापरली जात आहे असे लक्षात आले तर त्या गावांना योजनेमधून वगळण्याची मुभा आहे. आणि म्हणून प्रामाणिकपणे ही योजना राबविणाऱ्या गावांवर यामुळे अन्याय होणार आहे. ज्या विभागामध्ये वीजेची चोरी केली जाते त्या विभागाची वीज बंद करण्याऐवजी सरसकट सर्व गावांकरिता निर्णय घेतल्यामुळे ही योजना संपूर्ण राज्यामध्ये बंद करण्याचा घेतलेला निर्णय दुर्दैवी आहे. यामुळे 15 हजार गावांना त्याचा फटका बसणार आहे. इतर गावांमध्ये सुध्दा जवळपास 18 तासाचे लोड शेडींग आहे, त्यांना याचे परिणाम भोगावे लागत आहे. म्हणून या औचित्याच्या मुद्दयाव्दारे विनंती करणार आहे की, जी गावे तुमच्या अटींचे पालन करीत नाही त्या गावांमध्ये ही योजना बंद करावी. परंतु सरसकट साडे 5 ते 6 हजार गावांमध्ये सुरु असलेली ही योजना बंद करण्याचे कारण नव्हते.

(यांनतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु...

त्या पध्दतीने शासनाने फेरविचार करावा. 3 महिन्याची स्थगिती दिलेली आहे. जी गावे खऱ्याअर्थाने अटींचे पालन करत नाहीत त्या गावांपुरती ही योजना बंद करण्याबाबत शासनाने निर्णय करावा, अशाप्रकारची मी विनंती करतो. खरे म्हणजे ही योजना अतिशय चांगली आहे. साडेपाच ते सहा हजार महाराष्ट्रातील गावे 18 तासाच्या लोड शेडींगच्या बाहेर गेलेले होती. जवळपास 21 तास त्या गावांना वीज मिळत होती. म्हणून आपण निदेश द्यावा की, जी गावे अटींचे पालन करत नाहीत, तेवढ्या गावापुरती स्थगिती द्यावी उर्वरित गावांना अक्षय प्रकाश योजनेच्या माध्यमातून वीजपुरवठा सुरु करावा, अशी मी आपल्यावतीने शासनाला विनंती करतो.

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : याची नोंद घेण्यात येत आहे.

**उपसभापती** : जी गावे अटींचे पालन करतात त्या ठिकाणी "अक्षय प्रकाश योजना" शासनाने राबवावी, असे मी स्पष्टपणे निदेश देतो.

--

श्री.श्रीकांत जोशी : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार 6 पदांना मान्यता मिळून, सहा अत्यंत महत्वाची आणि 21 व्या शतकासाठी आवश्यक प्रपाठकांची नेमणूक मराठवाडा विद्यापीठामध्ये करण्यात आली होती. यामध्ये संगणक व माहिती तंत्रज्ञान, मास मेडिया आणि जर्नालिझम, व्यवस्थापन शास्त्र, ग्रंथालय आणि इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी इत्यादि विषयाचे रिडर आहेत. एक वर्षापासून विद्यापीठ शासनाकडे पाठपुरावा करत आहे की, या पदांना पाच वर्षानंतर उर्वरित आर्थिक बाबीची शासनाने जबाबदारी उचलावी. या अटीवरच युजीसी मान्यता देते. ती मान्यता दिल्यानंतर ही पदे भरण्यात आली. पण शासनाने ताबडतोब या पदांना 31 मार्चपर्यन्त मान्यता देण्याची आवश्यकता होती, ती न दिल्यामुळे पदे लॅप्स होण्याच्या मार्गावर आहेत म्हणून अत्यंत महत्वाच्या, 21 व्या शतकाच्या ज्ञान युगामध्ये महत्वाच्या रिडर्सच्या संबंधात तातडीने मंत्री महोदयांनी बैठक घेणे आवश्यक आहे. म्हणून आपल्याला विनंती करतो की, किमान एक बैठक फायनान्स मंत्री आणि उच्च शिक्षण मंत्र्यांनी तीन दिवसात ही बैठक घ्यावी तरच या पदांना मंजुरी मिळेल. हा विषय त्यांच्या लक्षात आला तर त्यांच्याकडून दोन मिनिटात त्याला मंजुरी मिळेल. नाही तर ही महत्वाची स्थायी पदे लॅप्स होतील. आपण तसे निदेश करावेत,अशी विनंती करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : ते बैठक घेतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्देश देता त्याप्रमाणे संबंधित विभागाचे मंत्री महोदय उपस्थित नसले तरी जसे आता डॉ.पतंगराव कदम यांनी उत्तर दिले, त्याप्रमाणे सभागृहात उपस्थित असलेले दुसरे मंत्री उत्तर देतात. परंतु त्या विभागाच्या मंत्र्यांना काही माहीत नसते.

**उपसभापती** : मग मी यापुढे निदेश देण्याचे बंद करू काय ?

श्री.नितीन गडकरी : आपण निदेश द्यावेत. परंतु मंत्री महोदय सांगतात आम्ही हे करू. परंतु त्याबाबत पुढे काही कार्यवाही होत नाही. संबंधित मंत्र्यांना कळविले जात नाही. कोणाचा पायपोस कोणाच्या पायात नाही. सभापतींनी दिलेल्या अनेक निदेशांचे पालन झालेले नाही.

श्री.अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, एकदा आपण निदेश दिल्यानंतर तशा सूचना सबंधित खात्याला दिल्या जातात. त्यांच्याकडून निदेशाचे पालन होते.

---

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, कालच्या वर्तमानपत्रामध्ये "प्रशासनाने मागितला मासिक पाळीचा अहवाल" अशी बातमी वाचली. मला आश्चर्य वाटले की, ज्या महाराष्ट्रात आम्ही रहातो, जेथे महिलांचा सन्मान केला जातो, महिलांच्या अस्तित्वाचा सन्मान केला जातो, त्या ठिकाणी सनदी महिला अधिकाऱ्यांचे गुप्त अहवाल मागितले जात असतील, तर आम्ही काय करायचे ? महिलांचा आत्मसन्मान समाज ठेवणार आहे की नाही ? महिलांचे शरीर आणि स्त्री असणे याबाबतची किती लक्तरे वेशीवर टांगणार आहोत ? शेवटी या समाजव्यवस्थेमध्ये पुरूषप्रधान संस्कृती विसरणार आहोत की नाही ? महिलांना न्याय देणार आहोत काय ?

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .....

या सनदी महिला अधिकाऱ्यांच्या बाबतीत हा प्रकार घडत असेल तर शरमेने मान खाली घालावीशी वाटते. नेमक्या कोणत्या अधिकाऱ्याच्या किंवा नेत्याच्या डोक्यातून हे कलम आले आहे हे शोधून काढले पाहिजे. त्यांना शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राचा सन्मान सांगितला पाहिजे. ते शासन शोधणार काय ? महिला सनदी अधिकाऱ्याचा झालेला अपमान कसा धुवून काढणार ? याबाबतीत काय उत्तर मिळणार आहे ? ही गुप्तता का पाळली जात नाही ? या वैयक्तिक बाबी आहेत. मासिक पाळी हा अहवाल असू शकतो काय ? यातून काय रिलीफ मिळणार आहे ? महाराष्ट्रातील महिलांनी हे का सहन करावे ? याबाबतीत महाराष्ट्र शासनाचे काय उत्तर आहे ?

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, या सगळ्या प्रकरणामागे कोण आहे याची चौकशी होणे आवश्यक आहे.

( सर्व महिला सदस्यांसह अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही बाब फार वाईट आहे. महिला सनदी अधिकाऱ्यांना कोणताही सुसंस्कृत अधिकारी हे कसे काय विचारु शकतो ? आपण हे डिस्कार्ड करावे. आपण हे रद्द करण्याचे आदेश द्यावेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत असलेली बाब या सदनामध्ये ऐकण्यासाठी सुध्दा वाईट वाटते.

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत सांगू इच्छिते की, आपल्या राज्यातील किंवा देशातील महिला सनदी अधिकाऱ्यांच्या बाबतीत अशा प्रकारचा जो रिपोर्ट मागणे ते उचित नाही. याची दखल महाराष्ट्र शासनाकडून घेण्यात येईल आणि अशा प्रकारच्या भावना कळविण्यात येतील.

श्री. नितीन गडकरी : नुसते कळवून चालणार नाही. महिला सनदी अधिकाऱ्यांना असे जे विचारण्यात येते ते थांबवावे.

डॉ. विमल मुंदडा : ते थांबविण्याच्या दृष्टीकोनातूनच कळविण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, यापुढे हे थांबविण्यात येईल असे सांगितले पाहिजे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे या सभागृहामध्ये अत्यंत गंभीर प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात जर अशा प्रकारची प्रोव्हीजन असेल तर ती ताबडतोबीने रद्द करण्यात यावी. केंद्र शासनाने असा कायदा केला असेल तर केंद्र शासनाला कळवावे की, या सभागृहाने याबाबत तीव्र निषेध केलेला आहे. हा स्त्रीच्या स्त्रित्वाचा अपमान आहे. या देशामध्ये स्त्रित्वाचा अपमान कधीही झ ालेला नाही. हा देश संस्कृती आणि परंपरा जपणारा देश आहे. महिलांच्या बाबतीत जर कोणी असे करीत असेल तर किंवा असा कायदा झाला असेल तर तो कायदा देखील रद्द करण्यास सांगावे. आपल्या भावना या ठिकाणाहून कळवाव्यात.

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, होय.

-----

प्रा. फौजीया खान : सभापति महोदय, हर किसी को शिक्षा प्राप्त हो, इस उद्देश्य से शासन द्वारा विद्यार्थियों को अनेक सुविधा प्रदान की गई हैं. इन्हीं सुविधाओं में एक सुविधा यह भी है कि, विद्यार्थियों को बस पास और रेल्वे पास की सुविधा प्रदान की जाती है. आज कम्प्युटर शिक्षा का युग है. आज ग्रामीण क्षेत्र में, शहरी क्षेत्र में, हर क्षेत्र में कम्प्युटर का उपयोग हो रहा है. इसी सिलसिले में शासन द्वारा कहीं कहीं और शासकीय सेवा के अधिकारियों और कर्मचारियों को MS-CIT कोर्स सीखना अनिवार्य किया गया है. अत: मेरा शासन से अनुरोध है कि MS-CIT कोर्स सीखने वाले विद्यार्थियों को भी बस पास की सुविधा प्रदान की जाए. मैं यह मांग इस औचित्य के मुद्दे के माध्यम से प्रस्तुत कर रही हूं.

.......

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. एका महत्वाच्या प्रश्नाकडे मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे. हायकोर्टाचा एक निर्णय आहे तसेच शासनाचे एक परिपत्रक आहे की, पती-पत्नी यांच्यापैकी एकजण शासकीय नोकरी करीत असेल तर दुसऱ्या व्यक्तीला घरभाडे भत्ता मिळणार नाही. अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे. त्यामुळे शेकडो शिक्षकांना गेल्या काही महिन्यांपासून निरंक पगार मिळावयास लागला आहे. कारण 1993 पासूनची वसुली एकाचवेळी करण्यास सुरुवात केलेली आहे. दोघांपैकी एकजण शासकीय निवासस्थानात राहात असेल तर त्यांचा घरभाडे भत्ता कापला जातो. यामध्ये पती किंवा पत्नीचा घरभाडे भत्ता उचित मानला पाहिजे. याबाबत फेरविचारार्थ शिक्षक कोर्टात गेलेले आहेत.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 13:30

(श्री. कपिल पाटील...)

माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी कोर्टा पुढे शिक्षकांची बाजू मांडून त्यांना न्याय मिळवून द्यावा अन्यथा पुढील 12 महिने सर्व शिक्षकांना शून्य पगार मिळेल. त्यांच्याकडील एच.आर.ए.ची थकबाकी अन्याय पध्दतीने वसूल करु नये.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : या संदर्भात योग्य ती भूमिका घेतली जाईल.

--

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उद्या दिनांक 14 एप्रिल 2007 रोजी परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीला आम्हा सर्वांचे कोटी कोटी प्रणाम. भारतीय उपखंडात सामाजिक, आर्थिक व शैक्षणिदृष्ट्या मागासलेल्या पददलित जनतेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा महामंत्र महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. भारतीय राज्य घटनेमध्ये प्रत्येक बालकाला मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचा मूलभूत अधिकार 86व्या घटना दुरुस्तीने दिलेला आहे. असे जरी असले तरी राज्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीयांचे साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. 43 टक्के आदिवासी निरक्षर आहेत. भटक्या व विमुक्त जमातीच्या 15 टक्के मुलांनी शाळेचे तोंड पाहिलेले नाही. ग्रामीण भागात किमान एक स्त्री सदस्य साक्षर असलेले कुटुंबाचे प्रमाण फक्त 48 टक्के आहे. अशी शैक्षणिक आकडेवारी राज्याच्या आर्थिक पाहणीतून दिसून येत आहे. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी याकडे शासनाने तातडीने लक्ष घालून शिक्षणापासून वंचित राहिलेल्या या शोषित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने तातडीची उपाययोजना करणे गरजेचे आहे, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राखून ठेवलेल्या कामकाजाबाबत**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा देखील एक औचित्याचा मुद्दा आहे... सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास संधी मिळत नाही. माझी लक्षवेधी लागत नाही. माझे विषय कामकाजामध्ये का येत नाही, हे काही मला कळत नाही.

श्री. विनोद तावडे : माझा देखील औचित्याचा मुद्दा आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी लक्षवेधी सूचना लागत नाही, औचित्याचा मुद्दा मान्य होत नाही असा माझा अनुभव आहे. नागपूरच्या विणकरांच्या बाबतीतील राखून ठेवलेली लक्षवेधी अजून लागलेली नाही. मुंबईतील गिरणी कामगारांसंबंधीच्या राखून ठेवलेल्या लक्षवेधीचे निवेदन अद्याप आलेले नाही. आता दोन दिवसात अधिवेशन संपणार आहे. सभागृहामध्ये दिलेल्या आश्वासनाप्रमाणे कार्यवाही करण्याची काळजी आपले ऑफीस आणि सेक्रेटरी घेतात की नाही याची चौकशी झाली पाहिजे.

**उपसभापती** : विणकरांच्या प्रश्नासंबंधी विभागाकडून माहिती मागविलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशासंबंधीचे कार्यवृत्त माझ्याकडे आहे. आपण असे निदेश दिले होते की, "हा प्रश्न मी राखून ठेवलेला आहे. मी स्वत: लक्ष घालतो आणि सर्वांना बोलावतो.." हे रेकॉर्डवर आहे. आता अधिवेशन दोन दिवसांनी संपणार आहे. कामगारांच्या प्रश्नासंबंधीची लक्षवेधी राखून ठेवलेली आहे. सभापती महोदय, माझी आपणास एवढीच विनंती आहे की, जेवढे राखून ठेवलेले कामकाज आहे ते पुढील दोन दिवसामध्ये झाले पाहिजे.

**उपसभापती** : ठीक आहे.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व पाशा पटेल, वि.प.स. यांनी "सार्वजनिक बांधकाम नांदेड अंतर्गत नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यामध्ये गेल्या 6 महिन्यापासून भ्रष्टाचार व कामातील अनियमिततेमुळे प्रशासन पूर्णपणे ठप्प झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील व प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी "11 मार्च, 1989 साली भूमिपूजन करण्यात आजलेल्या संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचे काम तब्बल 18 वर्षे अपूर्ण असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, वि.प.स. यांनी "महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन 2003च्या जाहिरातीनुसार मंत्रालयात कक्ष अधिकारी पदासाठी 86 उमेदवारांची निवड होऊनही त्यापैकी आतापर्यन्त 59 विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्रे दिली असून अद्याप 35 उमेदवारांना नियुक्ती पत्रे न दिल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

.....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ 13:35

**उपसभापती**............

यानंतर सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी "पाटबंधारे विभागातील स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता पदी पदोन्नती देताना निवडसूची दि.1.1.2005 च्या यादीनुसार न केल्याने सुमारे 1700 ते 1800 कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता संपुष्टात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

यानंतर सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी "पोलीस कल्याण निधी नियमावलीनुसार पोलीस कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी उपक्रम राबविताना रु.1 लाखापेक्षा जास्त होणारी खर्चाची प्रकरणे मान्यतेसाठी पोलीस महासंचालकाकडे न पाठविता पुस्तक प्रकाशनासाठी एकूण 33 लाख 19 हजार 420 रुपये इतक्या रक्कमेचा माजी पोलीस आयुक्तांनी गैरवापर केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे मी निर्देश देत आहे.

आता नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने चर्चेला घेण्यात येतील.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या सूचनेसंबंधी</u>

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, ती स्वीकारली की नाही? डॉ.पी.एस.पसरिचा, पोलीस महासंचालक यांच्याविरुध्द भ्रष्टाचाराचे मोठे आरोप झालेले आहेत. तुमच्या मर्जीने सूचना चर्चेला येणार का?

**उपसभापती** : माझ्या मर्जीने काही होत नाही.

श्री.नितीन गडकरी : डॉ.पसरिचा, पोलीस महासंचालक यांनी अवैध संपत्ती जमा केली असल्याचे वेगवेगळया टी.व्ही.चॅनेलवर दाखविण्यात आले आहे. हा आरोप आम्ही केलेला नाही. अशा विषयावर आम्ही जी नियम 93 अन्वये सूचना दिली आहे ती आपण फेटाळणार आहात का?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमची ही 93 ची सूचना फेटाळली आहे का?

**उपसभापती** : फेटाळलेली नाही.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण सभागृहाची बैठक स्थगित करावी. आम्ही सभागृह चालू देणार नाही. पसरिचा यांना सरकार सपोर्ट करीत आहे का?

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**उपसभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील पहिले निवेदन श्री.जयंत प्र.पाटील यांचे आहे, ते मी विचारात घेत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ते सोमवारी चर्चेला घ्यावे अशी माझी विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.नितीन गडकरी : आम्ही सभागृह चालू देणार नाही. आम्हाला लाज वाटते.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी संतप्त होऊ नये.

श्री.नितीन गडकरी : हे सभागृह व्यक्तीच्या मर्जीप्रमाणे चालणार नाही, कायद्याप्रमाणे चालेल. त्याप्रमाणे चालणार नसेल तर आम्ही याठिकाणीच बसू.

..3..



SGB/ MHM/ SBT/ 13:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**उपसभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील दुसरे निवेदन प्रा.शरद पाटील यांचे आहे, ते मी विचारात घेत आहे.

प्रा.शरद पाटील : ते पुढे घेण्यात यावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**उपसभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील तिसरे निवेदन श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांचे आहे, ते मी विचारात घेत आहे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : ते पुढील वेळी घेण्यात यावे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभापतींच्या आसनासमोरील मोकळया जागेमध्ये येऊन घोषणा देत असतात)

**उपसभापती** : मी सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.39 ते 2.00 पर्यंत स्थगित झाली.)

---------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, राज्याचे डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात रिपोर्टर श्रीमती भावे तसेच श्री. शैलेश सावला टी.व्ही. वर श्री. पसरिचा यांच्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात माहिती देत आहेत. प्रसार माध्यमातून यासंदर्भात बाहेर माहिती दिली जात आहे. त्यामुळे आपल्या राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेला जबरदस्त धक्का बसलेला आहे. राज्याची कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणा-या व्यक्तीवर अशा प्रकारे भ्रष्टाचाराचे आरोप होत असतील तर ते आपल्या राज्याचे दुर्दैव आहे. ते या प्रकरणामध्ये दोषी नसावेत यासंदर्भात मी देवाजवळ प्रार्थना करतो. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात शासनाने तात्काळ निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : या विषयाच्या संदर्भातील निवेदन शासनाने उशिरात उशिरा सोमवार पर्यंत करावे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : होय.

---------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी व अन्य सदस्यांनी राज्याचे पोलीस महासंचालक श्री.पी.एस.पसरिच्या यांच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्या अनुषंगाने सभागृहात वातावरण तप्त झाले होते. मी सन्माननीय सदस्यांच्या भावना समजू शकतो. या सभागृहाची प्रतिष्ठा, परंपरा आहे ती आपण सर्वांनी जपली पाहिजे. सभापतीस्थानी बसलेल्या व्यक्तींचा अवमान करणे, त्यांचा धिक्कार व निषेधाच्या घोषणा देणे योग्य नाही हे सर्व सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावे. तेव्हा या संदर्भातील वाक्य मी सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे.

---------------

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वर्धा शहरातील आर्वी चौकात दोन गटात झालेल्या संघर्षात अनेकजण जखमी झाल्याबाबत

**मु. शी.** : वर्धा शहरातील आर्वी चौकात दोन गटात झालेल्या संघर्षात अनेकजण जखमी झाल्याबाबत श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे वि. प. स. यांनी "वर्धा शहरातील आर्वी चौकात दोन गटात झालेल्या संघर्षात अनेकजण जखमी झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, वर्धा शहरातील आर्वी नाका चौकात दोन टोळी गटांत खंडणीसाठी संघर्ष होत असतो. याठिकाणी पोलीस, दुसरी वडार जमात आणि तिसरी इतर समाज अशा एकूण तीन टोळ्या आहेत. या टोळ्यांतील संघर्षाचे प्रमुख कारण खंडणी हे आहे. अशाप्रकारे आर्वी चौकात होत असलेल्या संघर्षामुळे तेथील नागरिक त्रस्त झालेले आहेत. या संघर्षात दरवर्षी एक-दोन लोकांचा मृत्यू होत आहे. वडार झोपडपट्टी सुमारे 20 वर्षापासून श्री.गांधी यांचे खाजगी जागेवर व नगरपरिषदेच्या खुल्या जागवेर अतिक्रमण करुन बसलेली आहे. त्यांना तेथून हटवून त्यांचे दुसरीकडे पुनर्वसन केले पाहिजे. सभापती महोदय, वर्धा जिल्ह्यात दारुबंदी असूनही त्याठिकाणी दारु मिळते. माझा मंत्रिमहोदयांन प्रश्न आहे की, वडार झोपडपट्टी अतिक्रमण करुन झालेली आहे ती हटविण्यात येणार का ? तसेच त्याठिकाणी कायम स्वरुपी पोलीस चौकी उभारण्यात येणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, वर्धा शहरातील सदर वडार झोपडपट्टी सुमारे 20 वर्षापासून श्री.गांधी यांच्या खाजगी मालकीच्या जागेवर वसलेली आहे. नगरपरिषदेच्या खुल्या जागेवर अतिक्रमण केलेले नाही, त्यामुळे नगरपरिषदेकडून कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे की, त्याठिकाणी दोन टोळ्यांमध्ये संघर्ष होत आहे. त्याचा त्रास परिसरातील लोकांना होत आहे......

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी एका समाजाचा उल्लेख झालेला आहे आणि ते योग्य नाही. एका समाजाला असा दोष देता येणार नाही.....

**उपसभापती** :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांना प्रथम त्यांचे उत्तर पूर्ण करु द्यावे. वाटल्यास नंतर प्रश्न विचारावेत....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यांनी " .... समाज खंडणी वसूल करतो" असा शब्दप्रयोग केलेला आहे तो त्यांनी मागे घेतला पाहिजे.

( काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..4..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : वर्धा शहरातील आर्वी चौकात शेंडे आणि जाधव या दोन टोळ्यांमध्ये संघर्ष होतो. त्याचा त्रास आजुबाजूच्या परिसरातील लोकांना होत आहे. श्री.गांधी यांच्या मालकीच्या जागेवर झोपडपट्टी झालेली आहे. त्यांच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण झाले म्हणून ते न्यायालयात जाऊ शकतात. सन्माननीय सदस्यांनी तेथील लोकांच्या पुनर्वसनाबाबत प्रश्न विचारला, मी त्यांना सांगू इच्छितो की, म्हाडा, महानगरपालिकेची जागा असल्यास त्याप्रमाणे सूचनादेण्यात येतील. त्याठिकाणी तात्पुरत्या स्वरुपाची पोलीस चौकी आहे. तेथे कायम स्वरुपी पोलीस चौकी करण्याबाबत विचार करण्यात येईल.

-------------

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. :गोंदे ता.इगतपुरी, जि.नाशिक या औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या लिअर सिटींग प्रा.लि.कंपनीच्या व्यवस्थापनात व कामगारामध्ये झालेल्या वादातून टाळेबंदीची घटना घडणे

**मु. शी**. : गोंदे ता.इगतपुरी, जि.नाशिक या औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या लिअर सिटींग प्रा.लि.कंपनीच्या व्यवस्थापनात व कामगारामध्ये झालेल्या वादातून टाळेबंदीची घटना घडणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, प्रतापराव सोनवणे, वि.प.स. यांनी "गोंदे ता.इगतपुरी, जि.नाशिक या औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या लिअर सिटींग प्रा.लि.कंपनीच्या व्यवस्थापनात व कामगारामध्ये झालेल्या वादातून टाळेबंदीची घटना घडणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेतील विषय हा गोंदे, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथील लिअर सिटींग लि. या कारखान्याचे व्यवस्थापन व कामगार यांच्यामध्ये विसंवाद होऊन वादविवाद व हाणामाऱ्या होऊन टाळेबंदीची घटना घडलेली आहे. अशा घटना महाराष्ट्र राज्यातील औद्योगिक क्षेत्रात घडणे ही नित्याचीच बाब झालेली आहे. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान तर होतच आहे. त्याशिवाय रोजगार निर्मितीच्या प्रयत्नांना अडसरही तयार होत आहे. आपल्या शेजारच्या राज्यामध्ये मात्र हे औद्योगिक संकट खूप कमी प्रमाणात घडते, अशी माहिती आहे. महाराष्ट्र राज्यातील बहुतांशी कारखान्यांमध्ये व्यवस्थापन आणि कामगार यामये तणावपूर्ण, शत्रुत्वाचे, विसंवादी असे जे वातावरण दिसत आहे, यामागील प्रमुख कारण म्हणजे या विषयाचे औद्योगिक क्षेत्रातील कायदे हे सदोष आणि अव्यवहार्य आहेत, असे या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे. तेव्हा शासन या संदर्भात तज्ज्ञांची समिती नेमून हे औद्योगिक क्षेत्रातील कलह कसे कमी होतील व या क्षेत्रात व्यवस्थापन व कामगार यांच्यामध्ये सुसंवाद व परस्पर विश्वास निर्माण करण्याच्या दृष्टीने सुधारित कायदे करील काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी गोंदे, ता.इगतपूरी, जि.नाशिक येथील लिअर सिटींग प्रा.लि.कंपनीतील व्यवस्थापन व कामगारांतील संघर्षाबाबत प्रश्न उपस्थित केला. सदरची कंपनी मोटारकारचे सीट तयार करते. अशाचप्रकारचा एक कारखाना अंबडमध्येही या कंपनीने काढलेला आहे. अंबड येथ्ील कंपनीमध्ये ट्रेनी कामगार भरले. त्यांना ट्रेनिंग देण्याकरिता म्हणून इगतपूरी येथील काही कामगारांना तिकडे नेण्याची भूमिका व्यवस्थापनाने घेतली. परंतु व्यवस्थापनाची ही भूमिका कामगारांना पटली नाही. कारण, त्यांना असे वाटले की, येथील कामगार कायमस्वरुपी तिकडे जातील. या गैरसमजुतीतून त्याठिकाणी वादविवाद झालेला आहे. दिनांक 4.4.2007 रोजी दोन्ही गटांमध्ये हाणामारी झालेली असून दोन्ही गटांवर कारवाई झालेली आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशी भूमिका मांडली की, कामगार आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्याच्या दृष्टीने किंवा कामगारांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आपल्या राज्यातील कायदे अपुरे आहेत. परंतु त्यांच्या या मताशी मी सहमत नाही. कारण ज्या ज्यावेळी कायद्यामध्ये त्रुटी आढळून येते त्या त्यावेळी त्यामध्ये बदल केला जातो.

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक.....

जागतिक धोरण आणि खुली अर्थव्यवस्था या कारणास्तव बऱ्याचशा ठिकाणी एकूणच मॅनेजमेंट सिस्टीममध्ये बदल झालेला आहे. परंतु त्यानुषंगाने कामगारांची मानसिकता तयार झाली नाही. म्हणून याबाबतीतील आयएसओ 9000/आयएसओ 10000 दर्जासंबंधी एकूणच सिस्टीम तयार करीत असताना कामगारांना समजून सांगणाऱ्या नेत्यांचीही गरज आहे. उत्पादन करताना फक्त पगारच महत्वाचा नाही तर ज्याठिकाणी आपण काम करतो त्याठिकाणची क्वॉलिटी आणि क्वांटीटीही पाहणे गरजेचे आहे. आपल्या देशातील काही एक्सपर्ट कंपन्यांचा माल बाहेर पाठविण्याच्या दृष्टीने माल दर्जेदार व चांगला तयार व्हावयास पाहिजे, अशाप्रकारची समज कामगारांना देण्याच्या दृष्टीने कामगार नेत्यांनी कामगार व व्यवस्थापन यांच्यामध्ये समन्वय साधण्याची गरज आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ......

व्यवस्थापन आणि कर्मचा-यांमध्ये समन्वय साधला जातो . उद्योगाची प्रगती करताना व्यवस्थापन आणि कर्मचारी यांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे.त्यामुळे व्यवस्थापनास त्याचा फायदा मिळावा अशा प्रकारची भूमिका त्या ठिकाणी असली पाहिजे. दुदैवाने काही ठिकाणी व्यवस्थापनाकडून अन्यायाची भूमिका घेतली जाते. काही ठिकाणी कामगार अतिशय अनावश्यक मागण्या करतात आणि त्यामुळे गैरसमजुतीमधून प्रश्न उपस्थित होतात. परंतु या ठिकाणी कर्मचारी संघटना आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये समेट घडलेला आहे. मे. लिअर ॲटोमेटिव्ह इंडीया प्रा. लि इगतपुरी येथील कामगार ट्रेनिंग घेण्यासाठी अंबड येथे गेलेले आहेत. भविष्यात अशा प्रकारची घटना घडू नये यासाठी शासन दक्ष राहणार आहे.

...............

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : डोंबिवलीतील पाल प्युजो (प्रिमिअर) कंपनीच्या कामगारांची थकीत रक्कम न देणे.

**मु. शी.** : डोंबिवलीतील पाल प्युजो (प्रिमिअर) कंपनीच्या कामगारांची थकीत रक्कम न देणे याबाबत श्री. नितीन गडकरी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी डोंबिवलीतील पाल प्युजो (प्रिमिअर) कंपनीच्या कामगारांची थकीत रक्कम न देणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(उपप्रश्न नाहीत)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3..

**पृ. शी.** : नागठाणा (ता. अहमदपूर ) येथील शेतक-यांचे ऊसाच्या प्रश्नावर सुरु असलेले बेमुदत उपोषण.

**मु. शी.** : नागठाणा (ता. अहमदपूर ) येथील शेतक-यांचे ऊसाच्या प्रश्नावर सुरु असलेले बेमुदत उपोषण याबाबत सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, शरद पाटील यांनी नागठाणा (ता. अहमदपूर ) येथील शेतक-यांचे ऊसाच्या प्रश्नावर सुरु असलेले बेमुदत उपोषण या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 4...

( उपप्रश्न नाहीत)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण.

**मु. शी.** : राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण. याबाबत सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर ( पणन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर यांनी राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण. या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...

...

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल :सभापती महोदय, साखर कारखान्यांनी ऊस न उचलल्यामुळे या ठिकाणच्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहे. विधानसभेमध्ये शेतकऱ्यांना ऊसाचे गाळप न झाल्यास नुकसान झालेल्या शेतकऱ्यांस हेक्टरी 25 हजार रुपये इतके अनुदान देण्याची घोषणा केलेली आहे. परंतु येथे असा प्रश्न उपस्थित होतो की, प्रत्यक्षात शेतामध्ये उभा असलेला ऊस आणि सात बाराच्या उताऱ्यावर उभा असणारा ऊस यासंदर्भात काही माहीती मिळेल का ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, कृषी खात्याच्या अंदाजाप्रमाणे 640 ला ख टन ऊस उपलब्ध आहे .गेल्यावर्षी ऊसाचा चांगला भाव मिळाल्यामुळे व पाऊस चांगला पडल्यामुळे ऊसाच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. आतापर्यंत जवळपास 692 लाख टन ऊसाचे गाळप झालेले आहे. मराठवाडयामधील आकडेवारीमध्ये फरक आहे कारण मराठवाडयातील अनेक कारखाने गेल्या वर्षी बंद होते. यावर्षी महाराष्ट्रातील जे 22 कारखाने सुरु केले गेलेले आहेत. त्या पैकी 12 कारखाने हे मराठवाडयातील आहेत. साधारणत: 3 ते 4 महिन्यात म्हणजेच 31 मे पर्यंत सर्व कारखाने सुरु करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहे. त्यामुळे 31 मे 2007 पर्यंत या सर्व ऊसाचे गाळप केले जाईल. यानंतरही शिल्लक राहिलेल्या ऊसाचे गाळप झाले नाही तर कारखान्यासाठी, शेतकऱ्यांसाठी आणि ऊसासाठी ज्या विविध योजना योजना आहेत त्या प्रमाणे अनुदान घोषित केलेले आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर सन्माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले नाही.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी येथे तपशीलवार आकडीवारी देऊ शकत नाही.जालना जिल्हयामध्ये 1लाख 20 हजार टन, बीड जिल्हयामध्ये 90 हजार टन,नांदेड जिल्हयामध्ये 2 लाख 22 हजार टन आणि उस्मानाबाद जिल्हयामध्ये 50हजार टन इतके उत्पादन झालेले आहे. नगर आणि सोलापूर जिल्हयामध्ये ऊसाचे वितरण केलेले आहे. तरीदेखील गाळप न झालेल्या ऊसास शासनाकडून अनुदान देण्यात येई

..........................

6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासकीय सेवेतील डॉक्टर करीत असलेले खाजगी व्यवसाय.

**मु.शी.** : शासकीय सेवेतील डॉक्टर करीत असलेले खाजगी व्यवसाय याबाबत सर्वश्री मधुकर सरपोतदार, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. विमल मुंदडा ( सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "शासकीय सेवतेतील डॉक्टर करीत असलेला खाजगी व्यवसाय " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 9...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी जे भ्रष्टाचाराचे प्रमाण आलेले आहे त्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले आहे परंतु मला येथे असा प्रश्न विचारावयाचा आहे की,मुळात हा प्रकार घडलेला आहे की, नाही या बाबत काही खुलासा त्यांनी आपल्या उत्तरात केलेला नाही.आणि जर खरोखरच तसा प्रकार घडलेला असेल तर त्या संदर्भात कोठली कारवाई केली जाईल ?

यानंतर श्री. रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

आपण उत्तरात काय दिले आहे ? खाजगी वैद्यकीय व्यवसाय करता येत नाही, नाशिक जिल्हयातील 18 वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले असून त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979 मधील तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित आहे, असे निवेदनात म्हटले आहे. प्रत्यक्षात खाजगी व्यवसाय राज्यातील सर्व रुग्णालयातील डॉक्टर्स करीत असतात. डॉक्टरांनी खाजगी व्यवसाय करु नये, रुग्णालयाला पूर्ण वेळ द्यावा, असे बंधन त्यांच्यावर आहे किंवा नाही, असेल तर त्यांनी अशा प्रकारे खाजगी व्यवसाय करुन रुग्णालयाकडे दुर्लक्ष का करावे आणि औषधांच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार का करावा ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, नाशिक येथील 18 वैद्यकीय अधिकारी खाजगी व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व अधिका-यांची विभागीय चौकशी करण्यात येणार आहे. यापुढे डॉक्टरांनी खाजगी व्यवसाय करता कामा नये म्हणून त्यांच्यावर कारवाई करायची असेल तर विभागीय चौकशी त्वरित पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागीय चौकशी त्वरित पूर्ण करण्यात येईल.

------------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दि.20.3.07 रोजी मु.पो.ता.परळी वैजनाथ येथे श्री.बालाजी नरहरी जाधव यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला

**मु.शी.**: दि.20.3.07 रोजी मु.पो.ता.परळी वैजनाथ येथे श्री.बालाजी नरहरी जाधव यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला याबाबत सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पाशा पटेल, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "दि.20.3.07 रोजी मु.पो.ता.परळी वैजनाथ येथे श्री.बालाजी नरहरी जाधव यांच्यावर झालेला प्राणघातक हल्ला " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, ई.टी.व्ही.मराठी वाहिनीचे बातमीदार, पोलीस निरिक्षक श्री.बी.मुदीराज यांच्याकडे गेले असतांना त्यांनी आरोपी श्री.विठ्ठल लक्ष्मण तांदळे हे फरारी असल्याबाबतची माहिती दिलेली आहे. यासंदर्भात त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे का ?

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या घटनेमध्ये एकूण तीन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उपोषणाला बसल्यामुळे उपोषणकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पोलीस स्टेशनमध्ये समज देऊन त्यांना सोडण्यात आले आहे.

----------------

..4..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जळगाव व बीड येथे दहावीच्या परीक्षेत तयार उत्तरे मिळणे व पेपर फुटणे

**मु.शी.**: जळगाव व बीड येथे दहावीच्या परीक्षेत तयार उत्तरे मिळणे व पेपर फुटणे याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, डॉ.नीलम गो-हे, वि.प.स.यांनी "जळगाव व बीड येथे दहावीच्या परीक्षेत तयार उत्तरे मिळणे व पेपर फुटणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

--------------

..5..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, निवेदनावर एकच प्रश्न विचारण्याची संधी आपण देणार आहात. मी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेमध्ये दोन भाग आहेत. पहिला भाग असा आहे की, बीड येथे पेपर फुटल्याची बातमी आणि दुसरा भाग असा आहे की, जळगावमधील तयार उत्तरे मिळण्याबाबतची घटना. सूचनेतील तिस-या परिच्छेदामध्ये असे नमूद केले आहे की, दहावी परीक्षा चालू झाल्यापासून प्रत्येक पेपरच्या वेळी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा चालू असलेला सावळागोंधळ. जळगांवच्या संदर्भात निवेदनामध्ये असे उत्तर देण्यात आले आहे की, संबंधितांना अटक झाली आहे व बीडच्या संदर्भात इंग्रजी विषयाची प्रश्नपत्रिका लीक झालेली नाही, असे म्हटले आहे.

सभापती महोदय, एकाच ठिकाणी नाही तर अनेक ठिकाणी प्रश्नपत्रिकेमध्ये गोंधळ झाला आहे. प्रत्येक शहराबाबत नियम 93 अन्वये सूचना द्यायची झाली तर 93 हजार सूचना द्याव्या लागतील, अशी परिस्थिती माध्यमिक शिक्षण मंडळाची झाली आहे. नियम 93 च्या एकाच सूचनेत अनेक विषय दिले तर ती सूचना ॲक्सेप्ट केली जात नाही. माझा प्रश्न असा आहे की, या घटनेत ज्यांना अटक करण्यात आली आहे त्यांच्यावर अजामीनपात्र कलम लावून गुन्हा दाखल करण्यात आला आहे का ? अन्यथा, त्यांना जामीन मिळेल व हेच लोक मुलांवर दबाव आणणार आहेत आणि पंचनाम्याची वाट लावणार आहेत. जळगावच्या प्रकरणात श्रीमती भोळे यांना अटक केली, पंचनामा केला, गुन्हा दाखल केला, हे सर्व बरोबर केले आहे. परंतु, या सर्व गुन्हयातील आरोपी जामीनावर सुटले आहेत का ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अशा प्रकारची खूप प्रकरणे घडली आहेत, त्यामुळे यासंबंधीची माहिती मी पटलावर ठेवतो. माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या पद्धतीनुसार चौकशीअंती संबंधितांवर योग्य ती कारवाई होते. उत्तर पुरविण्याची प्रक्रिया ज्या लोकांनी सुरु केली होती त्या सर्व लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत व ते आता जामीनावर सुटले आहेत. अशा पद्धतीने महाराष्ट्रात एकूण किती लोकांवर कारवाई झाली आहे, याबाबतची माहिती मी पटलावर ठेवतो. तसेच, संबंधित संस्थेचे परीक्षा केंद्र बंद करण्याबाबतचे प्रकरण सुरु करणार आहोत.

..6.....



SRR/ MHM/ KGS/ 14:20

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नेमके उत्तर दिले तर आम्ही एक मिनिटातच काय अर्ध्या मिनिटात आमचा प्रश्न विचारु. महत्वाचा प्रश्न असा आहे की, अशा गुन्हयातील लोकांवर अजामीनपात्र कलमे लावणार का ? अन्यथा, हेच लोक साक्षीपुराव्यांमध्ये हस्तक्षेप करतील.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या सर्व कायदेशीर आणि कोर्टाच्या बाबी आहेत. कोणावर, कोणता गुन्हा दाखल व्हावा आणि कुणाला सोडावे, हा त्यांच्या अखत्यारितील प्रश्न आहे. परंतु, संबंधित संस्था आणि शिक्षकांवर कडक कारवाई करण्यात येईल.

----------------

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MHM/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर....... 14:25

पृ.शी. : परभणी येथे कुप्रसिध्द गुंड मेहबूब खान पठाण व वसीम खान पठाण यांनी कु.विद्या देशमुख यांच्यावर केलेला बलात्कार व तिची केलेली निघृण हत्या.

मु.शी. : परभणी येथे कुप्रसिध्द गुंड मेहबूब खान पठाण व वसीम खान पठाण यांनी कु.विद्या देशमुख यांच्यावर केलेला बलात्कार व तिची केलेली निघृण हत्या याबाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी परभणी येथे कुप्रसिध्द गुंड मेहबूब खान पठाण व वसीम खान पठाण यांनी कु.विद्या देशमुख यांच्यावर केलेला बलात्कार व तिची केलेली निघृण हत्या या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, अखेरीस हा विषय या सदनामध्ये चर्चेला आला त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देते. या विषयावर दोन दिवसापूर्वी मी एक औचित्याचा मुद्दाही सभागृहामध्ये उपस्थित केला होता. या विषयांवर लवकरात लवकर निर्णय घेणे आवश्यक आहे, म्हणून अशा केसेससंदर्भातील लवकरात लवकर न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून आपण त्या ठिकाणी फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करणार का ? सदर आरोपींवर आपण कोणत्या प्रकारची कारवाई केलेली आहे ? आणि फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु करण्याकरिता आपण काही कार्यवाही सुरु केलेली आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, हे जे कु.विद्या देशमुखचे प्रकरण घडलेले आहे तशाच प्रकारचे आणखी एक प्रकरण नाशिक विभागामध्येही घडलेले आहे. त्या दृष्टीकोनातून परभणी आणि नाशिक या दोन विभागांमध्ये फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्यासाठी कार्यवाही चालू केलेला आहे व त्याकरिता निधी मिळण्याकरिता शासनाकडे प्रस्तावही सादर केलेला आहे. परभणी व नाशिक येथे फास्ट ट्रॅक कोर्ट उभारण्याकरिता विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. श्री.मिसाळ व श्री.उज्वल निकम यांसारख्या वकिलांकडे अशा प्रकारच्या 10 ते 12 केसेस क्लप करुन फास्ट ट्रॅक कोर्ट लवकरात लवकर उभारण्याकरिता शासन विचार करीत आहे.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : - भिवंडी -निजामपूर महानगरपालिकेच्या मराठी,हिंदी,उर्दू माध्यमातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या थकित वेतन व निवृत्तीवेतनाबाबत.

मु.शी. : भिवंडी -निजामपूर महानगरपालिकेच्या मराठी,हिंदी,उर्दू माध्यमातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या थकित वेतन व निवृत्तीवेतनाबाबत याबाबत सर्वश्री.रामनाथ मोते,संजय केळकर,श्रीकांत जोशी,प्रतापराव सोनावणे,वि.प.स. यां□ी दिलेली ि□यम ९३ अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री.रामनाथ मोते,संजय केळकर,श्रीकांत जोशी,प्रतापराव सोनावणे,वि.प.स. यां□ी भिवंडी -निजामपूर महानगरपालिकेच्या मराठी, हिंदी, उर्दू माध्यमातील प्राथमिक शाळांमधील शिक्षकांच्या थकित वेतन व निवृत्तीवेतनाबाबत या विषयावर ि□यम 93 अ□्वये जी सूच□ा दिली होती, तिला अ□ुलजू□, आपज ि□देश दिल्याप्रमाजे मला ि□वेद□ ज रावयाचे आहे. ि□वेद□ाच्या प्रती सदस्यां□ा अजोदरच वितरीत जेलेल्या असल्या□े मी हे ि□वेद□ सभाजृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : ि□वेद□ सभाजृहाच्या पटलावर ठेवज्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे ि□वेद□ छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या मराठी,हिंदी,उर्दू माध्यमातील प्राथमिक शाळांसंदर्भात हा प्रश्न आहे. या विषयाबाबत हिवाळी अधिवेशन,2006 मध्येही या सभागृहामध्ये चर्चा झाली होती आणि त्यावेळेस मला शासनाकडून असे उत्तर मिळाले होते की, सदर शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या संदर्भामध्ये तातडीने कारवाई करण्यात येईल परंतु सभापती महोदय या ठिकाणी 600 - 650 पदांपैकी सुमारे 100 शिक्षकांची पदे गेल्या दोन तीन वर्षांपासून रिक्त आहेत. एका बाजूला एका शाळेमध्ये 250 विद्यार्थी असतात आणि त्यांना शिकविण्याकरिता एकच शिक्षक असतो. काही ठिकाणी शाळांमध्ये वर्गखोल्या उपलब्ध नाहीत व इतर आवश्यक शैक्षणिक सोयींचा अभाव व काही ठिकाणी 500 विद्यार्थी असतात आणि त्यांना शिकविण्याकरिता फक्त दोनच शिक्षक असतात आणि तेच सबंध वर्ग आणि विषय सांभाळतात. या सर्व विद्यार्थ्यांना हे शिक्षक एकाच वेळी वर्ग घेऊन शिकवितात, अशा प्रकारे ही अत्यंत बिकट अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि अशाही परिस्थितीमध्ये शासन दोन ते तीन वर्ष ही शिक्षकांची रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव प्रलंबित ठेवत आहे आणि दुस-या बाजूला आमचा 95 टक्के शिक्षक वर्ग हा अप्रामाणिक आहे असेही कडक ताशेरे सरकार आमच्यावर मारते. सदर शिक्षकांची रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात तातडीने किती दिवसांत कार्यवाही केली जाईल. मंत्रिमहोदय उत्तर देतांना असे म्हणतात की, आता तर आचारसंहिता लागलेली आहे याचा अर्थ असा होतो की, नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होईपर्यंत ही पदे भरली जाणार नाहीत का ? ही पदे पॉझिटिव्हली भरण्याच्या संदर्भात आपण काय कार्यवाही करणार आहात ? भिवंडी निजापूर येथील महानगरपालिकेच्या शाळांतील शिक्षकांना तीन चार महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही, निवृत्तीवेतनधारकांना दोन महिन्यांपासून निवृत्तीवेतन मिळाले नाही. शासनाने शिक्षकांना पगार देण्यास विलंब झालेला आहे, असे मान्य केलेले आहे आणि शासन निवेदनामध्ये असेही म्हणते की, शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकरिता कार्यवाही करण्यात येत आहे, अनुदान देण्यात येईल. शिक्षकांचे तीन महिन्यांचे थकलेले वेतन अदा करण्यात आलेले आहे. शिक्षकांचे अन्य जे प्रश्न आहेत, त्या अन्य प्रश्नांच्या संदर्भात आपण आयुक्त महोदयांना तातडीने आदेश देणार आहात का ? व शिक्षकांच्या अनेक प्रलंबित समस्या आणि प्रश्न मार्गी लागण्याकरिता तातडीने कोणत्या प्रकारची कार्यवाही आपण करणार आहात ?

II - 5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शिक्षकांच्या सर्व समस्या व आवश्यक शैक्षणिक सुविधा, शिक्षकांचे वेतन,निवृत्तीवेतन, भविष्य निर्वाह निधी खात्यावरील व्याज याबाबतचे सर्व प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यात येतील. शिक्षकांच्या रिक्त जागाही भरण्याची कार्यवाही नक्की सुरु करण्यात येतील.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





**<u>लक्षवेधी सूचना.</u>**

**पृ. शी.** : गोरेगाव येथील फिल्मसिटीची 22 एकर जमीन मुक्ता आर्टस या संस्थेला हस्तांतरण करण्याचा नियमबाहय केलेला व्यवहार.

**मु. शी.** : गोरेगाव येथील फिल्मसिटीची 22 एकर जमीन मुक्ता आर्टस या संस्थेला हस्तांतरण करण्याचा नियमबाहय केलेला व्यवहार यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण,विनोद तावडे,रामनाथ मोते , वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोरेगाव येथील फिल्म सिटी या सरकारी उपक्रमाच्या 514 एकर जमिनीपैकी 22 एकर जमीन मुक्ता आर्टस्च्या व्हिसलिंग बुडस् या प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या जमिनीसंदर्भातील करारावर सन 2003 सालच्या कॅगच्या अहवालात अत्यंत कडक ताशेरे ओढण्यात येणे, मुलत: फिल्म सिटी शासनाच्या दुग्धविकास मंडळाच्या मालकीची असून, या जमिनीचे हस्तांतरण आजपर्यंत चित्रपट, रंगभुमी आणि सांस्कृतीक विकास मंडळाकडे झालेले नसतांनाही महामंडळाने मुक्ता आर्टस् या संस्थेवर जमीन हस्तांतराचा बेकायदेशीर व नियमबाह्य व्यवहार करणे, त्यावेळच्या बाजार भावानुसार या जमिनीची किमत 60 ते 70 कोटी रुपये असणे व कॅगच्या 2003 सालच्या अहवालानुसार या जमिनीची किमत 28.20 कोटी रुपये असतानाही केवळ तीन कोटी रुपयांच्या मातीमोल भावाने संशयास्पद दृष्टया मुक्ता आर्टस्च्या व्हिसलिंग प्रकल्पासाठी देणे, या 20 एकर जागेच्याखेरीज आणखी दोन एकर जागेवर व्हिसलिंग बुडसची सदरहू जमीन पी.डी.आर.व्हीडी असणे, इलेक्ट्रॉनिक्सला 1974 साली महामंडळाने दिलेली असतांना व जागेचे हस्तांतरण करण्यात येऊ नये असा न्यायालयाचा स्थगन आदेश असल्याचे पत्र व्हिसलिंग बुड्स कंपनीला देऊनही त्या ठिकाणी व्हिसलिंग बुड्सने बेकायदेशीररित्या बांधकाम चालू ठेवणे या सर्व गैरव्यवहाराकडे व नियमबाह्य प्रकाराकडे शासनाने जाणूनबुजून दुर्लक्ष करणे,याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

II - 7



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ( सांस्कृतिक कार्य  मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय,आपण सदर लक्षवेधी सूचना राखून ठेवली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. या ठिकाणी मूळ जो भ्रष्टाचार झालेला आहे तो दुग्धविकास महामंडळाच्या जमिनीबाबतचा आहे. माझा असा प्रश्न असा आहे की, त्या वेळच्या बाजारभावानुसार या जमिनीची किंमत 60 ते 70 कोटी रुपये असतांनाही कँगच्या 2003 सालच्या अहवालानुसार या जमिनीची किंमत 28 कोटी 20 लाख रुपये असतांनाही केवळ तीन कोटी एवढया मातीमोल किमतीला सदर जमीन विकली गेली. यामध्ये दुग्धविकास महामंडळाच्या अधिका-यांनी हा जो भ्रष्टाचार केला, याला जॉईंट व्हेंचर म्हणता येईल. मुळात मुक्ता आर्टसच्या बाबतीत हे जॉईंट ॲडव्हेन्चर करण्याची गरजच नव्हती. आता या जमिनीची किंमत सुमारे 150 कोटी रुपये एवढी आहे आणि दुग्धविकास महामंडळाने 20 एकर जमीन तीन कोटी रुपयांमध्ये मुक्ता आर्टस या कंपनीला दिली. या करारामध्ये 20 कोटी रुपये एवढे शेअर कॅपिटल ठरलेले होते, त्यापैकी तीन कोटी रुपये हे शासनाने द्यावयाचे असेही ठरले होते.

यानंतर श्री.बोरले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण........

शासनाच्या अधिका-यांनी 3 कोटी रुपयांऐवजी 20 एकर जमीन दिली. ज्या जमिनीची किंमत 28 कोटी 20 लाख रुपये आहे, ती जमीन पैसे न घेता देण्यात आली आहे. 3 कोटी रुपये न घेता 20 एकर जमीन दिल्याची माहिती मिळालेली आहे. यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, भ्रष्टाचार करणा-या अधिका-यांवर फौजदारी घटला दाखल करण्यात येईल काय, शासन त्यांच्याकडून उर्वरित रक्कम वसूल करणार काय आणि ही सवलत देण्याचे कारण काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी ही जमीन दुग्ध विकास विभागाची आहे काय ? असा पहिला प्रश्न विचारलेला आहे. त्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. ही जमीन सांस्कृतिक कार्य विभागाच्या अखत्यारीत आहे. ही शासनाची जमीन आहे. दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला की, जमिनीची किंमत काय होती ? त्या जमिनीची किंमत 20 कोटी रुपये नसून 30 कोटी रुपये आहे. जमीन कोणाच्याही ताब्यात देण्यात आलेली नाही. शासनाने मुक्ता आर्टस् यांच्याशी जॉईंट व्हेन्चर करण्याचा निर्णय घेतला होता. जॉईंट व्हेन्चरमध्ये शासनाची 15 टक्के इक्विटी आहे. त्यामुळे शासनाने पैसे देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जमिनीची जी किंमत राहील ती शासनाची इक्विटी आणि उर्वरित पैसे मुक्ता आर्टस् यांनी द्यावयाचे आहेत व नवीन कंपनी स्थापन करावी, असा प्रस्ताव आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, जमिनीची किंमत 20 कोटी रुपये नसून 30 कोटी रुपये आहे. जमिनीची जी किंमत असेल ती शासनाची इक्विटी राहील. लक्षवेधी सूचनेला दिलेल्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "यापैकी रुपये 3.00 कोटी चित्रनगरीने 20 एकर जागेच्या स्वरुपात दिलेले आहेत." हे शासनाने मान्य केलेले आहे. या जमिनीची किंमत 20 कोटी रुपये नसून 30 कोटी रुपये आहे असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. 30 कोटी रुपयांची जमीन 3 कोटी समजून दिलेली आहे. सभापती महोदय, यामध्ये शासनाचे नुकसानच झालेले आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, ज्यावेळी मुक्ता आर्टस् यांच्याशी जॉईंट व्हेन्चर झ ाले त्यात जमिनीची किंमत शासनाची इक्विटी समजण्यात यावी, असा पहिला मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, जमिनीची किंमत जास्त असून इक्विटी 3 कोटी रुपयांची नाही, असा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण ........

महालेखाकारांनी आक्षेप घेतलेला आहे. श्री.गोविंद स्वरुप यांनी जो निर्णय घेतलेला होता त्यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप घेतला होता. जमिनीची किंमत 3 कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाला कोर्टामध्ये धाव घ्यावी लागली आणि आता हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, उर्वरित 27 कोटी रुपये त्यांच्याकडून शासन वसूल करेल काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, जमीन त्यांना प्रदान केलेली नाही. माझे म्हणणे सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे. मला सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, जमीन त्यांना देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. जॉईंट व्हेन्चर नुसार जमिनीची किंमत ही शासनाची इक्विटी राहणार आहे. ही शासनाची जमीन आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, जमिनीची किंमत 20 कोटी रुपये नसून 30 कोटी रुपये आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, महालेखाकारांच्या म्हणण्यानुसार जमिनीची किंमत 20 कोटी रुपये नसून 30 कोटी रुपये आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, जमीन ही शासनाची इक्विटी आहे. माझा प्रश्न असा आहे की, एकूण प्रोजेक्टची किंमत किती आहे, त्यामध्ये व्हिसलिंग वुडच्या संचालकांचा समभाग किती आहे आणि शासनाचा समभाग रुपयांमध्ये किती आहे ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, 20 कोटी रुपयांचा प्रकल्प असावा, अशी सुरुवातीची संकल्पना होती. 3.00 कोटी रुपये चित्रनगरीने आणि 27 कोटी रुपये मुक्ता आर्टस् यांनी प्रकल्पासाठी उभारावेत, अशी कल्पना आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, रेडी रेकनर प्रमाणे या जमिनीची किंमत काय आहे ?

(यानंतर श्री.गागरे ........

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.बोरले 14:35

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, त्यावेळी इक्वीटीच्या बाबतीत जो निर्णय घेण्यात आला तो निर्णय चुकीचा होता म्हणून महालेखाकारांनी आक्षेप घेतलेला आहे, हे मी मान्य केलेले आहे. जमिनीच्या किंमती काढण्याच्या दोन पध्दती आहेत, टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंटने व्हॅल्यूएशन काढल्याप्रमाणे किंवा रेडी रेकनरप्रमाणे किंमती असतात. त्यावेळी या जमिनीची किंमत 30 कोटी रुपये होती असे महालेखाकारांच्या आक्षेपामध्ये म्हटले आहे. महालेखाकारांनी काढलेले आक्षेप तरी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी मान्य करावेत, हे मी सांगू इच्छितो.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी नमूद केले आहे की, शेअर कॅपीटल 20 कोटी रुपयांचे असून तीन कोटी रुपये शासनाने द्यावयाचे आहेत. या जमिनीची किंमत 30 कोटी रुपये असताना शासनाने 3 कोटी किंमत काढली आहे. तीन कोटीच्या जॉईंट व्हेंचरमध्ये नवीन बदललेल्या रेडी रेकनरप्रमाणे 30 कोटी रुपये किंमत आहे का ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, याबाबतचा निर्णय नव्याने घेण्यासंबंधी कार्यवाही सुरु झालेली आहे. परंतु हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असल्याने नव्याने रिकास्ट करावे लागणार आहे. जमिनीची किंमत जर 30 कोटी रुपये असेल तर त्या अनुषंगाने शासनाची इक्विटी असली पाहिजे. महालेखाकारांचे आक्षेप पाहता जमिनीची किंमत 30 कोटी रुपये गृहीत धरुन शासनाची इक्विटी जमिनीच्या किंमतीच्या अनुषंगाने असली पाहिजे, त्या अनुषंगाने कॉस्ट वाढली पाहिजे. परंतु सध्या याबाबतीत शासन कोणताही निर्णय घेऊ शकत नाही कारण सदरील प्रकरणात न्यायप्रविष्ट आहे. मी कायदेशीर सल्ला घेऊन सभागृहात बोलत आहे, कायदेशीर बाबी पाहिल्या तर यापूर्वी घेतलेला निर्णय बदलणे शासनाला सध्या शक्य नाही किंवा नव्याने काही निर्णय घ्यावयाचा असेल तर ते शक्य नाही. जमिनीच्या बाबतीत जनहित याचिका दाखल झालेली आहे. तसेच पिडीया इलेक्ट्रॉनिक्स नावाच्या कंपनीने असा दावा केला आहे की, ही जमीन आम्हाला देण्यात आली होती, ती आमची जागा आहे. त्यामुळे जोपर्यत न्यायालयाकडून या प्रकरणाचा अंतिम निर्णय लागत नाही, तो पर्यत शासनास कोणतीही पावले टाकता येणार नाहीत असे ॲडव्होकेट जनरल यांचे मत आहे. त्यामुळे या प्रकरणी न्यायालयाच्या निर्णयानंतर कार्यवाही करण्यात येईल.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MHM/ KGS/

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, शासनाने मुक्ता आर्टस बरोबर जॉईंट व्हेंचर केलेले आहे. मुक्ता आर्टससारख्या अनेक मोठया संस्था मुंबई शहरात आहेत. या कामाचे ग्रेडेशन करण्याच्या आधी प्रि-क्लॉलिफिकेशन करता आले असते. हे काम कोणत्या पध्दतीने केलेले आहे ? टेंडर प्रोससने केलेले आहे की, मुक्ता आर्टसकडून प्रस्ताव आला म्हणून त्यांच्याशी करार केला आहे ? याकरिता शासनाने कोणते निकष लावले होते ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, महालेखाकारांनी ऑडीटमध्ये जे आक्षेप काढलेले आहेत, ते वाचून दाखवितो "सिलेक्शन प्रोसेसमध्ये अन्य निविदा मागविण्यात आल्या नव्हत्या, त्यामुळे त्या वेळेस जे घडले ते प्रोसीजर फॉलो न करता झालेले आहे". याबाबत मी महत्वाची बाब सभागृहासमोर मांडू इच्छितो की, तेथे आज सर्व काम पूर्ण झालेले आहे, 56 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. ॲक्टींग, डायरेक्शन, सिनेमेटॉग्राफी, फिल्म अँड टेलीव्हिजन इन्स्टिटयूट इत्यादी काम तेथे सुरु आहे, 126 विद्यार्थी तेथे शिक्षण घेत आहेत.

सभापती महोदय, मला मुद्दाम या ठिकाणी सांगावयाचे आहे की, ही अनियमितता घडविणारे कोण आहेत ? मुंबई हे फिल्म प्रॉडक्शनचे हब आहे. मुंबईमध्ये व राज्यामध्ये अत्यंत रिनाऊंड फिल्म प्रोडयुसिंग केले जाते. शासनाने त्यावेळी भूमिका स्वीकारली होती की, खाजगीकरणाच्या माध्यमातून मुंबईमध्ये गुंतवणूक आली पाहिजे, फिल्म क्षेत्रात चांगले स्टुडिओ व चांगल्या इन्स्टिटयूट आल्या पाहिजेत. ही सर्व प्रक्रिया पार पाडत असताना पारदर्शकता नव्हती, निविदा मागविण्याची प्रक्रिया त्यावेळी घडली नाही, अनियमितता घडली आहे. त्याबाबतीत न्यायालय जो निर्णय घेईल, त्या अनुषंगाने शासन कार्यवाही करील एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री.गोविंद स्वरुप यांचे पुढे काय झाले ?

( उत्तर नाही )

---------

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठीच्या हंगामी निवासी शाळांना अनुदान न मिळणे.

**मु.शी.** : रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठीच्या हंगामी निवासी शाळांना अनुदान न मिळणे याबाबत सर्वश्री गोविंदराव आदिक, संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

---

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेल) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी विनंती करतो. --

" राज्यातील रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्या अनेक कुटुंबातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने सुरू केलेल्या तात्पुरत्या स्वरूपातील हंगामी निवासी शाळांना माहे ऑक्टोबर 2006 पासून शासनाकडून अद्यापही अनुदान न मिळाल्याने शहापूर तालुक्यातील सुमारे 150 विद्यार्थ्यांवर आलेली उपासमारीची वेळ, त्यांच्या नियत अनुदानात सुधारणा करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, शासनाकडून त्यांच्या न्याय्य प्रश्नावर होत असलेली डोळेझाक, परिणामी त्यांच्यात पसरलेली तीव्र निराशेची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केलेल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... एलएल 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा. शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्हा हा आदिवासी जिल्हा आहे. आदिवासींमध्ये कुपोषणाचे प्रमाण लक्षणीय असल्याने नवसंजीवनी योजना तेथे लागू केली आहे. मात्र याचे अनुदान वेळेवर दिले जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. बऱ्याच ठिकाणी वेळेवर अनुदान न मिळाल्याबद्दलच्या तक्रारी आलेल्या आहेत त्याबद्दल शासनाची भूमिका काय आहे? तसेच या शहापूर तालुक्यातील 7 वसतिगृहांपैकी एक वसतिगृह सुरू न होण्याची कारणे काय आहेत ? तसेच या वसतिगृहांमधील फूड क्वालिटी फार कमी असते, खरे तर या आदिवासी मुलांना पौष्टिक आहार दिला गेला पाहिजे. तेव्हा त्याबाबतीत शासनाकडून काय दक्षता घेण्यात येईल ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, खरे म्हणजे हे सगळे स्थलांतर करणाऱ्या पालकांचे पाल्य आहेत त्यामुळेच त्यांच्यासाठी अशी वसतिगृह निर्माण करण्याशिवाय पर्याय नाही. म्हणून आपण जवळपास 157 वसतिगृहे निर्माण केली असून त्यातील जवळपास 130 वसतिगृहे ही ठाणे जिल्ह्यात आहेत व त्यात 4076 मुले आहेत. सभापती महोदय, ऑगस्ट महिन्यात खरे तर त्यांचा सर्व्हे होऊन अहवाल यायला पाहिजे होता. परंतु जिल्हा परिषद आणि ग्राम समित्यांचा याबाबतचा ठराव उशिरा आल्यामुळे त्यांना वेतन कमी दिले गेले आहे. यापुढे मात्र त्याला वेळ होणार नाही. तसेच या वसतिगृहांमधील अन्नाचा दर्जा चांगला राहील याचीही काळजी घेण्यात येईल.

***

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत ....**</u>

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेतील क्रमांक 3 ची लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल. या लक्षवेधी सूचनेला उत्तर देणारे मंत्री महोदय विधानसभा सभागृहामध्ये व्यस्त असल्याने ही सूचना मी पुढे ढकलत आहे. आजच्या लक्षवेधी सूचनांवरील चर्चा संपेपर्यंत सदरहू मंत्री महोदय सभागृहात न आल्यास, ही लक्षवेधी सूचना सोमवार, दिनांक 16.4.2007 रोजी पहिल्या क्रमांकावर घेण्यात येईल.

.

...... एलएल 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : ठाणे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये नोंदणी केलेल्या बेरोजगारांना रोजगाराची एकही संधी केंद्रातर्फे न मिळणे.

**मु.शी.** : ठाणे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये नोंदणी केलेल्या बेरोजगारांना रोजगाराची एकही संधी केंद्रातर्फे न मिळणे यासंबंधी सर्वश्री अरूण गुजराथी, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, डॉ.वसंत पवार, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

--

श्री. अरूण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.-

" ठाणे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्रामध्ये सद्य:स्थितीत सुमारे दोन लाख बेरोजगार तरूणांनी नोकरीसाठी केलेली नोंदणी, सदर बेरोजगारांना कामधंदा मिळवून देण्यास प्रशासनास येत असलेले अपयश, अनेक वर्षांपासून नोंदणी केलेल्या हजारो बेरोजगारांना एकदाही मुलाखतपत्र दिलेले नसल्याची धक्कादायक माहिती, या केंद्राकडून कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले जात नसल्याने नोंदणी करणाऱ्या बेरोजगारांची दिवसें दिवस घटत असलेली चिंताजनक संख्या, सन 2005 मध्ये सुमारे साडेतीन लाख बेरोजगार तरूणांची असलेली नोंदणी, सन 2006 मध्ये सव्वा लाखाने कमी होऊन सध्या केवळ दोन लाख बेरोजगारांमध्ये असलेले नैराश्याचे वातावरण, या प्रकरणी सखोल चौकशी करून उपाय योजना करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेली अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी लक्षावधी सुशिक्षित बेरोजगारांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, रोजगाराचे साधन उपलब्ध होत नसल्याने त्यांची तसेच कुटुंबियांची होत असलेली उपासमार, त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना पसरून आत्महत्यासारख्या पर्यायांचा मार्ग अवलंबण्याची निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करता, या संदर्भात तातडीने उपाय योजना करण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना आणि शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ..... एलएल 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सूचनेवरील मा.रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. अरूण गुजराथी : सभापती महोदय, या निवेदनात दिलेल्या माहितीनुसार 2005 मध्ये नोंदणी केलेले 40725, पाठवणी केलेले 53,539 आणि नोकरीस लागलेले 551 म्हणजे पाठवणी केलेल्याच्या केवळ 1 टक्का बेरोजगारांना रोजगार आपल्या केंद्राकडून मिळालेला आहे. तसेच 2006 मध्ये नोंदणी केलेले 24557, पाठवणी केलेले 45560 आणि नोकरीस लागलेले 464 म्हणजे 1 टक्का लोकांनाच आपण आपल्या केंद्रामार्फत नोकरी देऊ शकलो आहोत. त्यामुळेच आता बेरोजगार लोक आपल्या केंद्रामध्ये नोंदणी करीत नाहीत. म्हणूनच या केंद्राच्या आणि त्यातील कार्यपद्धतीमध्ये आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे असे मला वाटते. अन्यथा या रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयांचा काहीही उपयोग होणार नाही. याबाबतीत शासनाची सर्वसाधारण भूमिका काय आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या निवेदनात नमूद केल्यापमाणे नोंदणी पटावर उमेदवारांची संख्या कमी होण्यामागील महत्त्वाचे कारण असे आहे की, त्यांनी आपले नोंदणी कार्डाचे तीन वर्षांनी नूतनीकरण केले पाहिजे असते ते केलेले नाही. तसेच शासनाने या संदर्भात जी कारवाई केलेली आहे, नवीन योजना ठरविली आहे तिची माहिती यात दिलेली आहे. त्यानुसार ठाणे जिल्ह्यात बेरोजगारांच्या एकूण 65 सहकारी सेवा सोसायट्या आपण सुरू केलेल्या आहेत आणि या सोसायट्यांना जवळपास 3 कोटीचे व्यवस्थापकीय अनुदान दिलेले आहे. त्याच बरोबर या बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने एक नवीन योजना ठरविली आहे. त्यानुसार प्रत्येक तीन महिन्याला एक मेळावा या बेरोजगारांचा घेण्याचे आपण ठरविले आहे. त्याप्रमाणे घेतलेल्यास डिसेंबरमधील मेळाव्याला 1200 उमेदवार होते आणि त्यातील 856 उमेदवारांच्या उद्योजकांकडून मुलाखती घेऊन 245 उमेदवारांची नोकरीसाठी निवड केली गेली आहे. तसेच रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम या योजनेंतर्गत या वर्षी म्हणजे 2005-06 मध्ये 5455 लोकांना या कार्यालयाकडून रोजगारासाठी पाठविले होते. सभापती महोदय, या ज्या सेवा सोसायट्या आहेत त्यांना टेंडरशिवाय कामाची संधी दिलेली आहे. त्यामुळे या सोसायट्यांना कामेदेखील मिळत आहेत. याप्रमाणे सर्वसाधारणत: शासनाने पावले उचलली आहेत.

...... एलएल 5 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या बेरोजगारांमध्ये अशिक्षित असलेले असे 1351, 7वी पर्यंत शिकलेले 10793, 9 वी पास असलेले 28040, 10 वी पास असलेले 1.40 लाख, 12 वी पास असलेले 1.10 लाख आणि पदवीधर असलेले 38000 अशी वर्गवारी आहे. म्हणजे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या जास्त असताना या सुशिक्षित बेरोजगारांच्या सेवा सोसायट्या स्थापन झाल्या आहेत परंतु या सोसोयट्यांना शासनाची अशी जी कामे आहेत ती देण्याबाबत शासनाकडून सर्व विभागांना, कार्यालयांना निर्देश दिले जातील काय ?

( यानंतर श्री. सरफरे ..... एमएम 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यापूर्वी सांगितल्याप्रमाणे 5 लाखापर्यंतची विना निविदा कामे अशा सेवा सोसायटयांना द्यावीत असे शासनाचे आदेश आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक विभागाला सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार न मिळाल्यामुळे त्यांच्यामध्ये असंतोषाची भावना पसरली आहे. आम्हा सुशिक्षित बेरोजगारांना बघणारे या शासनामध्ये कुणी आहे की नाही? अशाप्रकारे असंतोष त्यांच्या मनामध्ये खदखदत आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते माननीय श्री.शरद पवार साहेब या सदनामध्ये विरोधी पक्षनेते होते त्यावेळी ते आपल्या भाषणामध्ये नेहमी म्हणायचे की, सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळवून दिला नाहीतर त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण होईल. लोकशाही उलथवून टाकण्याची ताकद त्या असंतोषामध्ये असेल. सभापती महोदय, या संदर्भात माझ्याकडे एक धक्कादायक माहिती आली आहे. सेवा योजन कार्यालयामार्फत नोकरीचे कॉल पाठविण्यात येत नसल्यामुळे सन 2006 मध्ये 1 लाख 28 हजार 529 तरुणांनी आपल्या कार्डांचे नूतनीकरण केले नसल्याची माहिती प्रकाशामध्ये आली आहे. ही माहिती खरी आहे काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, ही माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही, ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रत्नागिरी गॅस पॉवर लि. कंपनीच्या 5 कामगारांचा झालेला मृत्यू

**मु.शी.**: रत्नागिरी गॅस पॉवर लि. कंपनीच्या 5 कामगारांचा झालेला मृत्यू याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. परशुराम उपरकर, अरविंद सावंत, संजय दत्त, कर्नल सुधीर सावंत, सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, सुधाकर गणगणे, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, गुरुमुख जगवानी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते व त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"रत्नागिरी गॅस पॉवर लि. कंपनीच्या एका गॅस टाकीचे काम करीत असताना रोप ट्रॉलीचा दोरखंड दिनांक २ मार्च, २००७ रोजी तुटून झालेल्या भीषण अपघातात पुंज लाईड कंपनीच्या ५ कामगारांचा झालेला मृत्यू व एका कामगारास गंभीर स्वरुपाची झालेली दुखापत, रत्नागिरी गॅस पॉवर कंपनीने कामाचे कंत्राट दिलेल्या पुंज लाईड कंपनीच्या व्यवस्थापनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे व अपघातानंतरही इतर कामगारांच्या संरक्षणाची हमी घेण्यास कंपनीने केलेली टाळाटाळ, परिणामी कंपनीतील सर्व कामगार वर्गात व त्यांच्या कुटुंबियात पसरलेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, मृत कामगारांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासाठी होणारी टाळाटाळ व जखमी कामगारावरील औषधोपचार करण्यास होत असलेली दिरंगाई, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवीत आहे.

**उपसभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दररोज अशा स्वरुपाच्या घटना घडत असतात. आणि त्या घटना घडल्यानंतर विधानपरिषदेमध्ये नियम 93 ची सूचना, लक्षवेधी सूचना दिल्या जातात. मला असे विचारावयाचे आहे की, या कामगारांचा विमा कंपनीने उतरविला होता काय? जेव्हा एखादी मूळची कंपनी दुसऱ्या कंपनीशी करार करते तेव्हा त्या करारामध्ये कामगारांच्या सुरक्षिततेसाठी दुसऱ्या कंपनीकडून कोणत्या दर्जाचे साहित्य वापरले पाहिजे याबाबत शासनाने आचारसंहिता तयार केली आहे काय? निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे या लोकांना नुकसान भरपाईचे पैसे मिळाले आहेत की, फक्त नुकसान भरपाई जाहीर केली आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ही घटना रत्नागिरी गॅस पॉवर लि. कंपनीमध्ये घडली. पूर्वीची दाभोळ पॉवर कंपनी म्हणजे एन्रॉन कंपनी आहे. या कंपनीमध्ये एल.एल.जी. गॅसच्या माध्यमातून वीज निर्माण करावयाची आहे. त्याकरिता रत्नागिरी गॅस पॉवर लि. कंपनीने पुंज लॉईड लि. कंपनीला गॅस साठविण्याच्या टाकीचे बांधकाम करण्याचे कंत्राट दिले होते. प्रिन्सिपल एम्प्लॉई म्हणून रत्नागिरी गॅस पॉवर लि. कंपनीने पुंज लॉईड लि.कंपनीशी करार केला होता. घटना घडण्यापूर्वी कंपनीने त्या कामगारांचा जनरल इन्शुअरन्स काढला आहे. या जनरल इन्शुअरन्सशिवाय निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे कामगारांना सरसकट 2 लाख रुपये देण्यात आले आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (पुढे सुरू....

त्या व्यतिरिक्त एकूण 21 लाख रुपये अधिक देण्यात आलेले आहेत. विमा क्लेम करतील त्यानंतर पैसे मिळतील.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या खात्याच्या अंतर्गत इंडस्ट्रीयल सेफ्टी डिपार्टमेंट आहे. त्या ठिकाणचा रोप वे तुटल्यामुळे एकूण 5 लोक मृत्युमुखी पडलेले आहेत. रत्नागिरी पॉवर कंपनीने पुंज लॉईड या कंपनीला काम दिलेले आहे. हे पेटी कॉन्ट्रॅक्टर आहेत. पुंज लॉईड या कंपनीने सुरक्षिततेच्या दृष्टीने सगळी काळजी घेतली किंवा कसे ? याबाबतची चौकशी इंडस्ट्री सेफ्टी डिपार्टकडून झालेली आहे काय ? त्यांनी त्यांचा अहवाल दिलेला आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, ही घटना कंपनीच्या प्रिमायसेसपासून 1 कि.मी.अंतरावर घडलेली आहे, याला कंपनी ॲक्ट लागू नाही. परंतु सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कंपनीच्या व्यवस्थापनाने याबाबत निष्काळजीपणा दाखविलेला आहे. त्या संदर्भात त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत. त्या अनुषगाने गुन्हा रजिस्टर क्रमांक 19/2007, भा.दं.सं.304 (अ), 338, 34 नोंदलेला आहे. आरोपी श्री.अनिल पासवान आणि व्यवस्थापन यांच्यावर खटले दाखल केलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एलएलजी टर्मिनल आणि समुद्राच्या आतमध्ये जेटी बांधलेली आहे त्या ठिकाणी मी गेलेलो आहे,त्याची मला माहिती आहे. रत्नागिरी गॅस ते पेटी कॉन्टॅक्ट पुंज लॉईड लि. ही बेसिक पावर कंपनी, दाभोळ येथे काम करत आहेत त्या ठिकाणी त्यांनी सेफ्टी मेझर्स घेणे आवश्यक आहे. पुली रोप वेची वापर तुटल्यामुळे ट्रॉली कोसळली. आपल्याच विभागाच्या अंतर्गत डायरेक्टर ,फॅक्ट्री सेफ्टी डिपार्टमेंट यांनी त्या ठिकणी जाऊन पहाणी केलेली आहे काय? पुंज लॉईड लि. कंपनी आंतरराष्ट्रीय दर्जाची आहे, अन लिमिटेड कंपनी आहे. ती कामगारांच्या सुरक्षेविषयी काही करणार नसेल तर ते योग्य नाही. आपल्या विभागातील फॅक्टरी सेफ्टी डिपार्टमेंटचे डायरेक्टर पाठवून त्यांच्यावर कारवाई का करत नाही ?

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, फॅक्टरीच्या प्रिमायसेसपासून 1 कि.मी. च्या अंतरावर ही घटना घडलेली आहे. इमारत आणि बांधकाम कामगार अधिनियम हा केंद्र सरकारचा कायदा आहे. आपल्याकडे त्या अधिनियमाअंतर्गत नियम करण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. या ठिकाणी वाहून नेणारी कुपी ही हाईस्ट कंपनीची होती. दिनांक 24-2-2007 ला ती स्टॅन्डर्ड आहे किंवा नाही याची चौकशी केली.

श्री.नितीन गडकरी : माझी एकच विनंती आहे की, कायदा केला. परंतु ही घटना फॅक्टरीच्या बाहेर घडलेली असली तरी मोठमोठी टनेलची कामे चालू असतात. त्या ठिकाणी दरड कोसळली तर त्यांना फॅक्टरी ॲक्ट लागू नाही, असे आपण म्हणणार आहात काय ?

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

फॅक्टरीच्या अंतर्गत एरियामध्ये सुरक्षिततेची काळजी घेतो तशी हायवेवर किंवा फॅक्टरीपासून दूर काम करणाऱ्या कामगारांची काळजी 50-60 कोटीच्या कंत्राटदारांनी घेतली पाहिजे. हा माणूसकीचा प्रश्न आहे. पैसे वाचविण्यासाठी हे कंत्राटदार सर्व इक्विपमेंट्स ठेवत नाहीत. कामगार आपला जीव धोक्यात घालून काम करीत असतात. माझी शासनाला विनंती आहे. ज्यावेळी अशा घटना घडतात त्यावेळी आपण केंद्र शासनाच्या कायद्याचा उपयोग करु शकता. केंद्र शासनाने मंजूर केलेला कायदा राज्याला लागू आहे. त्याप्रमाणे सेफ्टी मेझर्स घेतले गेले पाहिजेत. सेफ्टी मेझर्स फॅक्टरीच्या अंतर्गत एरियामध्ये तसेच फॅक्टरीच्या बाहेरच्या एरियामध्येही घेतले गेले पाहिजेत. शासनाने या प्रकरणाची चौकशी करावी. फॅक्टरीच्या एरियामध्ये असेल किंवा फॅक्टरीच्या बाहेर असेल, कॉन्ट्रॅक्टर असेल किंवा पेटी कॉन्ट्रक्टर असेल, त्या ठिकाणी अनेकांचे जे प्राण जात आहेत याबाबत ते दोषी आढळून आले तर पूंज लॉईड कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालकाविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय हे थांबणार नाही. शासन ते करणार काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितल्याप्रमाणे फॅक्टरीच्या बाहेर असो किंवा फॅक्टरीच्या आत असो त्या ठिकाणी सेफ्टी मेझर्स घेणे गरजेचे आहे. त्याच्या या मताशी मी सहमत आहे. त्याच अनुषंगाने इंडस्ट्रियल सेफ्टी अँड हेल्थ हा कामगार खात्याचा भाग आहे. इमारत बांधकाम आणि अन्य भागामध्ये मग बोगद्याचे काम असेल, रस्त्याचे काम असेल त्या ठिकाणी हा कायदा निश्चितपणे केला जाईल आणि फॅक्टरीच्या प्रिमायसेसमध्ये जशी औद्योगिक सुरक्षितता दिली जाते तशी बाहेरही देण्याच्या बाबतीत शासन कायदा करील.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : अण्णा भाऊ साठे यांच्या मृत्यूच्या दाखल्यामध्ये त्याच्या वडिलांच्या नावाचा तसेच राष्ट्रीयत्वाचा उल्लेख नसणे

**मु. शी.** : अण्णा भाऊ साठे यांच्या मृत्यूच्या दाखल्यामध्ये त्याच्या वडिलांच्या नावाचा तसेच राष्ट्रीयत्वाचा उल्लेख नसणे याबाबत श्री. प्रकाश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. प्रकाश शेंडगे ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

" अण्णा भाऊ साठे हे थोर साहित्य सम्राट आणि श्रमिकांचे श्रध्दास्थान व दलितांचे नेते यांच्या मृत्यूचा दाखला मुंबई महानगरपालिकेने दिला, त्या दाखल्यामध्ये अण्णा भाऊ साठे यांच्या विषयी राष्ट्रीयत्वाच्या कॉलममध्ये "नॉट स्टेटेड" असा उल्लेख केला असून वडिलांचे नाव या कॉलममध्येही "नॉट स्टेटेड" असा उल्लेख आहे, पृथ्वी ही शेषाच्या फण्यावर तरलेली नसून ही श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे, हे जागतिक पातळीचे तत्वज्ञान मांडणारे अण्णाभाऊ साठे यांच्या मृत्यूच्या दाखल्यामध्ये अशा प्रकारच्या अक्षम्य चुका करुन महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का लावला आहे, सदर मृत्यूचा दाखला सदनामध्ये सादर करीत आहे, अण्णाभाऊ साठे यांचे राष्ट्रीयत्व नाकारुन हा अपमान केला आहे, त्यांच्या वडिलांच्या नावाच्या बाबतीत सुध्दा शासनाने घोर अपमान केला आहे, तरी शासनाने या दलित समाजाची व श्रमिकांची माफी मागून हे सर्व रेकॉर्ड सुधारित करुन त्यांचे राष्ट्रीयत्व व त्यांच्या वडिलांचे नाव लिहून मृत्यूचा सुधारित दाखल देण्याचे त्वरित आदेश काढावेत, तसेच शासन दरबारी ज्या ज्या नोंदी हव्या असतील, त्या त्या ठिकाणी तशा सुधारित नोंदी करण्याचे आदेश त्वरित काढावेत, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे मांडू इच्छितो."

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS/ SBT

श्री. प्रकाश शेंडगे ....

सभापती महोदय, या विशेष उल्लेखाव्दारे मी अतिशय गंभीर बाब सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो. या महाराष्ट्राचे थोर साहित्य सम्राट, श्रमिकांचे श्रध्दास्थान तसेच दलितांचे नेते कै. अण्णाभाऊ साठे यांचा मृत्यूचा दाखला मुंबई महानगरपालिकेने दिला. त्या दाखल्यामध्ये त्यांना नॅशनॅलिटी नाकारण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या वडिलांच्या नावाच्या कॉलममध्ये "नॉन स्टेटेड" असे लिहून या महान नेत्याला अपमानास्पद वागणूक दिली गेली आहे. ज्या अधिकाऱ्यांनी त्यांना नॅशनलिटी नाकारलेली आहे. ज्या अधिकाऱ्याने त्यांच्या वडिलांचे नाव माहीत करुन घेण्याची तसदी घेतलेली नाही त्या अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार काय ? सदरहू मृत्यूचा दाखला माझ्याकडे आहे. तो मी आपल्याकडे पाठवतो. त्यामध्ये नॅशनलिटीच्या रकान्यात "नॉट स्टेटेड" असे लिहिले आहे. तसेच वडिलांच्या नावासमोरही "नॉन स्टेटेड" असे लिहिले आहे. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव आहे हे या सरकारला माहीत नाही काय ? अण्णा भाऊ हे त्यांचे टोपण नाव आहे. त्यांचे मूळ नाव तुकाराम आहे. त्यांच्या वडिलांचे नाव रेकॉर्डवर आणून तसेच त्यांची नॅशनलिटी दर्शवून त्यांच्या मृत्यूचा नवीन सुधारित दाखला देण्यास अधिकाऱ्यांना भाग पाडणार काय ? आपण याबाबतीत निदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो. तसेच त्यांची जी वारसादर सून आहे ती आज भांडी घासण्याचे काम करते. म्हणून शासनाने काही तरी करुन त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करावी. त्यांना घर द्यावे तसेच नोकरी द्यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे. सभापती महादेय, याबाबत आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : ही बाब अत्यंत गंभीर आहे. शासनाने त्यांची पूर्ण माहिती सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांच्याकडून घ्यावी. त्यांच्या सुनेच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी परिस्थिती सांगितली तशी परिस्थिती या थोर कलावंताच्या घरात राहू नये असे मला वाटते. त्यांच्या पुनर्वसनाबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यांच्या राहण्याच्या जागेचा प्रश्न आहे काय ?

श्री. प्रकाश शेंडगे : त्यांची सून भांडी घासण्याचे काम करते. त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे.

**उपसभापती** : या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालावे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:00

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील थोर साहित्यिक, कलावंत होते. ते दलित आणि श्रमिकांचे श्रध्दास्थान होते. अशा पध्दतीने त्यांच्या मृत्यूचा दाखला देणारे हे कोण अधिकारी आहेत ?...

**उपसभापती** : मी राज्य शासनाला असे निदेश देतो की, या गंभीर प्रकरणी तातडीने चौकशी करावी. अणाभाऊ साठे यांच्या सुनेच्या पुनर्वसनाची जबाबदारी शासनाने घ्यावी. तसेच ज्या अधिका-यांनी गंभीर चूक केलेली आहे त्याच्यावर योग्य ती कारवाई करावी.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:00

**पृ.शी.** : बांद्रा (मुंबई) येथील गांधीनगर औद्योगिक कामगार वसाहतीमध्ये समाजमंदिर बांधण्याबाबत

**मु.शी.** : बांद्रा (मुंबई) येथील गांधीनगर औद्योगिक कामगार वसाहतीमध्ये समाजमंदिर बांधण्याबाबत श्री.मधुकर सरपोतदार, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

बांद्रा (मुंबई) येथील गांधीनगर ही औद्योगिक कामगारांची वसाहत असून तेथे 45 वर्षापासून स्थानिक रहिवाश्‍ी गणेशोत्सव व नवरात्रोत्सव असे विविध कार्यक्रम आयोजित करीत आहेत. तेथे इलाईट सहकारी गृहनिर्माण संस्था उभी असून सदर गृहनिर्माण संस्थेला म्हाडाने करार करुन सदर समाजमंदिराची जागा गृहनिर्माण संस्थेच्या उभारणीसाठी हस्तांतर करण्यात आली. सदर कराराला तेथील रहिवाशांचा तीव्र विरोध आहे. कारण तेथील जागा उपरोक्त गृहनिर्माण संस्थेला दिल्याने रहिवाशंना आपले वर्षानुवर्षाचे उत्सव साजरे करण्यास जागा नसल्याने सध्या अडगळीच्या जागेत सदर उत्सव साजरे करण्याची पाळी रहिवाशांवर आलेली आहे. सदर शासकीय जागा खाजगी गृहनिर्माण संस्थेला सर्व नियम डावलून दिल्याने या प्रकरणी शासनाने तात्काळ चौकशी करण्याची नितांत आवश्यकता आहे. याबाबत गृहनिर्माण विभागाच्या सचिवांशी मी पत्र व्यवहार केलेला असून त्यांचे उत्तर मला अद्याप प्रात्र झालेले नाही. याप्रकरणी शासनाने संपूर्ण तपास करावा. तेथील स्थानिक लोकांना समाजमंदिर नाही, ती जागा खाजगी सोसायटीला दिलेली आहे. या प्रकरणी शासनाने पूर्ण माहिती घेऊन आणि या विशेष उल्लेखाची नोंद घेऊन शासनाने खुलासा करावा.

---

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधरांना नोकरी देण्यासंबंधी शासनाचे उदासीन धोरण

**मु.शी.** : पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधरांना नोकरी देण्यासंबंधी शासनाचे उदासीन धोरण याबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"सन 1991साली 591.8 हजार नोंदणी झाली होती. सन 2006 साली 608.1 हजार नोंदणी झाली आहे. सन 1991 साली 64.8 हजार पदांची निर्मिती झाली होती. त्या जागा 68.3 हजार पदे आहेत. म्हणजेच पदाच्या निर्मितीत फार वाढ झालेली नाही. मात्र धक्कादायक गोष्ट अशी की, 14.8 हजार नोक-या 2006मध्ये देण्यात आल्या. वास्तविक पदाच्या संख्येपेक्षा ह्या पदांची संख्या अत्यल्प आहे. मात्र रजिस्टर मधील संख्या 3608.5 हजार इतकी आहे. यावरुन राज्य शासनाचे पदवीधरांना नोकरी देण्याविषयीचे उदासीन धोरण दिसून येते. आज मुंबईत 4 लाख 45 हजार 975 इतके पदवीधर शासकीय आकडेवारीप्रमाणे आहेत. ही संख्या कमी असावी. पदव्युत्तर पदवीधर 34234 असून त्यांच्या बाबतीत शासनाने ताबडतोब ह्या रिक्त पदानुसार भरती सुरु करावी. याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, राज्यातील रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संदर्भातील परिस्थिती अतिशय गंभीर आणि चिंताजनक आहे. अनेक पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधर तसेच शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेले अनेक तरुण आज बेकार आहेत. मी राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे यांची आकडेवारी देऊ इच्छितो. सन 1991मध्ये नोंदणी झालेल्या उमेदवारांची संख्या 591.8

...4..

(डॉ. दीपक सावंत ...)

हजार इतकी होती. रिक्त पदांची संख्या 64.8 हजार इतकी होती. त्यानंतर सन 2006मध्ये नोंदणी झालेल्या उमेदवारांची संख्या 608.1 हजार इतकी आहे. ही नोंदणी कमी आहे. या पेक्षाही उमेदवरांची संख्या खूप अधिक असावयास पाहिजे. 1991मध्ये 64.8 हजार एवढया रिक्त पदांपैकी 30.3हजार पदे भरलेली होती. त्या उलट आता 2006च्या आकडेवारी नुसार 68.3 हजार इतक्या रिक्त पदांपैकी केवळ 14.8 हजार पदे भरलेली आहेत. याचा अर्थ रिक्त पदांच्या संख्येनुसार शासनाने भरती केलेली नाही. मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, रोजगार आणि स्वयंरोजगार कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे केवळ 14.8 हजार इतकीच पदे 2006 सालापर्यन्त भरली गेली. राज्यामध्ये पदवीधर आणि पदव्युत्तर उमेदवार बेकार असून ते नोकरीच्या शोधात आहेत. याकडे शासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे असे दिसते. जवळ जवळ 50,000 रिक्त पदे आहेत. पदवीधर आणि पदव्युत्तर पदवीधर तसेच शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नोक-या मिळण्याच्या दृष्टीने ही पदे तातडीने भरली जावीत यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : 1976 चा अर्बन लॅण्ड सिलिंग कायदा रद्द करणे.

मु.शी. : 1976 चा अर्बन लॅण्ड सिलिंग कायदा रद्द करणे याबाबत श्री.प्रतापराव सोनवणे, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्यामध्ये अर्बन लॅण्ड सिलिंग कायदा, 1976 त्वरित रद्द करण्याबाबत केंद्र शासनाच्या स्पष्ट सूचना असताना व राज्याच्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत ठराव मंजूर होऊन सुध्दा राज्यात हा कायदा का रद्द होत नाही? समाजातील दुर्बल घटकांना स्वस्त घरे आणि सार्वजनिक हितासाठी काम करणाऱ्या संस्था व सरकारला स्वस्त दरात जमिनी उपलब्ध व्हाव्यात हे दोन प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठी 1976 साली हा नागरी जमीन कमाल धारणा म्हणजे सिलिंग कायदा लागू करण्यात आला. प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी करताना अनेक पळवाटा लाल फितीच्या कारभारात सोडल्या गेल्या. त्यामुळे या कायद्याचा मूळ हेतू अजिबात साध्य झाला नाही. जनसामान्यांना, गरजू घटकांना या कायद्याचा कुठलाही लाभ मिळाला नाही. या कायद्याचा फायदा खरा कोणाला झाला हे जगजाहीर आहे. केंद्र सरकारने दि.22 मार्च, 1999 साली हा कायदा रद्द केला व ज्या ज्या राज्यांमध्ये हा कायदा लागू आहे त्यांनीही हा कायदा त्वरित रद्द करावा अशा सूचना दिल्या होत्या. तद्नंतर महाराष्ट्र शासनाने 11 जानेवारी, 2001 च्या कॅबिनेट मंत्रिमंडळ बैठकीत खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला.

"महाराष्ट्र राज्यात मुंबई, पुणे व ठाणे ही महानगरे वगळता इतर सर्व ठिकाणी म्हणजे नागपूर, सोलापूर, नाशिक, उल्हासनगर, सांगली, कोल्हापूर याठिकाणी हा कायदा त्वरित रद्द करण्यात यावा."

प्रत्यक्षात हा कायदा महाराष्ट्र शासनाने रद्द केलेला नाही. मधल्या काळात केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान योजना जाहीर करुन राज्यातील सर्व महानगरपालिकांना मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला. मात्र या योजनेचा लाभ घेणाऱ्या महानगरपालिकांनी सिलिंग





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कायदा रद्द करुन घेतला पाहिजे अशी केंद्राची महत्वाची अट आहे. तरीही शासनाने अजून हा कायदा रद्द केलेला नाही. मध्यंतरीच्या काळात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सिलिंग कायदा रद्द करीत आहोत असे आश्वासनही दिलेले आहे. परंतु प्रत्यक्षात कुठलीही कार्यवाही आजतागायत झ ाालेली नाही. शासन हा कायदा का रद्द करीत नाही? यामागे काय गौडबंगाल आहे, कोणत्या शक्ती यासाठी कार्यरत आहेत अशी जनसामान्यांमध्ये चर्चा आहे. शासन हा कायदा अजून रद्द करीत नसल्यामुळे जनसामान्यांचे, शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. विकास कामांवर बंधने येत आहेत. शासन जनसामान्यांच्या हितासाठी काम करीत आहे की मूठभरांचे हित बघत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. शासनाने त्वरित तातडीने निर्णय घेऊन हा कायदा रद्द करावा व जनसामान्यांचा दुवा घ्यावा अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-------------

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : भातसा धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळणे

मु.शी. : भातसा धरणासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळणे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या भातसा धरणातून शहापूर, भिवंडी, वसई आणि कल्याण तालुक्यातील शेतीसाठी डाव्या व उजव्या कालव्यातून पाणी देऊन हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या असणे, उजव्या व डाव्या कालव्यासाठी जमिनी संपादित करुन 22 वर्षे होऊनही उजव्या कालव्यातील पाणी सोडले जात असून, 10 ते 12 वर्षे या कालव्याच्या पाण्यातून स्थानिक शेतकऱ्यांबरोबर कोणतेही नियोजन न केल्यामुळे सोडण्यात आलेले पाणी 80 टक्के वापरण्याविनाच गंगेला मिळणे, खातिवली, दहागांव आणि अन्य गावातील लहान मोठ्या कालव्याच्या क्षेत्रात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जागा घेऊन 20 ते 22 वर्षे उलटली गेली असूनही कोणतीही कायदेशीर नोंद व त्याचा मोबदला शेतकऱ्यांना न मिळणे, सदरहू मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्यांच्या मनात शासनाविषयी निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष निर्माण झालेला आहे. 22 वर्षे उपेक्षित असलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशा प्रकारचे आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी विनंती करतो.

----------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



पृ.शी. : कणकवली शहरातील मसूरकर कॉम्प्लेक्सच्या बांधकामात

झालेला गैरव्यवहार.

मु.शी. : कणकवली शहरातील मसूरकर कॉम्प्लेक्सच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे, त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कणकवली शहरातील मसूरकर कॉम्प्लेक्सच्या बांधकामासाठी देण्यात आलेल्या प्रस्तावात कणकवली नगरपरिषदेने केलेल्या खाडाखोडी, मसूरकर कॉम्प्लेक्स बांधकामाच्या जागेवर मटण मार्केट व मासळी मार्केटचे शासनाचे असलेले आरक्षण, तेथे बांधकाम करताना किमान 15 टक्के बांधकाम केलेला हिस्सा कणकवली नगरपंचायतीला विनामूल्य देण्याची शासनाने घातलेली अट, सदर कॉम्प्लेक्सच्या बांधकामाला देण्यात आलेल्या मंजूरीपेक्षा अधिक बांधकाम करण्यात येणे, मंजूर आराखड्यात करण्यात आलेली खाडाखोड, मसूरकर कॉम्प्लेक्सच्या बांधकामात अनियमितता व गैरव्यवहार असल्याच्या कारणावरुन काम बंद करण्याची नगरपंचायतीने विकासकाला दिलेली नोटीस, उपरोक्त कॉम्प्लेक्सच्या बांधकामाला नगररचना विभागाने दिलेली परवानगी व त्यानंतर कणकवली नगरपंचायतीने त्यात केलेली खाडाखोड, या प्रकरणी दोन्ही शासकीय कार्यालयांनी एकमेकांवर टाकलेली जबाबदारी, कणकवली नगरपरिषदेच्या पदाधिकाऱ्यांचा या प्रकरणी हात असल्याचा होत असलेला गंभीर आरोप, कणकवलीतील मसूरकर कॉम्प्लेक्सच्या बांधकाम परवानगीत नियम डावलून करण्यात आलेल्या बांधकामात लाखो रुपयांचा झालेला भ्रष्टाचार, याबाबत वस्तुस्थिती सभागृहासमोर येण्यासाठी शासनाने निवेदन करावे अशी मी विनंती करतो.

--------

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**वि.स.वि.क्र. 73 बाबत**

**उपसभापती** : सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 73- महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत)(सुधारणा) विधेयक 2005 संदर्भातील विधेयक सदनासमोर चर्चेला आहे. परंतु या विधेयकाच्या संदर्भात ज्या दोन सन्माननीय सदस्यांनी सुधारणा दिलेल्या आहेत ते सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत त्यामुळे सदर विधेयकावर चर्चा आता सुरु करावयाची की, ते विधेयक सोमवारी घ्यायचे असे मला विचारावयाचे आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी उपसूचना दिलेली आहे ते सन्माननीय सदस्य असे कसे गैरहजर राहू शकतात ? ज्या सन्माननीय सदस्यांनी सुधारणा मांडलेली आहे, ती सुधारणा त्यांनी परत घ्यावी, अशी आम्ही त्यांना काल विनंती केली होती आता सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी याबाबत आपले विचार व्यक्त केल्यानंतरच, आम्ही त्या प्रमाणे आमचे विचार व्यक्त करु.

(सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार सभागृहात उपस्थित होतात.)

**उपसभापती** : ज्या दोन सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावर उपसूचना मांडलेली आहे ते दोन्ही सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्यामुळेच मी हा मुद्दा उपस्थित केलेला होता. ठीक आहे. सभागृहाचे कामकाज मी 3.45 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे. सभागृहाची बैठक पुन्हा सुरु झ ााल्यानंतर या विषयासंबंधी चर्चा करु.

(3.12 ते 3.45 मध्यंतर)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**पृ.शी.**: पोलीस महासंचालक डॉ.पी.सी.पसरिचा यांच्या संदर्भात वृत्त वाहिनीने केलेले स्टींग ऑपरेशन

**मु.शी.**: पोलीस महासंचालक डॉ.पी.सी.पसरिचा यांच्या संदर्भात वृत्त वाहिनीने केलेले स्टींग ऑपरेशन याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.आर.आर.पाटील ( उपमुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते यांनी पोलीस महासंचालक डॉ.पी.सी.पसरिचा यांच्या संदर्भात वृत्त वाहिनीने केलेले स्टींग ऑपरेशन या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रकरणी आम्हाला महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांच्यामार्फत चौकशी नको आहे. या प्रकरणाची चौकशी आपण निवृत्त न्यायधीशांच्या मार्फत करावी, अशी आमची मागणी आहे. सभापती महोदय, हे फारच गंभीर प्रकरण असून श्री.शैलेश सावला या बिल्डरने डॉ.पसरिचा यांच्याबद्दल वक्तव्ये केले आहे. ते टी.व्ही. कॅमेऱ्यासमोर असे म्हणाले की, राज्याचे पोलीस महासंचालक, डॉ.पसरिचा हे माझे गार्डीयन आहेत. त्यामुळे हे फारच गंभीर प्रकरण आहे. श्री.सावला बिल्डर यांच्यावर एसआरए योजनेमध्ये घोटाळा केल्याचा आरोप आहे. या घोटाळयातून वाचविण्यासाठी पोलीस महासंचालक यांनी त्यांना मदत केली आहे, असा आरोप केला जात आहे. त्यामुळे हे प्रकरण फारच गंभीर असून माझी मागणी आहे की, आपण या प्रकरणाची चौकशी निवृत्त न्यायाधीशांमार्फत करावी.

श्री.आर.आर.पाटील : कृपया माझे ऐकून घ्यावे. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात. )

श्री.पांडुरंग फुंडकर : आम्हाला मुख्य सचिवांमार्फत चौकशी नको आहे. आपण निवृत्त न्यायाधीशांमार्फत या प्रकरणाची चौकशी करावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्याअर्थी राज्याच्या पोलीस महासंचालकांविरुध्द असे कॅमेऱ्यासमोर बोलले जाते, त्याअर्थी या पाठीमागे काहीतरी काळेबेरे असेल, त्यामुळे याबाबतची प्राथमिक चौकशी होईल व त्यामध्ये काही आढळले तर नंतर कोणाचीही चौकशी नेमण्यास शासन तयार आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात. )

**उपसभापती** : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत बसावे. पहिली गोष्ट अशी की, माननीय गृहमंत्र्यांनी त्यांचे निवेदन केलेले आहे. याप्रकरणी चौकशी करण्याच्या दृष्टीने समिती नेमली आहे असे त्यांनी सांगितलेले आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिलेली होती.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे बोलल्यानंतर मी सभागृह तहकूब केले व शासनाला या संदर्भात निवेदन करण्यास सांगितले. त्याप्रमाणे शासनाने निवेदन केलेले आहे.त्या निवेदनामध्ये म्हटले आहे की मुख्य सचिवामार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल..

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आम्हास मुख्य सचिवांतर्फे चौकशी नको आहे तर निवृत्त न्यायाधीशांतर्फे चौकशी व्हावी, अशी आमची मागणी आहे.

श्री. आर आर पाटील : सभापती महोदय, परवा आंध्रच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्र सरकार बद्दल,महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबद्दल अनुद्‌गार काढले, याबद्दल दोन्ही सदनामध्ये चर्चा झाली. आंध्र सरकारच्या विरोधात आताच्या आता ठराव घेतला पाहिजे, अशा प्रकारचे वातावरण सदनामध्ये तयार झालेले होते.वर्तमानपत्रातील एक बातमी या खेरीज या संदर्भात दुसरा कोणताही पुरावा नव्हता. आंध्रच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या वक्तव्याचा इन्कार केला. बातमी तपासल्यानंतर त्यामध्ये तथ्य आढळून आले नाही. आंध्रच्या मुख्यमंत्र्यांनी हे वक्तव्य केलेले आहे, असे गृहीत धरुन येथे चर्चा करण्यात आली होती. एक बिल्डर महासंचालकाच्या विरोधात का बोलतो आहे, त्याचा बोलविता धनी कोण आहे या बाबत चौकशी होण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक चौकशी करण्यासाठी तीन वरिष्ठ अधिकारी नेमलेले आहेत. सभापती महोदय, या राज्याच्या मुख्य सचिवावर जर आपण विश्वास ठेवणार नसाल, या राज्याच्या 2 सचिवांवर विश्वास ठेवणार नसाल, अँटी करप्शनच्या महासंचालकांवर विश्वास ठेवणार नसाल व कोणतीही प्राथमिक चौकशी झालेली नसताना केवळ वर्तमानपत्रातील एका बातमीमुळे न्यायाधीशामार्फत चौकशी केली जाऊ लागली तर सरकारला कारभार करणे अवघड होऊन जाणार आहे. यामध्ये कोणाचा काहीही दोष आढळला तर कोणालाही पाठीशी घालण्याची भूमिका हे शासन करणार नाही. परंतु वर्तमानपत्रातील केवळ एका बातमीमुळे निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशीची मागणी करणे ही काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर अन्यायकारक होऊ शकेल. चौकशीत काही तथ्य आढळले, बेकायदेशीर कृती आढळली तर निश्चितपणे शासनाकडून त्या संदर्भात कारवाई केली जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या ठिकाणी श्री. शैलेश सावला यांनी मुलाखतीत असे सांगितले की, श्री. पसरिचा हे माझे गॉड फादर आहेत. जुहू येथे श्री पसरिचा यांनी 3.5कोटी रुपयाचा पेंट हाऊस घेतला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2

उपसभापती : एखादा माणूस कोणी तरी माझा गॉड फादर आहे असे म्हणत असेल तर......

श्री.नितीन गडकरी: सभापती महोदय, कोणताही शासकीय अधिकारी आणि मंत्री ज्यावेळी अशा प्रकारे पैसे कमावतात व प्रॉपर्टी खरेदी करतात त्यावेळी ते स्वत:च्या नावावर खरेदी करीत नाहीत. त्यांच्या लिंक्स शोधून काढाव्या लागतात.लिंक्स शोधल्यानंतर त्या डमी असल्याचे आढळते. त्यांनी बोगस कंपन्या तयार केलेल्या असतात. पुष्कळ लोकांच्या बेनामी प्रॉपटर्या कशा तयार होतात याची मला माहीती आहे. आपली हिंमत असेल तर माझी चौकशी करा. मी महाराष्ट्रात 8 हजार कोटीची कामे केलेली आहेत. माझ्यात दम आहे म्हणून मी येथे बोलत आहे. मी घाबरत नाही. माझी आपणास अशी विनंती आहे की, आर.आर. पाटील आपण इतके न्यायप्रिय आहात, आपल्या मतदारसंघात काही घडल्यावर आपण त्या ठिकाणी चौकशी करतात या प्रकरणामध्ये चीफ सेक्रेटरी तर्फे चौकशी करण्यात येईल असे आपण म्हणालात. परंतु या प्रकरणामध्ये श्री पसरिचाचे डमी कोण आहे, याची चौकशी करा. यामध्ये एकच मुद्दा आहे की, सभापती महोदय, राजकारणामुळे काही चांगल्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले गेले,घरी पाठवले आपण हे द्वेष बुध्दीने केले आहे. या बाबतीत पत्रकार श्रीमती बावेचा, बिल्डर राजकुमार लुधानी व श्री. शैलेश सावला या सर्वांची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. मी पुन्हा सांगतो की, कोणतेही राज्यकर्ते स्वत:च्या नावावर प्रॉपर्टी करीत नाही

**उपसभापती** : हे वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

यानंतर श्री रोझकर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...........

सभापती महोदय, मी तुमच्याबद्दल बोलत नाही.

**उपसभापती** : माझ्याबद्दल बोलण्याचा प्रश्नच येत नाही. माझ्याबाबत बोलून बोलून सगळे थकले, मी स्वच्छ आहे, तुमच्या व्याख्येत मी बरोबर बसतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तुमच्या स्वच्छ चारित्र्याला मी सलाम करतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे स्वच्छता अभियान मी राज्यभर सुरु करीन.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी आपल्याबद्दल किंवा कोणाबद्दल स्पेसिफिक बोलत नाही. जेव्हा जेव्हा सी.बी.आय.ने केसेस घातल्या त्यावेळी त्या केसमधील प्रॉपर्टी त्या माणसांच्या नावावर नसतात, मित्रमंडळींच्या नावावर असतात, डायरेक्ट-इनडायरेक्ट सर्किट असते. माझ्याकडे तर अशी माहिती आहे की, राज्यातील एक आय.ए.एस.अधिकारी हुंडीवर पैसे लावतात. त्यांचे पैसे व्याजावर दिले जातात. मला पोलीस ऑफीसर्स कसे आहेत ते माहित आहे, काही चांगले आहेत, जे चांगले आहेत त्यांना चांगलेच म्हटले पाहिजे. पसरिचा देखील चांगले निघावेत, अशा माझ्या शुभेच्छा आहेत. मला त्यांच्यावर आरोप करायचा नाही. परंतु, या प्रकरणात जी नावे आलेली आहेत, त्यांची चौकशी झाली पाहिजे. ही चौकशी किती दिवसात करणार आहात, कोणाच्या मार्फत करणार आहात ? राज्याचे मुख्य सचिव आता रिटायर्ड होत आहेत. मुख्य सचिवांमार्फत चौकशी करण्यामध्ये अडचण आहे की, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, वगैरे मुख्यसचिवांना अडचणीचे होईल. निवृत्त न्यायाधिशांमार्फत चौकशी करण्याचा मार्ग चांगला सूचविला आहे, माझ्यापेक्षा विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय उत्तम सूचना केली आहे. आणि उपमुख्यमंत्री महोदय, आपला स्वभाव असा आहे की, जे चांगले सूचविले असेल, मग ते कुणीही सूचवो, तुम्ही तो निर्णय घेता. त्यामुळे निवृत्त न्यायधिशांमार्फत चौकशी करा. त्यात काही अडचण असेल तर सी.बी.आय.कडे चौकशी द्या. होऊन जाऊ द्या, दूध का दूध और पानी का पानी. घाबरण्याचे कारण काय आहे ? होऊन जाऊ द्या.

**उपसभापती** : राज्य शासनाच्या अधिका-यांकडून चौकशी होते त्यामध्ये भेसळ असते का ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला परवानगी देता का ? अनेक प्रकरणे माझ्याकडे आहेत.

..2........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मला असे म्हणायचे होते की, आपल्या अधिका-यांवर आपला विश्वास नाही का ?

श्री.नितीन गडकरी : माझा कुणावरही विश्वास नाही. लक्ष्मीदर्शन कार्यक्रम हा गल्ली-गल्लीत, गावा-गावात, तालुक्या-तालुक्यात, तलाठी, पटवारी पासून सर्वत्र सुरु आहे. सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील यांना सर्व माहित आहे. ते सुसंस्कृत व्यक्ती आहेत, या राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत, त्यांच्या एका साईडबद्दल मला आदर आहे, त्यांनी हात ठेवून सांगावे की, 100 टक्के स्वच्छ चारित्र्याचा, स्वच्छ कारभार आहे. त्यांनी हमी द्यावी. म्हणून माझी विनंती आहे की, निवृत्त न्यायाधिशांकडून या प्रकरणाची चौकशी करावी, त्यामध्ये अडचण असेल तर सी.बी.आय.कडे चौकशी द्यावी. सत्य बाहेर येऊ द्या, होऊन जाऊ द्या, दूध का दूध, और पानी का पानी. राज्याच्या डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांच्यावर आरोप करणे बरोबर नाही. एकमेकाला फसवून एकमेकाला दोषी ठरविण्याचा प्रकार पोलीस खात्यात सुरु आहे, तोही बाहेर येऊ द्या. जे पत्रकार आहेत त्यांची चौकशी करा, त्यांचा बोलविता धनी कोण आहे ते पहा. आरोप चुकीचे असतील तर ते शोधून काढा, परंतु हे प्रकार खपवून घेंता कामा नये. मिडियातील काही पत्रकारांकडून ब्लॅकमेलिंग होत असेल तर ते बाहेर काढा, होऊ द्या, होऊ द्या पण लक्ष्मीदर्शन चालणार नाही. माझी विनंती आहे की, याबाबत आपण निवृत्त न्यायाधीश नाही तर सी.बी.आय.यांची चौकशी ताबडतोब लावावी आणि सभागृहाला पंधरा दिवसात अहवाल सादर करावा. असा काही तरी या प्रकरणात निर्णय घ्या. माझा विश्वास आहे की, तुम्ही कोणचेही कृत्य पाठीशी घालणार नाही. असा निर्णय घेतला नाही तर समाजात मेसेज वाईट जाईल, याचीही काळजी घ्या.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, तहलका डॉटकॉम च्या पत्रकाराकडे एस.एम.सावला जातो, पसरिचांविरुध्द बदनामीकारक बोलतो, पसरिचा माझे गॉडफादर आहेत, असे स्टेटमेंट देतो, येथेच त्याचा करता करविता, बोलविता धनी दुसरा कुणीतरी असण्याची शक्यता आहे, साशंकता आहे. यामध्ये ज्या प्रॉपर्टींची नावे दिली आहेत त्यात त्यांनी स्वत:च्या नावे घेतलेल्या प्रॉपर्टी आहेत. आय.ए.एस.अधिकारी किंवा आय.पी.एस.अधिकारी यांच्यावर यासंदर्भात असे बंधन आहे की, त्यांनी खरेदी केलेल्या मालमत्तेची माहिती दरवर्षी शासनाला दिली पाहिजे.

..3........



SRR/ SBT/ MHM/ 15:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...........

त्यांनी सन 1975 पासून सगळया प्रॉपर्टीची माहिती शासनाला प्रत्येक वर्षी कळविली आहे, एक वर्ष देखील खंड पडलेला नाही. तसेच, ही माहिती केंद्र सरकारलाही कळविण्यात आली आहे.

यानंतर कुमारी जयश्री...........

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, यामध्ये जर या अधिका-याला काही करावयाचे असते तर......

ते सुध्दा या तपासाचा भाग होईल, आपण नियम 93 च्या सूचनेमध्ये जे मुद्दे दिलेले आहेत, ते सर्व या कमिटीकडून तपासण्यात येतील, यामध्ये जर कोणी दोषी आढळले तर किंवा या कमिटीच्या तपासणींतर्गत प्रथमदर्शनी यामध्ये काही तथ्य आढळले तर आपण म्हणाल त्या यंत्रणेकडे मग ती सी.बी.आय.असो वा निवृत्त न्यायाधिश असो याची तपासणी करण्याकरिता आदेश देण्यास शासन तयार आहे. कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला पाठीमागे घालण्याची भूमिका या शासनाने घेतलेली नाही. परंतु शासनाला ही काळजी देखील घेतली पाहिजे की, यामध्ये नाहक कोणावरही कोणत्याही प्रकारचा अन्याय होता कामा नये.

श्री.नितीन गडकरी : यापूर्वी आपल्याच सरकारच्या कारकीर्दीत चार चार मंत्र्यांच्या चौकशीचे आदेश आपण ताबडतोब काढले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जर कोणी दोषी असेल तर शासन त्याला पाठीशी घालण्याची भूमिका घेणार नाही, व नाहक कोणत्या अधिका-यावर किंवा कोणावरही अन्याय न होऊ देण्याची अशा दोन्ही गोष्टींची काळजी आपण घेतली पाहिजे. यामध्ये जर कोणी दोषी आढळून आले तर कोणीही यातून सुटणार नाही, याची काळजीही शासनाकडून घेतली जाईल. प्रथमदर्शनी एका वृत्तवाहिनीवर जर कोणाविरुध्द काही बातमी देण्यात आली तर लगेच त्याच्याविरुध्द एन्क्वायरी लावणे हे कोणत्याही दृष्टीने योग्य नाही.

श्री.नितीन गडकरी : यापूर्वी आपलेच सरकार सत्तेवर असतांना आपण श्री.शशिकांत सूतार आणि शिवकुमार यांच्यावर ताबडतोब चौकशीचे आदेश निर्गमित केले होते.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्यावेळी ज्या माणसाने उक्त आरोपींवर आरोप लावले होते त्या माणसाची म्हणजे ज्येष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांची विश्वासार्हता लक्षात घेऊन चौकशीचे आदेश तातडीने निर्गमित करण्यात आले होते. या प्रकरणामध्ये इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये असलेल्या स्पर्धेचाही सहभाग आहे, हल्ली वृत्तवाहिन्यांमध्ये फार स्पर्धा आहेत. या प्रकरणाची शासनाला प्रथमदर्शनी शहानिशा करु द्या जर यामध्ये कोणीही दोषी आढळून आले तर सरकार कोणालाही पाठीशी घालणार नाही, अथवा यातून निघालेले कोणत्याही प्रकारचे सत्य शासन कोणत्याही परिस्थितीत नाकारणार नाही. असे कोणत्याही वृत्तवाहिन्यांवर स्टिंग

WW-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

ऑपरेशनद्वारे कोणाबद्दलही काहीही दाखविण्यात आले आणि त्याची लगेच आपण सी.बी.आय.चौकशी लावणे, निवृत्त न्यायमूर्तींकडून हे प्रकरण तपासून घेण्याचे आदेश देणे हे सन्माननीय सदस्य श्री.नितीन कडकरी आपल्याला तरी पटतय का ? उद्या कोणत्याही वर्तमानपत्रात कोणाबद्दलही काहीही छापून आले आणि शासनाने त्यावर लगेच सी.बी.आय.चौकशी लावली तर या शासनातील अधिकारी व कर्मचारी सेवेमध्ये राहू शकतील का ? प्रत्येक ठिकाणी हा न्याय लावून आपल्याला चालेल का ? सभापती महोदय, यामध्ये माझी अशी स्पष्ट भूमिका अशी आहे की, जर कोणी यामध्ये प्रथमदर्शनी दोषी आढळले तर त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका हे शासन कदापि घेणार नाही, त्याच्यावर कडक कारवाई केली जाईलच आणि जर कोणी निर्दोष असेल तर त्याला हे शासन नाहक दोषी ठरवून शिक्षा देणार नाही.

**उपसभापती** : ताबडतोब चौकशी लावण्याचा न्याय जर सगळीकडे लावावयास लागले तर प्रशासन डिमॉरलाईज होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या शासनाच्या कोणत्या बडया अधिका-याकडे किती प्रॉपर्टी आहे यासंबंधीची सर्व कागदपत्रे व पुरावे मी आता वाचून दाखवू का ? त्याला खूप वेळ लागेल, पाहिजे तर मी वाचून दाखवितो.

श्री.विनोद तावडे : वेंगुर्ल्याचेही यासारखेच एक प्रकरण आहे.

श्री.नितीन गडकरी : शासनाचा कोणताही अधिकारी कितीही पगार असला तरी महाराष्ट्रभर प्रॉपर्टी विकत घेत फिरणार का ?

श्री.विनोद तावडे : एवढयाशा पगारात शक्य आहे का ते ?

श्री.नितीन गडकरी : आपण मगाशी असे म्हणालात की, "या प्रकरणामध्ये खरोखर कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर सी.बी.आय.चौकशी लावण्यात येईल परंतु नाहक कोणावरही अन्याय होता कामा नये याचीही आपण काळजी घेतली पाहिजे."

श्री.आर.आर.पाटील : "जर ते निर्दोष आढळले तर" असाही मी उल्लेख त्यावेळी केला होता.

श्री.दिवाकर रावते : आपण आता कसे ठरविले की ते निर्दोषच आहेत. अजून एन्क्वायरी

WW-3

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





श्री.दिवाकर रावते.....

कमिटीचा चौकशी अहवाल यावयाचा आहे. यामध्ये चौकशी करण्याकरिता त्यांच्याव्यतिरिक्त जे अधिकारी आहेत ते सर्व त्यांच्यापेक्षा खालच्या दर्जाचे अधिकारी असल्यामुळे ते त्यांच्याविरुध्द कशी चौकशी करतील ?

श्री.नितीन गडकरी : कारण काही लोक मुख्य सचिव होण्यासाठी दिल्लीच्या चकरा मारीत आहेत. मुख्य सचिव या पदासंदर्भात एका दलित महिलेवर अन्याय होत आहे.

( गोधंळ )

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब आपण जरा शांत बसावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ती महिला दलित आहे आणि महिला आहे म्हणून तिच्याबाबत हा प्रकार घडत आहे. मुख्य म्हणजे ती सगळयात चांगली काम करणारी अधिकारी आहे तिला एका बाजूला केले हा तिच्यावर अन्याय होत आहे. आपल्याला महिला नको, कारण ती दलित आहे.

श्री.विनोद तावडे : ती दलित महिला अतिशय चांगली काम करणारी अधिकारी आहे. आपण तिला डावलत आहात.

श्री.नितीन गडकरी : मी त्या महिलेसोबत एकदोनदा कामही केलेले आहे, त्यामुळे मला अनुभव आहे की, ती महिला अतिशय प्रामाणिकपणे चांगले काम करणारी अधिकारी आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : यापूर्वी जसे शाहू महाराज आणि डॉ.आंबेडकर यांना दलित म्हणून डावलण्यात आले होते त्याप्रमाणे या महिलेलाही आपण डावलत आहात.

**उपसभापती** : यांना मुख्य सचिव होण्याकरिता दिल्लीत पाठवू नका त्यांच्यावर अन्याय होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोरले......

**सभागृहाच्या कामकाजाबाबत.**

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेले महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबतचे वि.स.वि. क्रमांक -73 सोमवार दिनांक 16 एप्रिल, 2006 रोजी सकाळी घेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला अशी विनंती आहे की, हे विधेयक आज घ्यावे.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पोलिस महासंचालकांना पाठीशी घातले जात आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब आपण या भानगडीमध्ये पडू नका.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाचे राजकारण करु नये. तीन वरिष्ठ अधिका-यांची चौकशी समिती नेमण्यात आलेली आहे. त्या चौकशीमध्ये जर काही आढळून आले तर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.उल्हास पवार)**

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी पोलीस महासंचालकांची बाजू मांडू नये.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलीस महासंचालकांसारखा माणूस आरोपाखाली वावरता कामा नये. म्हणून चौकशी लावण्यात आलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आमची अशी मागणी आहे की, निवृत्त न्यायाधिशामार्फत चौकशी करावी. माननीय मंत्री महोदय श्री.आर.आर.पाटील हे मान्य करीत नसल्यामुळे आम्ही सभात्याग करतो.

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाचे लोक सर्वसामान्य माणसांच्या तोंडात माती घालतात. गरीब माणसांच्या नावाने तुम्ही मते मागता. तुम्ही काय चालविले आहे ?

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, मी विधानपरिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. माननीय सभापतींनी त्या प्रस्तावावरील चर्चा आज घेण्याचे मान्य केलेले आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, राज्यातील सिंचनाच्या वाढत्या अनुशेषाबाबत मी विधानपरिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे.

**तालिका सभापती** : आता विधानसभा विधेयक क्र.11 वर चर्चा होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कार्यक्रम पत्रिकेनुसार सभागृहाचे कामकाज होणार आहे किंवा नाही ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्याशी चर्चा करुन सर्व गोष्टी ठरविण्यात आलेल्या आहेत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबतचे वि.स.वि. क्रमांक -73 हे विधेयक सोमवारी संमत करण्याचे माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन द्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकांबाबतचे वि.स.वि. क्रमांक -73 सोमवारी संमत केले जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, वि.स.वि. क्रमांक- 73 या विधेयकाला सुधारणा आल्यानंतर ते विधेयक पुन्हा खालच्या सभागृहामध्ये जाईल व पुन्हा या सभागृहामध्ये विधेयक संमत करुन घ्यावे लागेल. अधिवेशन दोन दिवसांनी संपणार आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, एका दिवसात विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये विधेयक संमत करता येते, याची सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना माहिती आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, वि.स.वि. क्रमांक-73 सोमवारी या सभागृहामध्ये संमत होऊन ते विधानसभेमध्ये जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सोमवारी विधेयक संमत करण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे.

--------

..3.....

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XI OF 2007.**

**(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA GOVERNMENT SERVANT REGULATION OF TRANSFERS AND PREVENTION OF DELAY IN DISCHARGE OF OFFICIAL DUTIES ACT, 2005.)**

श्री.राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11- महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....

सभापती महोदय, मी अभिमानाने सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे. नेहमी वेगवेगळया पध्दतीने समाजपयोगी विधेयक आणण्याचे काम महाराष्ट्र राज्याने केलेले आहे. महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे की, जेथे शासकीय कर्मचाऱ्यांच्या व अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याच्या दृष्टीकोनातून कायदा संमत केला जात आहे. केवळ बदल्या करणे हा या विधेयकामागील उद्देश नाही. भाग दोन प्रकरणामध्ये ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्मस् किंवा शासकीय कामकाज पार पाडीत असताना विलंब होऊ नये म्हणून या विधेयकात तरतूद करण्यात आली आहे. या विधेयकाच्या माध्यमातून बदल्या कोणी कराव्यात ? केव्हा कराव्यात ? किती कालावधी एकाच जागेवर कर्मचाऱ्याना राहता येते ? एका जिल्हयात किती कालावधी राहता येते ? या सर्व बाबींचा या विधेयकामध्ये समावेश आहे. दुसऱ्या भागाच्या दृष्टीकोनातून मी सांगू इच्छितो की, मंत्रालय व विविध विभागातील नस्त्या वेळेवर काढण्याच्या दृष्टीकोनातून तरतूद आहे. नस्त्यांमध्ये Ordinary, Urgent, Most Urgent असे प्रकार असतात. या नस्त्या किती दिवसात निकाली काढल्या पाहिजेत ? यासाठी विधेयकात तरतूद करण्यात आलेली आहे. या विधेयकामध्ये नागरिकांची सनद हा एक महत्वाचा विषय समाविष्ट करण्यात आलेला आहे. ॲडमिनिस्ट्रेटीव्ह रिफॉर्मसकरिता हे महत्वाचे विधेयक आहे. आजपर्यंत फक्त अकौंटच्या दृष्टीकोनातून ऑडीट केले जात होते परंतु इतर कामकाजाचे ऑडीट केले जात नव्हते. त्यामुळे या विधेयकातील तरतूदीनुसार आता ॲडमिनिस्ट्रेटीव्ह ऑडीट केले जाणार आहे. तसेच आय.ए.एस. केडर च्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत विशिष्ट तरतूद नव्हती, आता विधेयकामध्ये ती तरतूद करण्यात आलेली आहे. शासकीय कामकाज करीत असताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध "ब" मध्ये नव्हता. तेव्हा आय.ए.एस. अधिकाऱ्यांना या नियमामध्ये समाविष्ट करण्याचे काम या सुधारणेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. मागच्या वेळी सभागृहात हे विधेयक मंजूर झाल्यानंतर वर्तमानपत्रात असे छापून आले होते की, या विधेयकामधून आय.ए.एस. अधिकाऱ्यांना का वगळले ? आय.ए.एस. अधिकाऱ्यांचाही यामध्ये समावेश करण्याच्या दृष्टीकोनातून योग्य ती दुरुस्ती विधेयकात करण्यात आली आहे. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, हे विधेयक मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MHM/

प्रा.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सुरुवातीस ज्या वेळी हे विधेयक सभागृहात आणले गेले, त्यावेळी मी या सभागृहात मागणी केली होती की, बदल्या करण्याचाही कायदा केला पाहिजे. एखाद्या कर्मचाऱ्यास एका खात्यात किती वर्षे ठेवायचे ? अधिकाऱ्यांना किती वर्षे ठेवायचे ? याबाबत कायदा करण्याची मागणी मी दोन वर्षापूर्वी या सभागृहात केली होती. सभापती महोदय, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते. दोन्ही सभागृहातील सदस्यांची ही समिती होती. मंत्री महोदयही त्या समितीवर होते. त्यावेळी मी सांगितले की, आय.ए.एस. अधिकाऱ्यांच्या बदल्याबाबत या विधेयकामध्ये तरतूद करावी. या विषयावरुन माझ्या आग्रहानुसार दोन वेळेला बैठका पुढे ढकलल्या गेल्या होत्या. या समितीमध्ये काम करीत असताना मी न चुकता बैठकीस उपस्थित राहीलो व कामकाजामध्ये सहभागी झालो होतो.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ KGS/ श्री. गागरे नंतर --- 16:20

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्याची अमलबजावणी किती टक्के झाली ? हे विधेयक मागील वेळेस पास झाल्यानंतर देखील आम्ही पाहतो आहोत की, तेच ते अधिकारी त्याच त्या ठिकाणी आहेत. त्या अधिकाऱ्यांच्या तेथून बदल्या झालेल्या नाहीत. मग त्याबद्दल आपण संबंधितांवर काय कारवाई केली आहे वा करणार आहात ? सभापती महोदय, येथे आपण कायदा करतो पण त्याची अमलबजावणी होत नसेल तर मग येथे आम्ही कायदे करायचे तरी कशासाठी ? मागील अधिवेशनामध्ये आम्ही हा कायदा केला, हे विधेयक पास केले होते आणि त्यावेळी आम्हाला सांगण्यात आले होते की, तीन वर्षानंतर ते ते अधिकारी त्या त्या खात्यात राहणार नाहीत. परंतु ते अधिकारी आजही तेथेच आहेत. सभापती महोदय, या विधेयकात आपण अशीही तरतूद केलेली आहे की, बदली करताना आहे त्याच खात्यात बदली करावयाची नाही तर दुसऱ्या खात्यात बदली करावयाची. तर मग त्याची अमलबजावणी झ ाली आहे काय ? मी आपल्याला ठामपणे सांगू इच्छितो की, त्या पद्धतीने कोठेही कारवाई झालेली नाही. तेव्हा आता या निमित्ताने आम्हाला शासनाकडून आश्वासन पाहिजे की, येथे जो कायदा आम्ही पास केला आहे व करीत आहोत त्याची अमलबजावणी काटेकोरपणे केली जाईल. सभापती महोदय, या विधेयकान्वये आपण आता यात आयएएस अधिकाऱ्यांना समाविष्ट केलेले आहे. पण या आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्याची ताकद शासनामध्ये आहे काय ? आपल्या शासकीय सेवेतील, मंत्रालयातील, कक्ष अधिकारी, उप सचिव यांची बदली आपण करू शकत नाहीत तेथे या आयएएस अधिकाऱ्यांची बदली आपण करू शकणार आहात का ? आजही असे कित्येक अधिकारी आणि कर्मचारी आहेत की, जे वर्षानुवर्षे एकाच खात्यात काम करीत आहेत. त्याबाबतीत मग आम्हाला सांगितले जाते की, मंत्रालयाची केडर वेगळी आहे, विधान भवनाची केडर वेगळी आहे. तेथून बाहेर बदली केली जाऊ शकत नाही. तेव्हा याबाबतीत नेमकी काय परिस्थिती आहे याचे सुस्पष्ट चित्र आमच्यासमोर आले पाहिजे. सभापती महोदय, या विधेयकाद्वारे आपण ज्या सुधारणा येथे आणल्या आहेत त्या निश्चितपणे स्वागतार्ह आहेत. या प्रमाणे सुधारणा होण्यासाठी आम्हीच मागील वेळेस पाठपुरावा केला होता, मागणी केली होती परंतु तेव्हा आमच्या मागणीप्रमाणे सुधारणा यात केली नाही. नागपूरला शेवटची बैठक झाली तेव्हा मीच स्वत: यासाठी आग्रह धरला होता पण मंत्री महोदयांनी, तेव्हा ऐकले नाही. त्यामुळे आता ही सुधारणा येथे त्यांनी आणली आहे, तिचे मी स्वागत करतो आणि तिला पाठिंबा देतो. मात्र या विधेयकाची आपण 100 टक्के अमलबजावणी करावी अशी आग्रही मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आम्ही या विधेयकाचे स्वागतच करतो. पण या विधेयकाबाबत सविस्तर स्पष्टीकरण माननीय राज्यमंत्री महोदयांनी करायला पाहिजे होते ते केले गेले नाही असे मला वाटते. आपल्याकडे जे आयएएस अधिकारी आहेत त्यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही तर त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई झाली पाहिजे, तशी ती होणार आहे काय ? आपण ती करू शकणार आहात का ? आज आपल्याकडे येणारा कोणताही आयएएस अधिकारी मागास भागामध्ये, विदर्भ, मराठवाड्यामध्ये जाण्यास तयार नाही. त्या सर्वांनाच मुंबई-पुणे-ठाणे-नाशिक येथे जायचे असते. तेव्हा आयएएस अधिकाऱ्यांनी आपण बदलीची ऑर्डर काढली आणि तो तेथे गेला नाही तर आपण काय करणार आहात ? त्याच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? त्याचा पगार आपण रोखून धरणार का ? त्याला परत पाठविणार आहात का ? कोठे तरी यावर चिंतन होणे गरजेचे आहे. भारतीय प्रशासन सेवेतील हे अधिकारी आपल्याकडे डेप्युटेशनवर आल्यामुळे आपल्याला केवळ त्याच्या सीआर मध्ये नोंद करता येते, जास्तीत जास्त त्याला आपण परत पाठवू शकतो. यापेक्षा जास्त काही करू शकत नाही. त्याला आपण निलंबित करू शकत नाही. गोविंद स्वरूप सारखे किती तरी अधिकारी आहेत की ज्यांनी खूप काही घोळ केला आहे. बीडचे अधिकारी श्री. जंत्रे यांच्यावर देखील आरोप होत आहेत. आमदार निधीतील पैशांचा घोळ केल्याचेही उदाहरण आहे. 80 लाखाचा निधी आहे त्यातील 60 लाखाचा निधी त्यांनी वाटून टाकला. त्याबद्दल लोकांनी नंतर त्या दोन्ही आमदारांना परत पाठविले आहे. म्हणजे People's wisdom is always better than bureaucrats. त्यामुळे लोकांच्या शहाणपणावर आमचा विश्वास आहे. तेव्हा जे मस्तवाल असे आयएएस अधिकारी आहेत त्यांच्यावर आपण काय आणि कशी कारवाई करणार आहात ? आपल्या या सुधारणेमुळे आपले हात किती मजबूत झाले आहेत ? ज्या अधिकाऱ्यांनी लूट केली आहे, भ्रष्टाचार केला आहे, जनतेचे हित त्यांनी पाहिले पाहिजे होते तेथे त्यांनी केवळ स्वतःचे हित पाहिले आहे. त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात, किंवा करू शकणार आहात ? हेही येथे स्पष्ट झाले पाहिजे. मला येथे सांगितले पाहिजे की, दिवसेंदिवस आयएएसचे स्टॅण्डर्ड, आय.क्यू.लेव्हल, intellegoutia हे सगळे आता लुप्त होत चालले आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ....3ए 1 ..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

आणि ते सुध्दा छानछोकीमध्ये, मोहमयी दुनियेमध्ये प्रशासन सोडून भरकटत चालले आहे. म्हणून यामधील नियम व तरतुदी अधिक चांगल्या करण्याची गरज आहे. त्याकरिता केंद्र सरकारकडे जाऊन पाठपुरावा करुन आपण त्या मंजूर करुन घेतल्या पाहिजेत. केंद्र सरकारकडून आय.ए.एस. अधिकारी महाराष्ट्रामध्ये येतात. ते फक्त मुंबई, पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवड फार तर नाशिक या गोल्डन ट्रँगलमध्ये आपले पोस्टींग करुन घेतात. सभापती महोदय, मी 25 महामंडळे शिफ्ट करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव पाठविला. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग महामंडळाचे कार्यालय सुध्दा मुंबईमध्ये असले पाहिजे अशी आय.ए.एस. अधिकाऱ्यांची मागणी आहे. या महामंडळाचे मुख्य कार्यालय माननीय प्रा. पुरके साहेबांच्या यवतमाळला किंवा माननीय श्री. राणा जगजितसिंह पाटील साहेबांच्या धाराशीवमध्ये कां घेऊन जात नाही? त्याठिकाणी आपल्याला आय.ए.एस. अधिकारी मिळणार नाहीत काय? म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपण खूप चांगले काम करीत आहात परंतु या कामाचे डिटेलिंग करण्याची गरज आहे.

त्याचप्रमाणे दुसरा मुद्दा माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितला की, बदल्यांची प्रकरणे आणि अधिकाऱ्यांचा परफॉर्मन्स या संदर्भातील फायली आपल्याकडे ठेवल्यामुळे आपणाककडून कारवाई झाली नाही. आपणाकडून ई-गव्हर्नस कधी होणार आहे? किमान फायनान्शिअल ड्रॉविंग अँड डिस्बर्सींग ॲथॉरिटीने वेळेमध्ये निर्णय घेतला नाही तर महाराष्ट्राचे व ग्रामीण भागाचे मोठे नुकसान होईल. याचा परिणाम असा झाला की, आज परभणी जिल्हयाचा 22 कोटींचा निधी परत आला, तो खर्च करण्यात आला नाही. दुर्दैवाने यामध्ये बऱ्याच ठिकाणी ट्रेझरी ऑफिसर आणि आय.ए.एस अधिकारी दोषी असल्याचे आढळले आहे. त्यांच्याकडून प्रशासकीय मान्यता वेळेवर मिळत नाही. त्याकरिता त्याच्यावर नेमका कोणता चार्ज लावला पाहिजे हे आपण उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. या दृष्टीकोनातून ग्रामीण भागाला विशेष न्याय मिळेल याकरिता कडक कारवाई करण्यायचे नियम तयार केले पाहिजेत. जर कुणी हे नियम पाळले नाही तर भारतीय प्रशासनिक सेवेतील अधिकाऱ्यांच्या बाबतीत आपण काय करणार ते याठिकाणी सांगावे. त्याचबरोबर त्या बदल्यांच्या अंमलबजावणीचा एक अहवाल वर्षातून एकदा विधीमंडळाला सादर करण्यात यावा. श्री. अण्णा हजारे यांनी बदल्यांमध्ये खूप भ्रष्टाचार असल्यामुळे त्यांनी मागणी केल्यानंतर तीन वर्षांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. अधिकाऱ्यांचे माईड्स हे ब्युरॉक्रेटिक असले पाहिजे. त्यांनी आपल्या खुर्चीवर प्रेम न करता परफॉर्मन्स दाखविला पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि त्यांना दिलेली डयुटी, जबाबदारी स्वीकारण्याची त्यांची मानसिकता असली पाहिजे. तीन वर्षानंतर दुसऱ्या ठिकाणी बदली झाल्यानंतर अधिक कमाई करण्याऐवजी अधिक परफॉर्मन्स चांगला कसा होईल अशी मानसिकता असली पाहिजे. आपण केलेल्या व्यहरचनेप्रमाणे आपल्याला किती यश मिळाले यासंबंधीचे अधिकाऱ्यांकडून पुढील पावसाळी अधिवेशनामध्ये एक विवरणपत्र सादर करण्यात आले पाहिजे. अशी माझी अपेक्षा आहे तरच या बदल्यांचे विनियमन खऱ्या अर्थाने केल्याचा उपयोग होईल. या दोन-तीन गोष्टींचा आपण खुलासा करावा. हा कायद्याचा प्रश्न नसून अंमलबजावणीचा आहे, तो अपण जरुर करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केलेले महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करणारे विधेयक मांडण्यात आले आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करणार आहे.

आत्ताच माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे एकेका ठिकाणी हे अधिकारी अनेक वर्षे काम करीत असतात. . काही अधिकारी चांगले काम करीत असतांना तुम्ही त्यांना उचलून कोपऱ्यामध्ये ठेवता. त्यांची कार्यक्षमता, त्यांचा प्रभाव, त्यांची इन्व्हॉल्वमेंट यामध्ये जात नाही. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर श्री. कुंटे यांना म्हाडामध्ये पाठविण्यात आले. बिल्डर लॉबीकडून दबाव आल्याबरोबर, त्यांनी भ्रष्टाचाराची प्रकरणे उकरुन काढल्याबरोबर त्यांना तेथून दोन ते चार महिन्यात हलविण्यात आले. ज्याप्रमाणे आपल्याला एखादा अधिकारी एखाद्या ठिकाणी चार-पाच वर्षे राहू नये असे वाटते त्याचप्रमाणे एखादा प्रशासकीय अधिकारी फार चांगले काम करीत असेल तर त्यासाठी तुम्ही निकष लावले पाहिजेत की नाहीत? Corruption is like a water fall. It is always from the top to bottom and never from bottom to top. ज्यावेळी प्रशासकीय अधिकारी व्यवस्थित काम करीत असेल तर त्याच्या हाताखाली काम करणारी सर्व यंत्रणा व्यवस्थित काम करीत राहील. या विधेयकाच्या बाबतीत माझ्यासमोर माननीय मुख्यमंत्र्यांनी श्री. रामाराव यांना दोन - तीन वेळा सांगितले की, हे विधेयक लवकर आणा. आणि या विधेयकामधील त्रुटी मी त्यांच्यासमोर सांगितल्या. या विधेयकामध्ये ज्या त्रुटी आहेत त्याकरिता तुम्ही अमेंडमेंट आणा असे सांगितले. तरी तुम्ही दोन-दोन वर्षे ढुंगणाखाली विधेयक दाबून ठेवले. या आय.ए.एस. अधिकाऱ्यांना आपण काय करणार आहात? मी आता म्हटले की, तुमच्या मनामध्ये चांगला हेतू असून सुध्दा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आपल्या सर्व योजनांना हरताळ फासत असतात, सुरुंग लावीत असतात. याचे सर्वात मोठे उदाहरण आपल्याला दिले आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू...

श्री.कुटे यांना आपण म्हाडा मध्ये ठेवले काय ? त्यांना दोन-तीन महिन्यामध्ये माननीय राज्यपालांच्या कार्यालयामध्ये पाठविण्यात आले. एका कोपऱ्यामध्ये त्यांना पाठविले. शेवटी प्रशासकीय अधिकारी हा सगळी व्यवस्था पहात असतो. ज्यावेळेस सत्तांतर झाले त्यावेळेस त्यांच्याबाबतीत खळबळ का माजली नाही. त्यावेळेस आय.सी.एस. ची लॉबी होती. ब्रिटिशांनी प्रशासकीय व्यवस्था नीट ठेवलेली होती. राजकीय सत्तांतर झाले तरी देखील काही गडबड झाली नाही. देशाचे पंतप्रधान किंवा खाली राज्याचे मुख्यमंत्री यामध्ये राजकीय बदल झाला तरी कारभारामध्ये गडबड झालेली नाही. कोर्ट केसेस पहाणे, प्रशासकीय व्यवस्था पहाणे , रिव्हेन्यू डिपार्टमेंटचे काम यामध्ये ही महत्वाची पदे असतात. आताच सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी बदल्यांच्या विधेयकाबाबत एक वाक्य वापरले. विशिष्ट काळामध्ये त्या ठिकाणच्या आय.ए.एस. अधिकाऱ्यांनी निर्णय घेतला नाही तर आपण काय करणार ? मी उदाहरण देतो. परवाच सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी 1351 कोटी रुपयाची वीज दुसऱ्या राज्यातून विकत घेण्यासंबंधीचा कॅबिनेटमध्ये प्रस्ताव मांडला. त्यानंतर वित्त विभागाचे सचिव श्री.सुबोध कुमार यांनी सांगितले की, हे मला पसंत नाही. कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला तर मी नोट दिलेली आहे, ती विचारात न घेता ॲफिडेव्हीट करेन. IAS lobby is controlling the entire government. Is this democracy? राजकीय पक्षाची घोड्यावरील मांड डळमळीत आहे, म्हणून आयएएस लॉबीच्या दिशेने वळावे लागत आहे. श्री.रामाराव या अधिकाऱ्यांनी विधेयकाची फाईल खुर्चीखाली दाबून ठेवली आणि आम्ही हे बील आणा, बील आणा असे सारखे सांगत होतो कायद्याची अंमलबजावणी प्रशासकीय अधिका-यांमुळे प्रभावीपणाने केली नाही तर काय करणार ?

सभापती महोदय, मी उदाहरण देतो. एखादी इमारत म्हाडामार्फत बांधली आणि त्या इमारतीमध्ये अतिरिक्त गाळे असतील, तर ते अतिरिक्त गाळे मास्टर लिस्टमधील लोकांना देण्यात येतात. ज्या इमारती पूर्ण होत नाहीत, ज्या इमारतींचा डेव्हलपमेंट प्लॅन नसतो, अशा लोकांची मास्टर लिस्ट तयार केलेली असते. त्या गाळ्यांचे वितरण म्हाडाच्या उपाध्यक्षांमार्फत केले जाते. उपाध्यक्ष हे आयएएस अधिकारी असतात. परंतु गेली चार वर्षे याबाबतची फाईल पडून आहे. लोक ट्रॅन्झीट कॅम्पमध्ये अजूनही रहात आहेत. मग आपण तुमच्या टेबलवर किती फाईली आल्या आणि किती फायलींचा निपटारा केला. हे आय.ए.एस. अधिकाऱ्यांना विचारणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ KGS/

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू....

कायदा प्रभावीपणे राबविला तर तो प्रभावी होईल नाही तर त्या कायद्याला काही अर्थ रहाणार नाही. श्री.चहल हे म्हाडाचे उपाध्यक्ष आहेत. ते कोणलाही भेटत नाहीत, कॉन्ट्रॅक्टरना ते भटतात. दलालांना भेटतात. तेव्हा यासंबंधाने आपण कायदा केला तरी त्याची प्रभावीपणाने अंमलबजावणी करणारे सूत्रधार हे आय.ए.एस. अधिकारी आहेत. आपण कायदा चांगला केलेला आहे, त्याची चौकटही चांगली आहे. परंतु ती चौकट ते मोठी करत जातील आणि आपल्याला ते बरोबर अडजस्ट करतील. आपली चौकट मजबूत करावयाची असेल तर ते चौकटीच्या बाहेर जाणार नाहीत, हे पाहिले पाहिजे. एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या बाबतीत सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, श्रीकांत जोशी व मधुकर चव्हाण यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांच्या प्रश्नांच्या बाबतीत मी थोडक्यात उत्तर देऊ इच्छितो. मी माझ्या भाषणामध्ये सुरुवातीलाच सांगितले की, अशा प्रकारचे बिल आणून कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना मला आवर्जून सांगितले पाहिजे की, आम्हाला मांड अधिक पक्की बसवावयाची आहे म्हणूनच आम्ही हा कायदा केला आहे. अगोदर बदल्यांच्या संदर्भातील रेग्युलेशन जी.आर. च्या माध्यमातून होत होते. त्याबाबतचा शासन निर्णय होता. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाचे कायद्यामध्ये रुपांतर केले. यामध्ये एन्फोर्समेंट यावी, कोणी जर जास्त चुका केल्या तर कायद्याचे इंटरव्हेंशन व्हावे, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना विलंब केला तर त्याला प्रतिबंध करण्यासाठी हे अत्यंत चांगले बिल आणले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या बिलाचे स्वागत केले तसेच शासनाचे आभार मानले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

या ठिकाणी काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. या कायद्याची अंमलबजावणी होईल काय असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, मागचे वर्ष हे पहिले वर्ष होते. या बिलाच्या तरतुदीनुसार आपल्याला 30 टक्के बदल्या करता येतात. त्यामुळे ड्यू झालेल्या 30 टक्के लोकांच्या बदल्या करणे हा तरतुदीचा भाग आहे. जे अधिकारी या बदल्या करण्याच्या दृष्टीने सक्षम आहेत त्या सगळ्यांच्या माध्यमातून या सर्व बदल्या करता येतात. बदल्या केव्हा करावयाच्या, कोणत्या बदल्या करावयास पाहिजे, त्यांचा किती कालावधी झाला, ते बदलीला पात्र आहेत की अपात्र आहेत या सगळ्या गोष्टींबाबत कायदा करुन आता त्याचे नियम सुध्दा तयार केलेले आहेत. त्यामुळे या कायद्याच्या तरतुदीच्या माध्यमातून बदल्यांच्या संदर्भातील नस्ती येत असते. कायद्याचे निश्चितपणे तंतोतंत पालन केले जाईल एवढेच मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो. जे तीन वर्षे कालावधीसाठी एकाच जागेवर असतील, मग मंत्रालयातील उपसचिव असो, अवर सचिव असो त्याच्या हा कायदा झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात बदल्या झालेल्या आहेत. कक्ष अधिकाऱ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत. एखादे चांगले खाते असेल, आपल्याला पाहिजे असलेले खाते असेल तर त्या ठिकाणी काही लोक

...2..

RDB/ KGS/ MHM/

श्री. राजेश टोपे .....

20-20 वर्षे राहावयाचे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी संयुक्त चिकित्सा समितीमध्ये एक उदाहरण सांगितले. ते म्हणाले की, मी लहान असताना या ठिकाणी यावयाचो तेव्हा आणि आता आमदार म्हणून आल्यानंतर तीच व्यक्ती, त्याच ठिकाणी त्यांना काम करताना दिसली. या विधेयकाच्या बाबतीत संयुक्त चिकित्सा समितीमध्ये सविस्तर चर्चा झालेली आहे. तीन वर्षानंतर कोणतीही व्यक्ती एकाच जागेवर राहू शकत नाही. त्यांचे डिपार्टमेंट सुध्दा बदलले जाईल अशी या कायद्यामध्ये तरतूद आहे. जास्तीत जास्त 6 वर्षात खाते बदलता येते तसेच त्या खात्यामध्ये तीन वर्षे तो ज्या ठिकाणी काम करीत असेल त्या ठिकाणाहून त्यांची बदली करता येते अशी तरतूद आहे. या बदल्यांच्या संदर्भात असलेल्या ज्या तरतुदी आहेत त्यांचे तंतोतंत पालन करण्याचे काम करण्यात येईल. आतापर्यंत आय.ए.एस. अधिकाऱ्यांचा समावेश या कायद्यामध्ये नव्हता. आता यामध्ये आय.ए.एस. अधिकाऱ्यांचा सुध्दा अंतर्भाव होणार आहे. आय.एस.एस. अधिकाऱ्यांना यामधून एक्स्ल्यूड केले होते परंतु आता सामान्य कर्मचाऱ्यांना बदल्यांच्या बाबतीत जे नियम लागू आहेत तेच नियम आय.ए.एस. अधिकाऱ्यांना लागू राहणार आहेत. कारवाईसंबंधीची जी बाब आहे त्यामध्ये आय.ए.एस. अधिकाऱ्यांवर जी कारवाई केली जाते त्यासाठी वेगळे नियम आहेत. इंडियन सिव्हिल सर्व्हिस रुल्सच्या माध्यमातून ती कारवाई करणे शक्य आहे. ज्या ठिकाणी मायनर पेनल्टी असेल ती कारवाई राज्य सरकारला करता येते. त्यामध्ये ठपका ठेवण्याचा विषय असेल, खातेनिहाय चौकशी असेल हे सहज करता येते. ठपका ठेवणे, इन्क्रिमेंट थांबवणे, सस्पेंड करणे हे सुध्दा करता येते. त्यांना सस्पेंड करता येत नाही याबाबत सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी प्रश्न विचारला. श्री. विजयकुमार तसेच श्री. डी.एस.झगडे या दोघांना सस्पेंड करण्याची कारवाई राज्य शासनाच्या वतीने करण्यात आली होती. आधी जे लोक या कायद्यामध्ये अंतर्भूत नव्हते त्या आय.ए.एस.अधिकाऱ्यांवर अशा पध्दतीने शिस्तभांगाची कारवाई, त्यांच्यासाठी असलेल्या नियमाप्रमाणे राज्य शासनाच्या अधिकाराच्या माध्यमातून करणे शक्य होणार आहे. बदल्यांच्या बाबतीत रोटेड व्हावे, जास्त काळ एकाच जागेवर राहू नये. काही लोक स्वत:चा इन्फ्ल्युएंस वापरुन वाम मार्गाने त्याच जागी राहतात. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उदाहरण दिले. काही चुकीचे लोक आपल्या इन्फ्ल्यूएंसमुळे एका जागेवर अनेक वर्षे थांबलेले असतात.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 16:40

(श्री. राजेश टोपे...)

आता या कायद्यामुळे त्यांना त्याच जागेवर 3 वर्षापेक्षा अधिक काळ थांबता येणार नाही. चांगल्या व्यक्तींना, ज्यांचा कुठे जास्त इन्फ्ल्युअन्स नसतो, अशा व्यक्तींना एक्झिक्युटीव्ह पोस्ट मिळण्याची संधी यामुळे मिळणार आहे. या बिलातून खास करुन आय.ए.एस. अधिका-यांना वगळण्यात आलेले होते. आता बदल्यांच्या संदर्भात त्यांचा देखील या बिलामध्ये समावेश केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी नस्तीच्या निपटा-याच्या संदर्भात काही प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले. कोणती कामे कोणी, किती कालावधीत करावी, यासंबंधीची विचारणा करण्यात आली. मी सुरुवातीलाच सांगितले की, फाईल्सचे वर्गीकरण करुन त्यांचा निपटारा करण्यास किती कालावधी लागेल या गोष्टींचा अंतर्भाव संहितेमध्ये केला जाणार आहेत. तसेच ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट देखील थर्ड पार्टी यंत्रणेच्या माध्यमातून केले जाणार आहे. प्रत्येक डिपार्टमेंटचे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट असेल. या ऑडिटच्या माध्यमातून नस्तींचा निपटारा ठरलेल्या पध्दतीने झाला की नाही हे पाहिले जाईल. या सर्व गोष्टी या बिलामध्ये समाविष्ट केलेल्या आहेत. पारदर्शक, कार्यक्षम कारभार असावा यादृष्टीने हे बिल आणलेले आहे. एक लोकाभिमुख आणि सर्व समान्य माणसाला न्याय देणारे असे हे विधेयक शासनाने जाणीवपूर्वक आणलेले आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. आपण माहितीच्या अधिकारा संबंधीचा कायदा केला, रोजगार हमीचा कायदा केला. केन्द्र सरकारने आपण केलेला रोजगार हमीचा कायदा स्वीकारला. याच पध्दतीने हा देखील कायदा केन्द्र आणि अन्य राज्ये देखील स्वीकारतील असा मला विश्वास वाटतो. माहितीच्या अधिकाराखाली सर्वच माहिती घेता येते. त्यामुळे सर्व गोष्टींच्या अनुपालनाचे अहवाल या सभागृहामध्ये ठेवण्याची आवश्यकता असे असे वाटत नाही. कायद्यातील तरतुदीनुसार सर्व गोष्टी होतील एवढे सांगून हे विधेयक संमत करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11 संमत करण्यात यावे असा प्रसताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2007चे वि.स.वि. क्रमांक 11 संमत झाले आहे.

---

...3..

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील माननीय मंत्री महोदयांचे उत्तर अपूर्ण राहिलेले आहे. प्रस्तुत प्रस्तावास सोमवार दिनांक 16 एप्रिल 2007 रोजी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी विनंती केल्यामुळे माननीय मंत्री महोदयांचे अपूर्ण राहिलेले उत्तर सोमवार, दिनांक 16 एप्रिल 2007 रोजी होईल.

--

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात सिंचनाचा वाढत असलेला अनुशेष

**मु.शी.**: राज्यात सिंचनाचा वाढत असलेला अनुशेष या विषयावर सर्वश्री धोंडीराम राठोड व सुधाकर गणगणे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यात सिंचनाचा वाढता अनुशेष मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यात विदर्भातील अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यात सिंचनाचा मोठा अनुशेष असणे, (राज्यातील एकूण १४८ अवर्षण प्रवण तालुक्यांपैकी त्यात २९ तालुके मराठवाड्यातील असणे.) मराठवाडा विभागातील विष्णुपूरी, लेंढी, उर्ध्वमानार, पैनगंगा, लोअर दुधवा (जायकवाडी), बाभळी, लोहारा, उपसा सिंचन योजना व विदर्भातील निम्न पैनगंगा, नळगंगा, ज्ञानगंगा, खडकपूर्णा, काटेपूर्णा, मोरवा, निर्गुणा, सोनाळ, आढाण इत्यादी प्रकल्प अपूर्ण असणे, विदर्भ व मराठवाडा भागातील सिंचन प्रकल्पाच्या एकूण क्षमतेपैकी ५० टक्के क्षमता सिंचनासाठी वापरली जात नसणे, दांडेकर समितीने दिलेल्या शिफारशी निर्देशांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याने विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन अनुशेष वाढत असणे, यामुळे या भागातील विकासात येणाऱ्या अडचणी व सिंचनाच्या सुविधा नसल्यामुळे तेथील जनतेचे जीवनमान उंचविले जात नसल्याने जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबतीत शासनाने कार्यवाही करुन मराठवाडा व विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्पासाठी निधीची तरतूद करुन या भागातील सिंचन अनुशेष दूर करण्यासाठी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

13-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 3E.1

SGB/ MHM/ KGS/ 16:45

श्री.धोंडिराम राठोड..............

सभापती महोदय, भारत हा कृषिप्रधान देश आहे. एकूण लोकसंख्येपैकी 70 टक्के जनता शेती व्यवसायावर अवलंबून आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ 308 लाख हेक्टर असून त्यापैकी 225 लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. महाराष्ट्राचे सरासरी पर्जन्यमान 1300 मि.मि.असून त्यापैकी 88 टक्के पाऊस जून ते सप्टेंबर या महिन्यात पडतो. पडलेल्या पावसाचे पाणी पूर्णपणे वाहून जाते. त्यासाठी सिंचनाचे प्रकल्प होणे अत्यंत गरजेचे आहे. अनेक विभागात अपूरा आणि बेभरवशाचा पाऊस पडतो. दिवसेंदिवस भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होत असल्यामुळे शेतीसाठी पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. म्हणून सिंचनाची व्यवस्था वाढविणे ही आज काळाची गरज आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यामध्ये सिंचनाचा अनुशेष निर्माण झालेला आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने दांडेकर समितीच्या अहवालाप्रमाणे महाराष्ट्राच्या राज्यपाल महोदयांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे अनुशेष निर्मूलनाची विशेष जबाबदारी शासनावर टाकलेली आहे. म्हणून हा अनुशेष कमी करण्याच्या दृष्टिने शासनाने प्रयत्न करावा. राज्यपाल महोदयांनी वेळोवेळी जे निर्देश दिले त्याप्रमाणे प्रत्यक्ष वितरित झालेली आणि देय व खर्च झालेली रक्कम यामध्ये फार मोठी तफावत आहे. सन 2001, 2002 व 2003 या वर्षामध्ये राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे विदर्भासाठी रु.932.70 कोटी रुपये एवढा निधी देय होता. प्रत्यक्ष खर्च मात्र रु.353.63 कोटी झालेला आहे. रु.579.07 कोटी एवढा खर्च कमी झालेला आहे. मराठवाड्याला रु.625.67 कोटी रक्कम देय असताना प्रत्यक्षात रु.319.91 कोटी एवढीच रक्कम देण्यात आली. रु.305.76 कोटी एवढी कमी रक्कम देण्यात आली. सन 2003-04 मध्ये विदर्भाला देय असलेली रक्कम रु.1269.32 कोटी असताना प्रत्यक्ष खर्च मात्र रु.501.48 कोटी एवढा झला. मराठवाड्याला रु.582.93 कोटी रक्कम देय होती. मात्र महाराष्ट्र शासनाने केवळ रु.350.18 कोटी एवढीच रक्कम उपलब्ध करुन दिली आणि रु.432.75 कोटी एवढी कमी रक्कम दिली. सन 2004-05 मध्ये विदर्भासाठी रु.1848.38 कोटी रक्कम देय होती. मात्र शासनाने रु.536.47 कोटी रुपये दिले. म्हणजे रु.1311.11 कोटी एवढी रक्कम कमी देण्यात आली. मराठवाड्याला रु.1088.70 कोटी देय असताना दिले केवळ रु.623 कोटी म्हणजे रु.465.61 कोटी एवढी रक्कम त्या वर्षात कमी देण्यात आली. सन 2005-06 मध्ये विदर्भाला रु.3010 कोटी इतकी देय रक्कम होती आणि मराठवाड्याला रु.1551.45 कोटी देय रक्कम होती.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड...

याही वेळेला आम्हाला अत्यल्प आर्थिक तरतूद देण्यात आलेली असून हा अनुशेष सतत वाढत राहिलेला आहे. सन 2005-2006 मध्ये विदर्भाला देय रक्कम 850.47 कोटी रुपये होती परंतु फक्त 699.72 कोटी रुपये देण्यात आले. मराठवाडयाला देय रक्कम 612.12 कोटी रुपये होती परंतु फक्त 561.67 कोटी रुपये दिले गेले. प्रत्येक वर्षी आम्हाला देय असलेल्या रकमेपेक्षा अत्यंत कमी आर्थिक तरतूद या ठिकाणी उपलब्ध करुन दिल्यामुळे आमचे सिंचनाचे अनेक प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत. दिनांक 6 मार्च, 2006 रोजी माननीय राज्यपाल महोदयांनी जे निर्देश दिले त्यामध्ये विदर्भाला देय रक्कम 47.62 कोटी रुपये, मराठवाडयाला 421.79 कोटी रुपये द्यावयाचे आहेत परंतु यावर्षी या ठिकाणी प्रत्यक्षात किती रक्कम खर्च कली आणि एकूण किती रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे यासंदर्भातील आकडेवारी उपलब्ध नाही. एकंदर पहाता मराठवाडयात आठही जिल्हयात म्हणजें विदर्भ, अकोला, वाशिम, बुलढाणा या जिल्हयांचा अनुशेष फार मोठा आहे. त्याच बरोबर खानदेश आणि कोकणाचा सिंचन अनुशेष देखील वाढत आहे. असे असतांना सुध्दा अनेक वेळा चर्चा करुन मराठवाडयातील कृष्णाखो-यातील 21 टीएमसी पाणी मराठवाडयाला मिळालेले नाही. मागच्या वर्षी महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांच्याबरोबर काही सन्माननीय लोक प्रतिनिधींनी सहयाद्री अतिथीगृहावर एक बैठक घेतली होती. त्या बैठकीमध्ये आम्ही सर्व लोकप्रतिनिधींनी असा मुद्दा उपस्थित केला होता की, माननीय राज्यपाल महोदयांनी निर्देश दिल्याप्रमाणे मराठवाडयासाठी आर्थिक तरतूद कागदोपत्री उपलब्ध करुन देण्यात येईल आणि प्रत्यक्षात आमच्या पदरात काहीच पडणार नाही. सभापती महोदय, नेमके तसेच झाले. आमच्या पदरात काहीच पडले नाही. जायकवाडी धरणातून 115 टीएमसीचे पाणी वापरण्याचे नियोजित असतांना प्रत्यक्षात 195 टीएमसी पाणी वापरले जाते. त्यामुळे गोदावरी खो-याला आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध होत नाही ही सगळयात मोठी खंत आहे. मराठवाडयाच्या वाटयाचे 6.85 टीएमसी पाणी मिळणे अपेक्षित होते पण प्रत्यक्षात आम्हाला 2.82 टीएमसी पाणी मिळते. हा आमच्यावर एक प्रकारे उघड उघड अन्याय केला जात आहे. मराठवाडयातील अनेक मोठे प्रकल्प म्हणजे विष्णुपूरी, लेंडी, ऊर्ध्वमानार, पैनगंगा, लोअर दुधना, बाभळी, लोहारा, उपसा सिंचन योजना असे मध्यम प्रकल्प अपूर्ण आहेत. विदर्भातील निम्न पैनगंगा, नळगंगा, ज्ञानगंगा, खडकपूर्णा, काटेपुर्णा, मोरवा, निर्गणा, सोनाळ, आढाण हे प्रकल्प अपूर्ण आहेत.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड...

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय श्री. जयंत पाटील साहेब म्हणाले होते की, मी लहानपणी मंत्रालयात आलो होतो त्यावेळेस या ठिकाणी जे अधिकारी होते तेच अधिकारी मी मंत्री असतांना सुध्दा आहेत. सभापती महोदय, मी लहानपणी जेव्हा हाफ चड्डी वापरत होतो तेव्हा म्हणजे 1962 मध्ये लोअर दुधना प्रकल्पाचे काम सुरु झाले होते परंतु आता माझे वय 62 झाले असले तरी सुध्दा अजून या प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही. यावरुन या ठिकाणचे काम कोणत्या गतीने चालू आहे याचा आपल्याला अंदाज येईल. एखाद्या प्रकल्पाला सुरुवात होते आणि वर्षानुवर्षे त्या प्रकल्पाचे काम अपूर्ण राहत असेल तर त्यामध्ये शासनाचा मोठया प्रमाणात पैसा वाया जातो, जो पैसा टाकला जातो त्याचा जनतेला, शेतक-यांना काही सुध्दा फायदा होत नाही. प्रकल्पासाठी शेतक-यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या जातात त्यांना पैसे मिळत नाहीत, प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन होत नाही, प्रकल्प पूर्ण होत नसल्यामुळे शेतीला पाणी मिळत नाही अशा दुष्ट चक्रात आम्ही अडकलो आहोत. विदर्भाच्या सिंचन प्रकल्पाच्या एकूण क्षमतेपैकी 50 टक्के क्षमताच वापरली जात आहे. याचा अर्थ 50 टक्के क्षमतेचा वापर केला जात नाही. 100 टक्के पैसे गुंतवले जातात आणि 50 टक्के क्षमता वापरली जाते त्याचे कारण असे आहे की, त्या ठिकाणच्या चा-या, टेल, पाणी देण्यासाठी आवश्यक असलेले जी यंत्रणा असावयास पाहिजे, ज्या ज्या ठिकाणी सुविधा उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे त्या उपलब्ध करुन न दिल्यामुळे विदर्भातील 50 टक्के क्षमता आपण वापरु शकत नाही. सभापती महोदय, अकोला जिल्हयाची सिंचन क्षमता 12 टक्के असतांना प्रत्यक्षात 7 टक्के सिंचन क्षमता वापरली जाते.

**(सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड..........

बुलढाणा जिल्ह्याची सिंचन क्षमता 31 टक्के असताना प्रत्यक्षात 8 टक्के सिंचन क्षमता वापरली जाते. मला या ठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते की, हा सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याबाबत शासन उदासीन आहे काय अशा प्रकारची शंका आमच्या मनात येते. अनेक सिंचनाच्या प्रकल्पातून पिण्यासाठी आणि औद्योगिक गरजा भागविण्यासाठी पाणी आरक्षित केले जाते. त्यामुळे सिंचन क्षमता हळूहळू कमी होत चालल्याचे आपणास पहावयास मिळते. मराठवाड्यातील औरंगाबाद वगळता जालना, नांदेड, उस्मानाबाद जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक सतत खालावत चालल्याचे आपल्या लक्षात येते. जालना जिल्ह्याचा मानव निर्देशांक 0.27 आहे. नांदेड-0.37, उस्मानाबाद-0.37, हिंगोली-0.45, परभणी-0.45, बीड- 0.47, लातूर-0.47 म्हणजे मानव निर्देशांक एक टक्क्यापर्यंत सुध्दा पोहोचलेला नाही हे आमचे दुर्भाग्यच म्हणावयास हवे. मानव विकास निर्देशांक विकासाची जी पुस्तिका वितरित करण्यात आली त्यात असे म्हटले आहे की, मराठवाड्यातील अनेक जिल्हे मानव विकास निर्देशांकापासून खूप खालच्या बाजूला आहेत. सर्वात दुःखाच्या गोष्ट म्हणजे मराठवाड्यातील जालना जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सर्वात शेवटी आहे. मराठवाड्यातील सिंचनाच्या संदर्भात सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार यांनी बैठक घेतली होती. त्याबैठकीस पालकमंत्री, सन्माननीय मंत्रिमहोदया डॉ.विमल मुंदडा, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी आणि मी त्या बैठकीस उपस्थित होतो. त्या बैठकीत सिंचन क्षमता वाढविण्याकरिता काय करता येईल याबाबत चर्चा झाली होती. मानव विकास निर्देशांक पुस्तिकेमध्ये मराठवाड्यातील जालना जिल्हा सर्वच क्षेत्रामध्ये मागे असल्याचे म्हटले आहे. मग शिक्षणाचा विषय असेल, सिंचनाचा विषय असेल वा अन्य विषय असतील, हा जिल्हा सर्वात शेवटी आहे. महाराष्ट्रातील जालना जिल्हा आणि त्या जिल्ह्यातील माझा मंठा तालुका हा सर्वात शेवटी आहे. म्हणून मी याठिकाणी प्रत्येकवेळी हा विषय मांडून शासनाने आमच्या जिल्ह्याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे अशी मागणी करीत असतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड..........

सभापती महोदय, महाराष्ट्रात एकूण 148 अवर्षण प्रवण तालुके असून त्यात मराठवाड्यातील 29 तालुके आहेत. दांडेकर समितीच्या शिफारशीप्रमाणे दुष्काळी तालुक्याच्या सिंचन क्षेत्राच्या अनुशेष निधी निश्चित करुन तो न्याय पध्दतीने सर्व विभागांना मिळाला पाहिजे.परंतु प्रत्यक्षात मराठवाड्यातील अवर्षणप्रवण तालुक्यावर फार मोठा अन्याय झालेला दिसतो.

सभापती महोदय, राज्यात सुमारे 1246 सिंचन प्रकल्प अपूर्ण आहेत. हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 41 हजार कोटी लागणार आहेत. प्रशासकीय मान्यता देण्यात आलेले प्रकल्प तसेच नजिकच्या काळात प्रशासकीय मान्यता मिळणारे प्रकल्प यासाठी लागणारा निधी शासनाने तात्काळ उपलब्ध देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सह्याद्री अतिथीगृहावर एक बैठक झाली होती त्या बैठकीत मी सांगितले होते की, मराठवाड्यात प्रकल्प प्रस्तावित केले जातात, परंतु ते पूर्ण होणार नाहीत याकडे जास्त लक्ष दिले जाते. प्रकल्पासाठी वर्षाच्या अखेरीस निधी दिला जातो त्यामुळे तो निधी खर्च होत नाही. मग सांगितले जाते की, आम्ही निधी देतो परंतु तो तुम्ही खर्च करीत नाहीत. आमची इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती झालेली आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MHM/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित.... 17:00

श्री.धोंडीराम राठोड....

सभापती महोदय, कोकणातील 1 मोठा, 4 मध्यम व 33 लघूसिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 1153 कोटी रुपये लागणार आहेत. ही रक्कम शासन केव्हा उपलब्ध करुन देणार आहे ? ही रक्कम उपलब्ध करुन दिली नाहीतर हे अपूर्ण असलेले प्रकल्प बरीच वर्षे पूर्ण होऊ शकणार नाहीत. विदर्भातील 8 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प सर्वेक्षणामध्ये अडकलेले आहेत. त्यांचे सर्वेक्षणच पूर्ण होत नाही. माननीय जलसंपदा राज्यमंत्र्यांनी यासंदर्भात लक्ष देण्याची आवश्यकता आहे. या प्रकल्पांचे सर्वेक्षणच पूर्ण होत नसेलतर या प्रकल्पांना स्वरुप येण्याच्या दृष्टीने किती दिवस लागतील ? यामध्ये यवतमाळचे 17, अमरावतीचे 24, अकोल्याचे 09, बुलढाण्याचे 08, वाशिमचे 07, नागपूरचे 10, वर्धाचे 04, चंद्रपूरचे 15, गडचिरोलीचे 21, भंडाऱ्याचे 04, गोंदियाचे 08 प्रकल्प आहेत. अशाप्रकारे एकूण 127 प्रकल्प सर्वेक्षणामध्ये अडकून पडलेले आहेत. त्या प्रकल्पांचे सर्वेक्षण केव्हा पूर्ण होईल, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. सभापती महोदय, मराठवाडयातील 9 मोठे, 20 मध्यम व 300 लघूसिंचन प्रकल्प शासकीय उदासीनतेमुळे वर्षानुवर्षे रखडले आहेत. उपरोक्त प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 6,300 कोटी रुपये लागणार आहेत. त्यापैकी आम्हाला फक्त 3,410 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. उर्वरित 2,975 कोटी रुपयांची तरतूद शासन केव्हा करणार आहे ? तसेच, यासंदर्भातील निधी उपलब्ध झालातरी तो खर्ची पडणार की नाही याबाबत आमच्या मनात शंका आहे. प्रकल्प पूर्ण होऊ नयेत म्हणून काही अलिखित गोष्टी केल्याचे आम्हाला पहावयास मिळते. प्रकल्पाची आवश्यकता असेलतर पाणी उपयोगिता प्रमाणपत्र अगोदर दिले जात नाही. जोपर्यंत पाणी उपयोगिता प्रमाणपत्र मिळत नाही तोपर्यंत त्या प्रकल्पाची सुरुवात होत नाही किंवा प्रकल्पाचा प्रस्तावही तयार करता येत नाही. अशाप्रकारे सुरुवातीसच पाणी उपयोगिता प्रमाणपत्र देण्याबाबत अडविले जाते. तसेच, प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता वेळेवर मिळत नाही. महिनोंमहिने हे प्रस्ताव मंत्रालयात फिरत राहतात, परंतु त्यांना प्रशासकीय मान्यता मिळत नाही. त्यामध्ये वारंवार त्रुटी काढून आमच्या या संचिका वित्त विभागाकडून प्रामाणिकपणे व सातत्याने परत पाठविल्या जातात. वारंवार हे प्रस्ताव वित्त विभाग परत पाठवते. उदा. माझ्या मतदारसंघातील उसवद देवथाना येथील केटीवेअर बंधारा नादुरुस्त केल्यामुळे तो सन 2002 साली फुटला. त्या महापुरामुळे

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ MHM/ SBT/ MHM/ पूर्वी श्री.अजित.... 17:00

श्री.धोंडीराम राठोड....

शेतकऱ्यांची शेकडो एकरांची जमीन वाहून गेली. त्या जमिनी आता उपयोगात येत नाहीत. या केटीवेअरच्या दुरुस्तीचा प्रस्ताव गेल्या 6 महिन्यांपासून मंत्रालयात फिरत आहे. प्रामाणिकपणे आणि सातत्याने यामध्ये त्रुटी काढून आमचे प्रस्ताव परत पाठविले जात आहेत. पहिल्यांदा, दुस-यांना, तिसऱ्यांना, चौथ्यांदा अशाप्रकारे प्रामाणिकपणे व सातत्याने प्रस्ताव परत पाठविले जात आहेत. माननीय मंत्री महोदयांनी याबाबतची नोंद घ्यावी. केटीवेअर दुरुस्ती संचिका क्रमांक 639 (जलसंपदा विभाग) हा प्रस्ताव गेल्या 6 महिन्यांपासून मंत्रालयात फिरत आहे. आणखी किती दिवस हा प्रस्ताव तेथे फिरणार आहे ? याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. कारण, प्रकल्पाला प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिल्यानंतरही त्याचा कार्यारंभ आदेश दिला जात नाही. प्रथम प्रशासकीय मान्यता दिली जाते व नंतर तांत्रिक मान्यता दिली जाते, परंतु त्यासाठी मंत्रालयात किती चकरा माराव्या लागतात, हे आपल्याला माहीतच आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड ....

हे कार्यारंभ आदेश वेळे वर दिले जात नाही. त्यामुळे त्या ठिकाणचे काम सुरु होत नाही. अनेक प्रकल्पाला प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतरही कार्यारंभ आदेश वेळेवर मिळत नाही.माझ्या मतदारसंघातील आंबा, वाघाळा, जि. जालना या के.टी. दुरुस्तीचा कार्यारंभ आदेश अद्याप मिळालेले नाही. हा बंधारा फुटला त्यावेळी तो बंधारा दुरुस्त करण्यासाठी प्रस्ताव मंत्रालयामध्ये बरेच दिवस फिरल्यानंतर त्याला प्रशासकीय मान्यता मिळाली, तांत्रिक मान्यता मिळाली. परंतु आता बरेच महिन्यापासून त्यास कार्यारंभ आदेश मिळालेला नाही. हा कार्यारंभ आदेश जर वेळेत निघाला असता तर त्या दोन्ही बंधाऱ्याचे काम सुरु झाले असते व तो बंधारा आतापर्यंत पूर्ण झाला असता आणि शेतकऱ्यांचे झालेले नुकसान टळले असते.सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले असते. परंतु या दुष्टचक्रामध्ये आम्हाला गुंतवून ठेवण्यात आलेले आहे. म्हणूनच हा कार्यालयीन आदेश कधी मिळेल, त्या संदर्भात काम कधी सुरु होईल व ते काम कधी पूर्ण होईल या विषयी मंत्री महोदयांनी माहिती दिली तर फार बरे होईल. प्रकल्पासाठी आर्थिक तरतूद केली जाते मात्र त्या कामात अडचणी आणून ते काम सुरुच होणार नाही किंवा ते काम पूर्ण होणार नाही याची दक्षता घेतली जाते. निधी उपलब्ध करुन दिला जात नाही, वेळेवर दिला जात नाही अशा पद्धतीने प्रकल्प शासनास पूर्ण होऊ द्यावयाचे नाहीत अशी शंका निर्माण होऊ लागली आहे.दिनांक 6.03.2006 रोजी माननीय राज्यपाल महोदयांनी खालील प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्याचे निदेश दिले होते. विदर्भास 747.62 कोटी, मराठवाडयास 412 .12 कोटी हा निधी उपलब्ध करुन दिला आहे काय असे मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे. राज्यात 148 अवर्षणप्रवण तालुक्यातील उर्वरित महाराष्ट्रातील 66 तालुक्यांपैकी 40 तालुके राज्यसरासरीच्या वर गेलेले आहेत (राज्याची सिंचन सरासरी 61 टक्के) या उलट मराठवाडयातील 29 तालुक्यांपैकी फक्त 4 तालुके राज्य सरासरीच्या बरोबर आहेत. उर्वरित 25 तालुके सिंचनाच्या राज्य सरासरी बरोबर कधी येतील ? येणार आहेत किंवा नाहीत अशा प्रकारची भिती आमच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. अवर्षणप्रवण सर्वच तालुके सरासरीच्या बरोबरीने आणण्यासाठी शासन कालबध्द कार्यक्रम निश्चित करणार आहे काय ? दिनांक 23.032007 रोजी माननीय राज्यपाल विवरणपत्रातील पान क्र. 19 वर खालील रकमेचें वाटप करण्यास मान्यता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड.....

दिली आहे. विदर्भ विकास मंडळास 5503.5 कोटी रुपये , मराठवाडा विकास मंडळास 3708.42 कोटी एवढी तरतूद शासनाने विदर्भ आणि मराठवाडयास दिलेली आहे काय याबाबतही मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा. एवढया रकमेचे देणे महाराष्ट्र शासनाकडे बाकी असताना

यानंतर श्री. रोझेकर .....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडिराम राठोड.........

सन्माननीय राज्यमंत्री, डॉ.देशमुख साहेबांकडून आम्हाला आमच्या वाटयाचे घ्यायचे आहे. आम्हाला आमच्या वाटयाचे देण्याऐवजी बुंदीचे टोपले घेऊन डवकाच्या डवका आम्हाला वाढण्याऐवजी, बसा, बसा, जेवता का ? असं न वाढताच म्हटल्यासारखं करु नका. ताबडतोब आम्हाला काही तरी द्या.

सभापती महोदय, या निमित्ताने मला जे प्रश्न विचारायचे आहेत ते मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विचारणार आहे. सिंचन अनुशेष असलेल्या भागातील प्रकल्पाना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र वेळेवर मिळेल काय ? विविध प्रकल्पांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता वेळेवर मिळेल काय ? कामाचा कार्यारंभ आदेश वेळेवर मिळतील काय ? उपलब्ध करुन दिलेली आर्थिक तरतूद पूर्णपणे व विशिष्ट कालमर्यादेत खर्च केली जाईल काय ? मराठवाडा, विदर्भ, खानदेश आणि कोकणातील अवर्षणप्रवण तालुक्यांना सिंचनाच्या राज्य सरासरीबरोबर किती दिवसात आणले जाईल ?

सभापती महोदय, वर्तमानपत्र त्यांचे काम करत असते. या विषयासंदर्भात वर्तमानपत्रात काही बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. या बातम्यांची शीर्षके केवळ मी येथे आपल्याला वाचून दाखवितो. "शंकररावांच्या नांदेडात सिंचन प्रकल्प दुर्लक्षित", "मुख्यमंत्री म्हणतात, कृष्णा खो-याचे पाणी मराठवाडयाला नक्की देणार", "अनुशेषाची तरतूद केली पण पैशांचे काय?" मराठवाडयातील लोकांनी एक छोटी बैठक घेतली, विकास आघाडीचे असे म्हणणे आहे की, मिळतच नसेल तर मागा कशाला ? "व-हाडातील सिंचन प्रकल्पांचा 50 टक्के उपयोग होत नाही", "विदर्भ आणि मराठवाडा सिंचन क्षेत्रासाठी भरपाईपोटी 890 कोटी रुपयांची तरतूद करावी", किती मिळणार ? "सिंचन अनुशेषासाठी अद्यापही 41 हजार कोटींची गरज", "विभागवार अनुशेषाची आकडेवारी अर्थसंकल्पात नाही", "कोकणच्या सिंचन विकासाची उपेक्षा", किती दिवस राहणार ? "विदर्भातील आठ हजार कोटींचे प्रकल्प सर्वेक्षणात अडकले", "विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी नाबार्डचे 117 कोटी रुपये", पण ते कधी मिळणार ? "सिंचन सुविधांबाबत मराठवाडा अजूनही तहानलेला", "सिंचन पाण्याचे, धोरण शासनाचे" आणि सर्वात शेवटी महत्वाचे आहे ते आपल्याकडे पाठवितो, "उर्वरित महाराष्ट्र तेवढा मालामाल", बाकीचे काय ते वाचत नाही, सगळयांचे हालच हाल. अशा पद्धतीने या ठिकाणी मराठवाडा, विदर्भ, कोकण

..2........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडिराम राठोड..........

आणि खानदेशातील सिंचन प्रकल्पांची दुर्दशा आपल्यासमोर मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे. आपल्यामार्फत मी शासनाला विनंती करु इच्छितो की, जे झाले तेवढे खूप झाले. यापुढे आमचे हाल होणार नाहीत, याची शासनाने निश्चितपणे काळजी घ्यावी व कठोर अशी पावले उचलावित. मराठवाडयातील शेतकरी हा फार कष्टाळू, मेहनती, रात्रं-दिवस काम करणारा, कोरडवाहू जमीन असतांना सुध्दा त्या जमिनीतून जे काही उत्पन्न मिळेल त्यावर उदरनिर्वाह करणारा आहे. मराठवायातील आमचा शेतकरी दिवाळीनंतर मजूरी करावयास जातो. कुठे ऊस तोडण्यास जातो, कुठे इमारतींची कामे करण्यासाठी जातो, धरणावर काम करण्यास जातो, गावात 10-15 म्हातारे खोकत बसलेले असतात, बाकीचे सर्व कामाला गेलेले असतात. अशा प्रकारे तेथील शेतकरी उद्धस्त झाला आहे. म्हणून आमच्या सिंचन अनुशेषाकडे शासनाने जास्त लक्ष द्यावे. माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे आर्थिक तरतूद करुन आम्हाला जी अनुशेषाची रक्कम आहे ती तात्काळ देण्याची व्यवस्था करावी, अशा प्रकारची विनंती आपल्यामार्फत मी शासनाला करतो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

-----------------

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : या प्रस्तावावर आपले विचार व्यक्त करण्यासाठी सन्माननीय सदस्य सर्वश्री.श्रीकांत जोशी,केशवराव मानकर,सुधाकर गणगणे सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांची नावे आलेली आहेत.

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सर्वप्रथम मी सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड आणि श्री.सुधाकर गणगणे यांचे हा प्रस्ताव या सदनामध्ये चर्चेला मांडल्याबद्दल मनापासून अभिनंदन करतो. आपण हा अत्यंत महत्वाचा आणि गंभीर असा विषय नियम 260 अन्वये सभागृहात चर्चेला मांडल्यामुळे आणि या चर्चेमध्ये बोलण्याकरिता माझेही नाव आहे हे ऐकून मला अतिशय आनंद झाला तसेच, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे आणि माझे नाव या चर्चेमध्ये आहे हे ऐकून त्यांना आणि मला आम्हा दोघांनाही आनंद झालेला आहे व त्याबद्दल मी आपले आभार मानू इच्छितो. इतर वेळेस सर्व प्रस्तावांवरील चर्चा पुढच्या बेंचमध्येच गुंडाळली जाते व आमची मते व विचार आमच्या मनामध्येच राहून जातात. आज आमच्या जीवनातील हा अत्यंत चांगला असा क्षण आहे व हा क्षण आम्हाला लिहून ठेवावा लागेल कारण इतर वेळेस कोणत्याही महत्वाच्या विषयावर पुरेसे बोलण्याची संधी आम्हाला कधीच मिळत नाही. बोलावयाची संधी जरी मिळाली तरी अर्धा एक मिनिट किंवा पाच मिनिटे एवढाच वेळ मिळते. या प्रस्तावामध्ये मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांच्या पर कॅपिटा उत्पन्नाबद्दलचा अतिशय गंभीर विषय आहे.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, या विषयावरील चर्चा ऐकण्याकरिता कोणीही उपस्थित नाही.

श्री.श्रीकांत जोशी : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, आज निदान या सभागृहामध्ये डॉ.सुनील देशमुख तर उपस्थित आहेत, त्याबद्दल मी त्यांचेही आभार मानू इच्छितो. नाहीतर ही चर्चा देखील गुंडाळली गेली असती. पाणीपुरवठा विभागाचे कोणीही सचिव येथे उपस्थित नसल्याचे दिसत आहे परंतु आम्हाला खात्री आहे की, आमच्या विचारातील मुद्दे आपण त्यांच्यापर्यंत पोहोचविणार. खरे म्हणजे मराठवाडयाचे आणि विदर्भातील काही भागांमधील पाण्याचे जे दुर्भिक्ष्य आहे ते मानवनिर्मित किंवा निसर्गनिर्मित नसून सरकारनिर्मितच आहे, असे जे बोलले जाते ते खरे आहे आणि हीच वस्तुस्थिती आहे. मी एकदा खरीप हंगामाची तयारी पाहण्याकरिता मराठवाडा आणि विदर्भामध्ये गेलो होतो, मराठवाडा आणि विदर्भ यांचे एकूण उत्पन्न किती आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी........

हे पाहिले तर खरीप हंगामातील मराठवाडयाचे ॲग्रीकल्चर जी.डी.पी. 21 टक्के इतके आहे आणि विदर्भाचे ॲग्रीकल्चर जी.डी.पी. 26 टक्के असे एकूण 47 टक्के त्यांचे खरीप हंगामातील उत्पन्नाचे प्रमाण आहे. जेथे सिंचनाची गरज असते, तेथे म्हणजे पाऊस संपल्यानंतर रब्बी हंगामात विदर्भ पाच टक्के आणि मराठवाडा हा चार ते पाच टक्क्यांपर्यंत जेमतेम येऊन आदळतो. जे विभाग महाराष्ट्राच्या संपूर्ण ॲग्रीकल्चर प्रॉडक्टमध्ये विदर्भ आणि मराठवाडा 26 आणि 21 अशा प्रकारे एकूण 47 टक्के उत्पन्नाचा वाटा राखून ठेवतो, तो विदर्भ रब्बी हंगामामध्ये एकदम पाच टक्क्यावर येऊन आदळतो, म्हणून विदर्भ आणि मराठवाडयामधील पर कॅपिटा उत्पन्न हे कमी आहे. पश्चिम महाराष्ट्र मात्र रब्बी हगांमात 30 टक्क्यापर्यंत जेमतेम जम्प मारते तो खरीप हंगामामध्ये 10 ते 15 टक्के एवढेच उत्पन्न राखून ठेवतो. त्यामुळे तेथील पर कॅपिटा उत्पन्न जास्त आहे याचे कारण असे की, त्यांना खरीपामध्ये आणि रब्बीमध्ये देखील उत्पन्न मिळते. पश्चिम महाराष्ट्रामध्ये कृष्णा खो-यांतर्गत सुमारे 15 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आलेली आहे आणि या आधीदेखील वर्षानुवर्षे त्यांची जमीन 10 लाख हेक्टरच्यापुढेच जमीन ओलिताखाली होती. पण कागदावर जेमतेम 6 ते 7 लाख हेक्टरखालीच जमीन ओलिताखाली आल्याचा कुठेतरी उल्लेख आहे. खरे पाहिले तर पश्चिम महाराष्ट्रातील फिजिकल किंवा प्रॅक्टीकल इरिगेशन 2 ते 3 हेक्टरच्या वर नाही. पश्चिम महाराष्ट्रामधील शेतक-यांना तेथे सिंचनक्षेत्र जास्त असल्यामुळे रब्बी व खरीप अशा दोन्हीही हंगामामध्ये चांगले उत्पन्न मिळते, व त्यांचे पर कॅपिटा उत्पन्नही वाढते. जलप्राय विहिरी, कॅनॉलच्या आजूबाजूला असलेल्या विहिरी व पावसाचे पडलेले पाणी सर्व मिळून इरिगेशन खाते इरिगेशनची आकडेवारी वाढविण्याचा प्रयत्न करते. दुर्देवाने सिंचन खात्याची अनास्था व सरकारचे दुर्लक्ष यामुळे विदर्भ आणि मराठवाडयामधील सिंचन म्हणावे तसे वाढलेले नाही. मराठवाडयाची परिस्थिती तरी बरी होती पण विदर्भाचे सिंचन अनुशेषाचे चित्र फार भयानक आहे, यानंतर मराठवाडयाचीही परिस्थिती वाईटच होणार आहे. विदर्भामध्ये जबरदस्त अनास्था आणि पाटबंधारे विभागाचा काम करण्याचा आळस टोकाचा आहे. पाटबंधारे खात्याची सर्व मुख्य केंद्रे ही मुंबईत असल्यामुळे 31 मार्चच्या गडबडीमध्ये सगळे पैसे आपल्याकडेच रोखून ठेवून कामे अडवून ठेवण्याचा कल जास्त असतो, त्यामुळे मराठवाडा आणि विदर्भ सिंचनाच्याबाबतीत मागे राहिलेला आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .....

माननीय राज्यपालांच्या निदेशामुळे आणि विधिमंडळातील विशेषत: विधानपरिषदेतील लढाईमुळे आता विदर्भ आणि मराठवाडयाला भरपूर पैसे मिळत आहेत. परंतु दूरदृष्टी नसल्यामुळे पैसे मिळूनही ते वाया जातील की काय, अशी परिस्थिती आहे. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे विदर्भासंबंधी बोलणार आहेत. त्यामुळे मी थोडेसे मराठवाडयासंबंधी बोलतो. परवा औरंगाबादवरुन माझ्याबरोबर माननीय श्री.बाळासाहेब विखे-पाटील विमानाने मुंबईला येत होते. त्यांनी मला बाजूला बोलावून सांगितले की, मराठवाडयातील लोकांनो थोडे जागे व्हा. तुम्ही सुप्रिम कोर्टात, केंद्रीय जल आयोगासमोर केस हारत आहात. गोदावरीचे सर्व बॅरेक्स बंद पडणार आहेत. बाभळीचा प्रकल्प तुमच्या हातातून जाणार आहे आणि मराठवाडयाचे वाळवंट होणार आहे, म्हणून तुम्ही लवकर जागे व्हा. तुम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना घेऊन दिल्लीला जा आणि चांगल्या वकिलांची नेमणूक करुन आपली बाजू भक्कमपणे मांडा, असे माननीय श्री.बाळासाहेब विखे-पाटील यांनी मला अत्यंत आग्रहाने सांगितले. माननीय श्री.बाळासाहेब विखे-पाटील हे काही सर्वसामान्य माणूस नाही. त्यांचा सिंचनाचा अभ्यास आपल्याला माहिती आहे. त्यांची वाहवा करण्यासाठी ते माझ्या पक्षाचे नेते देखील नाहीत. सुप्रिम कोर्टातील हिअरींगच्या संदर्भातील आंध्र प्रदेशची तयारी आम्ही बघितली, त्यांनी ज्या पद्धतीने वकिलांचा ताफा लावला होता, ज्या पद्धतीने कोर्टासमोर सर्व आकडेवारी मांडली होती, महाराष्ट्र कसे कल्प्रीट आहे, असे चित्र ते निर्माण करीत होते. त्याप्रमाणे महाराष्ट्राची मात्र तशी तयारी नव्हती, ही वस्तुस्थिती आपल्याला मान्य करावी लागेल. बाभळी बंधा-याला त्यावेळी एन.ओ.सी. दिली नसती तर निजाम सागर धरणाची कॅपॅसिटी अतिशय कमी झाली असती. आपण आपल्या भू-भागामध्ये पाणी येण्यास परवानगी दिली म्हणून ख-या अर्थाने बाभळीचा बंधारा उभा राहू शकला. नदीमध्ये एक बंधारा बांधायचा, असे आपण म्हणतो. त्या बंधा-यामध्ये फक्त 2 टी.एम.सी. पाणी अडणार आहे. त्यामुळे तेथील 40 गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. खरे म्हणजे पूर्वीच हा बंधारा बांधला असता तर बांधकामासाठी एवढा वेळ लागला नसता. बांधकामावर कोणताही स्टे नाही. बांधकामाची जी गती आहे ती पाठीवर थाप मारावी अशा प्रकारची नाही. म्हणून मराठवाडयामध्ये सुरु असलेली कामे, मराठवाडयामध्ये सुरु असलेल्या कामांची गती आणि मराठवाडयाकडे बघण्याचा शासनाचा दृष्टीकोन लवकर बदलला



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .....

नाही, तर त्यामुळे मराठवाडयामध्ये महाभयावह स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. मराठवाडयाची लोकसंख्या पावणेदोन कोटी आहे. दरवर्षी साधारणत: 3 ते 5 टक्के म्हणजे 5 ते 7 लाख लोक मराठवाडा सोडून वेगवेगळया प्रांतामध्ये कायमचे स्थलांतरीत होत आहेत, अशी स्थिती आहे. ऊस तोडणी कामगारांना इंडस्ट्रियल लेबर व्हायचे आहे, त्याही पेक्षा उपाशी पोटी आणि लॅण्ड होल्डींग कमी झाल्यामुळे दुस-या भागामध्ये स्थलांतरीत होणा-यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. याचे सर्वात महत्वाचे कारण असे आहे की, मराठवाडयामध्ये इरिगेशन नाही. सभापती महोदय, जायकवाडी धरणाचा विषय मी सभागृहामध्ये सातत्याने मांडला. जायकवाडी धरणाच्या कॅनॉलची दुरुस्ती करावी, अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली. माननीय मंत्री महोदयांनी जायकवाडी धरणाच्या कॅनॉलची दुरुस्ती करण्याचे मान्य केले आहे. माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, जायकवाडी धरणाचा कमांड एरिया 1 लाख 80 हजार हेक्टर आहे. 1 लाख 6 हजार हेक्टर जलप्राय क्षेत्र असल्याचे आपण उत्तर दिलेले आहे. माझ्याकडे कॅनॉलवाईज सर्व आकडेवारी आहे. शेतीला कॅनॉलमार्फत, डिस्ट्रिब्युटरीज मार्फत शेतक-यांच्या चॅनलपर्यंत पाणी द्या, असे मी म्हणत नाही. पण मायनर, सब मायनरपर्यंत पाणी कसे पोहोचेल, हे बघावे. खरे म्हणजे जास्तीत जास्त 40 हजार हेक्टरचे इरिगेशन आपण करु शकलेलो आहोत. अशीच परिस्थिती अप्पर पैनगंगाची आहे. अप्पर पैनगंगाचे सर्वच्या सर्व कॅनॉल वाहून गेले.

सभापती महोदय, एवढा मोठया प्रमाणावर पाऊस होऊन देखील दोन वेळा जायकवाडी धरण रिकामे झाले. परंतु आपण आपल्या उजव्या कॅनॉलमधून माजलगांव धरण भरु शकलो नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आता आम्हाला पैशांबरोबर नीट युटिलायझेशन पाहिजे. म्हणून मी माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख साहेबांना विनंती करतो की, आपण आम्हाला फक्त तीन दिवस द्या. आपण जायकवाडी धरणाच्या लेफ्ट बँक किना-यापासून पाहणीस सुरुवात करु. आपण पहिला मुक्काम गंगाखेड येथे करु, दुसरा मुक्काम परळी येथे करु आणि सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांच्याकडे जेवायला जाऊ. आपण सर्व परिस्थिती बघितल्यानंतर आम्हाला बोलायची गरजच पडणार नाही. एवढा मोठा प्रकल्प, एवढा मोठा त्याचा कमांड एरिया आहे. परंतु प्रॅक्टिकली आपण जमिनीला पाणी देवू शकत नाही, अशी परिस्थिती आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .....

त्यापेक्षा वाईट परिस्थिती लोअर दुधना प्रकल्पाची आहे. येथे 1980 पासून काम सुरु झालेले आहे. अजूनही हे काम पूर्ण होत नाही, हे काम 500 कोटीवर गेलेले आहे. दरवर्षी येथे पूर येत आहे, पुरग्रस्तांना दरवर्षी 100 कोटी रुपये वाटले जातात. परंतु अजूनही या कामासाठी पुरेसा निधी मिळून हे काम का पूर्ण होत नाही, या प्रकरणाबाबत जलसंपदा विभागाचे मंत्री माननीय श्री.अजित पवार यांनी त्या कॉन्ट्रॅक्टरला बोलावून घेतले व रागावले. कॉन्ट्रक्टर म्हणत होता की, मंत्री महोदय हे आमच्या पक्षाचे नेते आहेत. तरीही यावर मंत्री महोदय श्री.अजित पवार त्याला या भाषेत बोलले की, "हा प्रोजेक्ट पूर्ण करता की, लोकांचे जोडे खाऊ घालता आम्हाला". मंत्री महोदय बोलले तरीही लोअर दुधना प्रोजेक्ट पूर्ण होत नाही. लोअर दुधनाच्या कॅनॉलच्या कामासाठी शासनाने ताबडतोब मिटींग बोलावून त्याची चौकशी केली पाहिजे. तेथील प्रकल्प नुसता पूर्ण केला आहे, परंतु जलपुजन कधी करणार आहात तुम्ही ? ठरविले तरी 2008 मध्ये होणार नाही असे वाटते. तेथील अधिकाऱ्यांनाही माहिती नाही की, जलपूजन कधी होईल. तेथे देशमुख नावाचे एक इंजिनियर आहेत, ते कोणालाच काम करुन देत नाही. त्यांनी लोअर दुधना प्रकल्पातील एकच कॉन्ट्रक्ट पाच पाच जणांना देऊ टाकले. तो अजून डिपार्टमेंटमध्ये आहेत. त्यांनी पाच गावे पकडून ठेवलेली आहेत. ते त्याच कॅचमेंट एरियामध्ये राहणार आहेत, कारण तेथे त्यांचे गाव आहे. त्यांनी लोअर दुधना प्रकल्पाचा ताबा घेतला आहे. याबाबत मी मंत्री महोदयांना सांगितले होते. त्यानंतर त्यांना निलंबीत करण्यात आले. त्यांना निलंबीत केले तरी त्यांचे उद्योग चालू आहेत, प्रत्येक गावच्या कोणत्या तरी शेतकऱ्याला लावून द्यावयाचे. यामुळे कॉन्ट्रक्टरलाही काम बंद पडल्याचा प्रॉफिट होतो आणि इतरांनाही प्रॉफीट होतो. तेथील लोकांनी काय करायचे ? जलसमाधी घ्यायची का ? 500 कोटीवर गेलेला हा प्रकल्प केवळ सध्या 2-3 कोटी पाहिजेत म्हणून पूर्ण होत नाही. ही सरकारची कार्यक्षमता आहे का ? लोअर दुधना प्रकल्पाच्या बाबतीत शासनाने सर्व कायदे बाजूला ठेवले पाहिजेत, नाहीतर अनेक संसार उद्ध्वस्त होतील. त्या परिसरात पडणारा पाऊस पूराद्वारे परभणी जिल्ह्यातील हजारो एकरची राखरांगोळी करीत जातो. याठिकाणी दरवर्षी पूर येतो. विशेष बाब म्हणून आपण हे काम लवकर का पूर्ण करीत नाही ? चार गावांचे तुम्ही स्थलांतर करु शकत नाही ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ SBT/ MHM/

श्री.श्रीकांत जोशी.....

लोअर दुधना प्रकल्पाबाबत आम्ही मिटींग घेतली आणि सांगितले की, तेथील काम कोणी बंद पाडत असेल तर पोलीस फोर्स पाठविण्यात येईल. तेथे दहा वर्षापूर्वी एक रस्ता केलेला होता, तो फुटला आहे, यासाठी पाच लाख रुपयांचे काम मंजूर करावे अशी विनंती केली. तेव्हा सांगितले गेले की, गोदावरी विकास महामंडळामध्ये रिपेअर ॲन्ड मेन्टेनन्ससाठी तरतूद नाही. पाच लाख रुपयांचे काम केले नाही म्हणून पाच गावांचे स्थलांतर झालेले नाही. असा प्रश्न जर पश्चिम महाराष्ट्रात निर्माण झाला असता तर वेगळी परिस्थिती दिसली असती. अशा किरकोळ कामांमुळे जर पुनर्वसन होत नसेल तर सिंचन विभाग काय करीत आहे ? मराठवाड्यातील गोदावरी खोरे महामंडळातील अनास्था बदलावयाची असेल तर याकडे लक्ष दिले पाहिजे. जलसंपदा मंत्री माननीय श्री.अजित पवार यांना कामाच्या व्यापामुळे या प्रकल्पाकडे पाहावयास वेळ मिळत नाही. त्यामुळे आमच्या लहान लोकांचे प्रश्न जलसंपदा राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी सोडवावेत. मराठवाडयातील या विभागात वीस हजार कर्मचाऱ्यांची आस्थापना आहे. यापैकी सहा ते सात हजार ज्युनियर इंजिनिअर्स आहेत, ज्युनियर इंजिनिअर्सचा सर्वात जास्त भरणा विदर्भ व मराठवाडयात आहे, ते काम करत नसतील तर निदान त्यांच्या इतरत्र बदल्या तरी करा. मी लोअर दुधना प्रकल्पाच्या कार्यालयात गेलो होतो. तेथील कार्यकारी अभियंत्यांना भेटलो. ते म्हणाले की, वर्षानुवर्षे हे कर्मचारी येथेच कार्यरत असले तरी कोणतेही काम करीत नाहीत, त्यामुळे मीच सर्वांचे काम करत आहे, त्या लोकांना मी सांगून सांगून थकलो आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी लोअर दुधना प्रकल्पावरील अधिकारी व कर्मचारी तेथे वर्षानुवर्षे काम करीत असल्याबाबत उल्लेख केला आहे, याबाबत मी सांगू इच्छितो की, या विषयाबाबत माझ्याकडे प्रस्ताव मांडण्यात यावा.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या खात्यातील बरेच अधिकारी वर्षानुवर्षे सेलू येथे ठाण मांडून बसले आहेत. तुम्ही याबाबत एक बैठक घेतली तर लगेच तुमच्या लक्षात येईल.

नंतर श्री.सुंबरे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

अशीच परिस्थिती जायकवाडीच्या बाबतीत, कॅनॉलच्याबाबतीत माजलगाव कॅनॉल सर्कलमध्ये आहे. लातूरमध्ये मात्र असे होत नाही. तेथे फटाफट कामे होतात. नांदेड परभणी आणि जालना या तीन जिल्ह्यात मात्र एवढी अनास्था आहे की विचारू नका आणि बीडमध्ये मात्र मिसमॅनेजमेंट आहे. काम करण्याचा उत्साह नावाचा प्रकारच तेथे नाही. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कबूल केल्यानंतर जायकवाडीचा कॅनॉल दुरूस्त करण्यासाठी मी त्यांना 'प्रस्ताव करा, प्रस्ताव करा' म्हणून गेली 3 वर्षे मागे लागलो. काही अडचणी आल्या तर आम्हाला सांगा असेही त्यांना सांगितले. पण इतके 2 कोटी रूपये मिळणार आहेत काय ? मिळालेच तर आम्हाला आमदाराला देखील त्यातील द्यावे लागतील, टेंडर काढावी लागतील वगैरे अनेक कारणे सांगून काम करण्याचे टाळले जाते. कोणी तेथे कामच करीत नाही. म्हणून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, आपण एकदा तेथे जा, तेथील सगळ्या अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना एकत्र बोलावून घ्या आणि शांतपणे विचारा की, तुम्हाला काम करायचे आहे की नाही ? ज्यांना काम करण्यात इंटरेस्ट नाही त्यांना तेथून उचला आणि विदर्भात वा अन्य ठिकाणी पाठवा. सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, मराठवाड्यामध्ये 52 मध्यम प्रकल्प आहेत. त्यांची उंची वाढविण्याचेच केवळ काम आपल्याला करावयाचे आहे जेणे करून त्यात पाण्याचा साठा अधिक होऊ शकेल. त्यासाठी अधिक काहीही करावे लागत नाही. सध्याच्या स्थितीत मराठवाड्यामध्ये एकही मेजर प्रकल्प होऊ शकत नाही. नवीन प्रकल्प घ्यायचा तर पाण्याच्या उपलब्धतेची समस्या आहे. आपल्या सगळ्या एमआय टँकसाठी ॲटोमेटिक गेटस् आपण लावू शकतो. ज्याला रेडिअल गेटस् वा गोडबोले गेटस् म्हणतात. मराठवाड्यामध्ये मोठ्या प्रमाणात हे काम होऊ शकते. सभापती महोदय, तेथील तिरा प्रकल्पाच्याबाबतीत मी गेल्या चार वर्षांपासून मागे लागलो आहे. पण कोणीही त्याकडे लक्ष देत नाही. खेळणा मध्यम प्रकल्प आहे त्याचे काम होत नाही, गडदगड मध्यम प्रकल्प आहे पण त्याचे काम होत नाही. अजंता मध्यम प्रकल्प आहे त्याचे काम होत नाही. लातूर जिल्ह्यातील एक प्रकल्प आहे, परंतु त्याचेही काम होत नाही. केवळ या प्रकल्पांची उंची वाढविण्याचेच काम आहे, ते करण्यात काय अडचण आहे हे मला समजत नाही. जोराचा पाऊस आला की, ती ॲटोमेटिक गेटस् आपोआप पडतात आणि त्यातून वाहून जाणारे पाणी त्यामुळ थांबते. जवळपास दीड पट प्रत्येक प्रकल्पाची उंची आपण वाढवू शकतो. परंतु दुर्दैवाने ते कोठेही केले गेलेले नाही. म्हणून

...... 3एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

माझी विनंती आहे की, यामध्ये एक टास्कफोर्स म्हणून काम केले तर एका वर्षामध्ये हे काम होऊ शकते आणि आहे त्याच्या दीड पट पाण्याचा साठा तेथे होऊ शकतो. माझ्या दृष्टीने मराठवाड्यातून सगळ्यात मोठा अस्मितेचा हा प्रश्न आहे. तेथील 75 टक्के असलेली डिपेंडिबिलिटी 50 टक्क्यांवर आणली गेली पाहिजे. आपण मराठवाड्याचा 50 वर्षांचा रेकॉर्ड पाहिला तर तीन वर्षे चांगला पाऊस होतो आणि पुढील तीन वर्षे दुष्काळ पडतो. हे चक्र सातत्याने चालू आहे. म्हणून हे सारे रेकॉर्ड पाहून त्याप्रमाणे प्रकल्प आराखडा तयार करून 75 टक्के डिपेंडिबिलिटी 50 टक्क्यांवर आणण्याचे काम आपण करू शकतो. आज मराठवाड्याचे पर कॅपिट उत्पन्न अत्यंत कमी आहे. आपण हे काम केले तर हे उत्पन्न निश्चितपणे वाढू शकेल. आमच्या बहुतांशी मध्यम प्रकल्पांना मोठ्या प्रमाणात प्रशासकीय मान्यता मिळू शकेल. दुसरे म्हणजे या सर्व प्रकल्पांतील गाळ काढण्याचे काम देखील आपल्याला करावे लागणार आहे. त्या दृष्टीने आपण तेथे किती गाळ आहे याचा सर्व्हे घेतला पाहिजे, तेथे जमा झालेला गाळ किती आहे याचा अंदाज घेतला पाहिजे. आणि नंतर हा गाळ काढला गेला तर पाण्याची तेवढी कपॅसिटी तेथे अधिक होऊ शकेल. तेव्हा गाळ काढण्याचे काम अत्याधुनिक पद्धतीचा वापर करून करावे आणि विशेष बाब म्हणून हे काम मंजूर करून घ्यावे. त्यासाठी सगळ्या गोदावरी खोऱ्यातील सगळे इंजिनिअर्स आपण कामाला लावावेत. त्यातून वॉटर क्लिअरन्स किती मिळू शकते याचाही अंदाज आपण घेऊ शकतो. अन्यथा आज वॉटर क्लिअरन्स नाही म्हणून देखील मराठवाड्यातील प्रकल्प होणार नाहीत. कामावर साडेतीन हजार इंजिनिअर्स असतानाही मराठवाड्यात पाणी उपलब्ध नाही यास्तव नॉन-फिजिबल म्हणून प्रकल्प नाकारले जातात. गेल्या वर्षी चांगला पाऊस झाल्यामुळे गोदावरी नदीतून 10 लाख क्युसेक्स पाणी वाहत होते, पण त्याचा साठा आपण करू शकलो नाही, ते अडवू शकलो नाही. ही अतिवृष्टी तीन दिवस नासिकला झाली. मग एवढे पाणी गेले कोठे ? एकदा याची नीट तपासणी केली पाहिजे की, मराठवाड्यात पाण्याची उपलब्धता आहे की नाही ? अर्थात तेथील सर्व गोष्टींचा विचार करून आपण हे केले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.राठोड या ठिकाणी तळमळीने बोलले. त्यांच्या जवळच तळणी नावाचे गाव आहे. तेथे पाणीच मिळत नाही, त्यामुळे तेथील लोक पाण्याला खरोखरी अमृत म्हणतात. पण त्या भागात एकही धरण होऊ शकत नाही. मध्ये कोठे तरी खडकपूर्णा, मध्यम दुधनाचे पाणी वापरले जाते. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 3ओ 1 ...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

आपल्याकडे आज लोकांना, जनावरांना प्यायला पाणी नाही अशी परिस्थिती आहे. तेव्हा विशेष बाब म्हणून लोकांकरिता पिण्याच्या पाण्याकरिता आपण प्रकल्प केले पाहिजेत. नाहीतर तो सर्व भाग वाळवंट होऊन जाईल. उस्मानाबाद जिल्हा, नांदेड जिल्हयातील तीन तालुके, परभणी जिल्हयातील दोन तालुके आणि जालना जिल्हयातील मंठा, भोकरधन, जाफराबाद येथील परिस्थिती भीषण आहे. आपण जर हेलिकॉप्टरमधून या भागाचा सर्व्हे केला तर सर्वत्र वाळवंट झालेले दिसेल. माननीय श्री. बाळासाहेब विखे पाटील साहेबांनी सांगितले आहे की, मराठवाडयातील लोकप्रतिनिधींनी दिल्लीला जाऊन आग्रही भूमिका मांडली नाहीतर आज बाभळी बंधाऱ्याच्या बाबतीत आंध्र प्रदेशने जी भूमिका घेतली आहे, ती सर्वच धरणांच्या बाबतीत ते राज्य घेईल. त्यामुळे मराठवाडयाचे वाळवंट झाले तर त्यांना कुणीही अडवू शकणार नाही. फक्त जायकवाडी प्रकल्पावर संपूर्ण मराठवाडयाचे भूक्षेत्र पाण्याखाली येणार नाही. मराठवाडयामधील 12 लाख हेक्टर सिंचन क्षेत्राचा मास्टर प्लॅन असतांना आपण 2 लाख हेक्टरच्या पुढे गेलो नाही ही वस्तुस्थिती आहे. याचा आपण नीट विचार केला पाहिजे. मराठवाडयातील भौगोलिक परिस्थिती पाहून मला सांगितले पाहिजे की, 250 हेक्टर क्षेत्राखालील प्रकल्प सिंचन खात्यामध्ये येत नाही म्हणून आपण त्या प्रकल्पांना सावत्र भावाची वागणूक देतो. शेतीला पाणी मिळाले म्हणजे सिंचन झाले. त्यामध्ये 100 हेक्टरच्या खालील प्रकल्प असतील किंवा 250 हेक्टरच्या पुढील क्षेत्र असतील त्याकरिता डिपार्टमेंट बदलले म्हणून आपण त्याला सापत्नपणाची वागणूक देणार, त्या प्रकल्पाला पैसे देणार नाही, त्याला आपण बॅकलॉगमधून पैसे देणार नाही, ती आमची मालकी नाही तर ग्रामपंचायतीची, जिल्हा परिषदेची मालकी आहे अशी भूमिका घेऊन चालणार नाही. आपल्या जलसिंचन विभागाला चांगली ट्रीटमेंट मिळत नसल्यामुळे हे डिपार्टमेंट आपण बंद करुन टाका. ते ठेवून जर आमच्या प्रकल्पाकरिता पैसे मागितले तर ते मिळत नाहीत तर मग हे डिपार्टमेंट कशासाठी? 250 हेक्टरच्या पुढील प्रकल्पाकरिता पैसे खर्च करता. आमच्या मराठवाडयातील 100 हेक्टरच्या खालील प्रकल्पासाठी पैसे कोण देणार आहे? ते आपल्याकडे मागावेत की नाही. त्यामधून शेतकऱ्यांचे भले होणार नाही.? कारण त्या खात्याकडे पैसे जातात म्हणून शेतकऱ्यांवर

श्री. श्रीकांत जोशी...

अन्याय होणार असेल तर मग डिपॉझीट ते प्रकल्प करा. ते सर्व प्रकल्प तुम्ही तुमच्या ताब्यात घ्या. माननीय सदस्य श्री. राठोड यांनी मुद्दा सांगितला तो बरोबर आहे. जल सिंचनाखालील घेतलेले प्रकल्प आहेत, त्यावर गेट बसविण्याकरिता आपल्याकडे पैसे नाहीत. मराठवाडयामध्ये 9 हजार केटीवेअर बंधारे पाण्यावाचून बांधावयाचे राहिले आहेत. त्या केटीवेअर मधून डिसेंबर, जानेवारीपर्यंत पाणी वाहून जात होते. परंतु आपल्याला गेट बसविण्यासाठी पैसे मिळाले नाहीत. 1 लाख हेक्टर स्ट्रक्चर तयार आहे परंतु पाणी न मिळाल्यामुळे आपण ती जमीन पाण्याखाली आणू शकलो नाही. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांकडे भरपूर पैसे आहेत. आपण आम्हाला याकरिता पैसे दिले पाहिजेत. तुमच्याकडे असलेल्या 3700 कोटींपैकी 200 कोटी खर्च केले पाहिजेत. 500 कोटी रुपये दिले तर त्यामध्ये हजारा प्रकल्प होऊन जातील, आणि आपल्याला जनता सुध्दा दुवा देईल. म्हणून माझी विनंती आहे की, तुम्ही 100 हेक्टरचा मास्टर प्लॅन तयार करा. कमांड एरियामधील मेजर इरिगेशनवर आपण 70 टक्के खर्च करा व मायनर इरिगेशन 30 टक्के असेल तर त्यातील 250 हेक्टरच्या खाली 10 किंवा 15 टक्के खर्च होणार असेल तर तुमच्या प्लॅन आऊटले मधील 10 टक्के खर्च जल सिंचन व ग्राम विकास विभागामार्फत करा. नाहीतर हे सर्व प्रकल्प आपल्या ताब्यात घेऊन पूर्ण करा. त्या त्या खात्याची व गावची मागणी आहे त्यासाठी आपण आग्रह धरु असे जाणीवपूर्वक उत्तर आपण आम्हाला द्या.

तिसरी गोष्ट म्हणजे मराठवाडयाला मायनर इरिगेशनची गरज आहे. विदर्भामध्ये सुध्दा गरज असली तरी मराठवाडयातील बॅकलॉगची परिस्थिती पाहिली तर येथील लँड होल्डिंगचा आपण विचार केला पाहिजे. पश्चिमेकडील देशामध्ये मेजर इरिगेशन होते. त्याठिकाणी लँड होल्डिंग मोठे आहे. त्याठिकाणी 3 ते 5 टक्के लोक शेतीवर अवलंबून रहातात.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरू...

आपण फक्त मेजर प्रोजेक्ट मजबूत करण्याचा विचार केल्यामुळे समाजामध्ये देखील आता शेती करण्यामध्ये वर्गभेद व्हायला लागलेला आहे. बागायती शेतकरी वेगळा आणि जिराईत शेतकरी वेगळा असा प्रकार दिसत आहे. जिराईत शेतकऱ्यांसाठी पाण्याची सोयच होत नाही. आपल्या देशाचे एक वेगळे कल्चर आहे, वेगळी अस्मिता आहे. मराठवाडा आणि विदर्भातील लॅन्ड होल्डींग डोळ्यासमोर ठेवून फक्त मोठमोठे प्रकल्प करून काय होणार आहे ? दोन ते पाच टक्के लॅन्ड होल्डींग असलेल्या शेतकऱ्यांना आपण प्रचंड श्रीमंत करणार आहात. त्याला प्रचंड पैसे देणार आहोत काय ? 80 ते 90 टक्के शेतकरी हे त्या मेजर डॅमच्या कमांडमध्ये येणार आहेत. मराठवाड्यातीलच उदाहरण द्यायचे झाले तर त्या ठिकाणी 97 लाख हेक्टर जमीन पडिक आहे. त्यापैकी 60 लाख हेक्टर जमीन शेतीयोग्य आहे. बाकीची जमीन लागवडीखाली नाही. त्याची वेगवेगळी कारणे आहेत. काही ठिकाणी फॉरेस्टसाठी, काही ठिकाणी रस्त्यासाठी, काही ठिकाणी धरणासाठी जमीन गेलेली आहे. त्याच्या डिटेल्समध्ये मी जात नाही. पण या 60 लाख हेक्टरपैकी मेजर डॅम मायनर मिडियम प्रोजेक्ट अशी सगळी मिळून 10 लाख हेक्टर जमीन आहे. उरलेल्या 50 लाख हेक्टरमधील 10 लाख हेक्टर शेतकऱ्यांमध्ये वर्गभेद आणि वर्णभेद तयार झालेला आहे. शेतकऱ्यांमध्ये एक प्रकारची अनास्था निर्माण झालेली आहे. पाणी येऊन देखील कल्टीव्हेशन करण्याची माहिती नाही. या चर्चेच्या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, मंत्रालयातील सिंचनाच्या कल्पनेतून आपण बाहेर येऊन कोठे तरी एखाद्या मराठवाड्यातील खेड्यात बसून, प्रामाणिकपणे विचार करावा, तर खऱ्याअर्थाने पर कॅपिटा उत्पन्न वाढेल. मंत्री महोदयांना मला शेवटचा मुद्दा सांगायचा आहे की, हे सगळे कशासाठी करायचे? मराठवाड्यासाठी 3700 कोटी रुपये दिले म्हणून आमचे पोट भरले असे नाही. 3700 कोटी रुपयातून आमचे पर कपिटा उत्पन्न किमान डबल व्हायला पाहिजे. उस्मानाबाद जिल्हयामध्ये 6900 रुपये पर कॅपिटा उत्पन्न आहे. जालना जिल्ह्याचे 7200 रुपये पर कॅपिटा उत्पन्न आहे. म्हणजे दर महा 600 रुपये मिळणाऱ्या उत्पन्नातून माणूस कसा जगेल ? त्यांची किमान दोन मुले आहेत. खरे म्हणजे प्रत्यक्षात काही जणांचे उत्पन्न कमी तर काही जणांचे उत्पन्न जास्त आहे. वर्षाचे सहा 6000 रुपये उत्पन्न धरले तरी तो दरमहा 600 रुपये उत्पन्नामध्ये त्याचे कुटुंब कसा चालविणार ? याची कल्पना केलेली बरी. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या उगीच होत नाहीत. सर्वात जास्त आत्महत्या बीड, नांदेड,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.श्रीकांत जोशी (पुढे सुरू....

परभणी आणि जालना या चार जिल्ह्यात झालेल्या आहेत. या सगळया ठिकाणी आत्महत्याची सेंच्युरी झालेली आहे. आता हळूहळू लातूर आणि बाकीच्या जिल्हयांमध्ये आत्महत्या सुरु झालेल्या आहेत. माझी विनंती आहे की, पर कॅपिटा उत्पन्नाच्या बाबतीत आपल्याला वेस्टर्न कंट्रीजचा माईड सेट घेऊन काम करून चालणार नाही. आपले माईन्ड चेंज व्हायला पाहिजे. मन:स्थिती बदला आणि मराठवाडा फिजिकली डोळ्यासमोर ठेवा. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब विदर्भ-मराठवाड्यामध्ये फिरलेले आहेत, माननीय सदस्य श्री.राठोडही फिरलेले आहेत. आम्हाला फिजिकली सगळे माहीत आहे. लातूर,उस्मानाबादचे पालकमंत्री सन्माननीय सदस्य श्री.थोरात साहेब आहेत, त्यांना याची कल्पना आहे. उस्मानाबाद हा टँकरची मागणी सगळ्यात जास्त असलेला जिल्हा आहे. 400-500 टँकर असल्याशिवय असल्याशिवाय तेथे पाणीच पाजू शकत नाही. तेथील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता असे लक्षात येईल की, त्या ठिकाणी वेगळा प्लॅन करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्यांनी 21 टीएमसीचा विषय मांडला तो विषय मीही चांगल्या प्रकारे मांडू शकतो. 670 फूट पाणी उचलायचे आहे. 670 फूट वर पाणी उचलून 150 कि.मीपर्यन्त न्यायचे. त्याची कॉस्ट काय आहे, ते फिजिबल आहे की नाही, त्यासाठी पैसे केव्हा मिळणार आहे, खरच प्रकल्प होणार आहे की नाही ? पैसे आल्यानंतर त्याचे काय होणार आहे याच्या खोलामध्ये मला जायचे नाही. कृष्णा खोऱ्याच्या 21 टीएमसी पाण्याचा प्रश्न आहे. तो प्रकल्प इकडून तिकडे जातो आणि तिकडून इकडे येतो. म्हणून याचा भौगोलिक परिस्थिती पाहून एकदा सायंटिफिक विचार करून समजावून सांगा की, मराठवाड्यात 7 लाखावरून 12 लाख हेक्टरपर्यन्त जायचे आहे. मायनर इरिगेशनमध्ये किमान 3 ते 4 लाख हेक्टरपर्यन्त जायचे आहे. तिसरा मुद्दा असा की, त्या ठिकाणी फक्त वॉटर स्टोरेज नको. पुढच्या काळामध्ये बॅकलॉग दूर करण्यासाठी आपणास पूर्ण कमांड एरिया हा 100 टक्के ड्रीप, स्प्रींकल, सूक्ष्म इरिगेशनवर आणावयाचे आहे. तरच मराठवाडयातील लोक जगू शकतात आणि मराठवाडा जगाच्या स्पर्धेमध्ये उतरू शकतो नाही तर उतरू शकत नाही. म्हणून आपण एक पायलट प्रोजेक्ट करावा. मराठवाड्यामध्ये एकही मायनर, मेजर प्रोजेक्ट करू शकत नाही. रेटेड कपॅसिटीने पाणी सोडू शकतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

ते पाणी रोपाच्या मुळापर्यंत पोहोचले असे एकही उदाहरण देता येत नाही. आता जागतिक बँकेने जल सुधार प्रकल्प आणलेला आहे. त्यामध्ये काही प्रकल्प घेतलेले आहेत. त्यामध्ये आपले थोडेसे पैसे घालावेत एक प्रकल्प मॉडेल प्रकल्प म्हणून दाखवा. या प्रकल्पातून इंच न इंच पाणी वापरुन 100 टक्के डिपेंडिबिलीचा प्रकल्प आहे हे दाखवून द्यावे. मराठवाड्यात एलदरी, पूर्णा, अजंता हे चांगले प्रकल्प आहेत आणि हे प्रकल्प 100 टक्के पाण्याने भरतात. तुम्ही एक चांगला प्रकल्प करा. मी एक शेवटची सूचना करतो. आपण पाण्याच्या बदल्यात पैसे घेऊ नका. ते बंद करा. शेतकऱ्यांकडे त्याचे प्रॉफीट शेअर करण्यास शिका. त्यांच्याशी बंधुभावाने वागा. औरंगाबाद विभागाची रिकव्हरी 32 कोटी रुपये झाली. अधीक्षक अभियंता यांनी सांगितले की, या वर्षी 2 कोटी रुपये जास्त रिकव्हरी केली. या वर्षी आमची रिकव्हरी जोरात आहे. मी विचारले की, शेतकरी आत्महत्या करीत आहेत, विजेचा पुरवठा होत नाही म्हणून शेतकरी दगड मारतात, अशा परिस्थितीमध्ये शेतकरी एवढे पैसे देतात काय ? त्याबाबत ते असे म्हणाले की, एमआयडीसी, सरकारी अधिकारी, कॉर्पोरेशन यांच्याकडून दाबून रिकव्हरी केली. त्यामुळे रिकव्हरी वाढली. मी त्यांना विचारले की, शेतकऱ्यांकडून किती रिकव्हरी झाली ? त्यांनी सांगितले की, आम्ही चार पाच गावांमध्ये शेतकऱ्यांकडे गेलो तेव्हा त्यांनी दगड मारले म्हणून परत शेतकऱ्यांकडे गेलो नाही. शेतकऱ्यांची पैसे देण्याची परिस्थिती नाही. त्यांच्यापर्यंत पाणी पोहोचत नाही. आज पाणी दिले की, उद्या पैसे मिळतील हे विसरुन जावे. आमच्या तीन पिढ्यात कोणी शेती केली नाही. आमच्या आजोबांची शेती होती. त्यांना तलाठ्याने हुसकावून लावले आणि शेती ताब्यात घेतली. तेव्हापासून आम्ही शिक्षकाचे काम करीत आहोत. मी इंजिनियर म्हणून शास्त्रीय पध्दतीने विचार केला. एक तर शेतकरी नुकसानीत असताना, त्यांच्यापर्यंत पाणी पोहोचत नसताना ते शासनाला पाण्याचे पैसे कसे देतील ? ते स्वत: उद्ध्वस्त झालेले असताना पैसे कसे देतील ? मी शेतकऱ्यांना विचारले की, तुम्ही पाणीपट्टी दिली नाही तर तर ही सिस्टीम कशी चालेल ? ते म्हणाले की, तुम्ही आम्हाला पाणी द्या आणि पाण्याच्या बदल्यात अन्नधान्य घ्या. त्या शेतकऱ्यांना कापूस विकण्याच्या बाबतीत ज्ञान नाही. ऊस पिकविणारे शेतकरी नुकसानीत गेले. त्यामुळे ते पागल झाले. ते आत्महत्या करीत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. श्रीकांत जोशी ......

आहेत. 25 लाख टन ऊसाची माती झाली. मक्याच्या बाबतीत सुध्दा अशीच परिस्थिती झाली. 200 रुपये टन या भावाने मका विकला. त्यांना विकण्याची टेक्नॉलॉजी माहीत नाही. आपण गोदावरी महामंडळ स्थापन केले. राज्य सरकारने अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्प आणले. ते महामंडळ आपण चालू ठेवले त्याबद्दल धन्यवाद देतो. ही सगळी महामंडळे बद करावीत असे माननीय मंत्रिमहोदय श्री. जयंत पाटील यांच्या मनात आले होते. या कॉर्पोरेशनमध्ये परफॉर्मन्स ऑडीट असते. किती पाणी दिले याचा हिशेब ठेवला जातो. शेतकऱ्यांकडून पाण्याच्या बदल्यात अन्नधान्य घ्यावे. ॲग्रीकल्चर आऊटपूटचे 3 ते 4 टक्के शेअर घ्यावे. आपल्याकडे 10 लाख हेक्टर क्षेत्रापैकी 5 लाख हेक्टर क्षेत्रावर कॉटन आहे. त्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था केली तर एकरी एक क्विंटल कापूस आपल्याला देण्यास शेतकरी तयार आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, पाण्याच्या पाच पाळ्या मिळाव्यात. तसे केले तर ज्या ठिकाणी 10 क्विंटलपर्यंत उत्पादन होते त्यापैकी 3 ते 4 क्विंटल देतील. मी स्वत: जिनिंग केले आहे. तुम्ही यू.एस.ए., ऑस्ट्रेलिया, चायना या देशाबरोबर स्पर्धा करण्याचा प्रयत्न का करीत नाही ? शेतकऱ्यांनी सांगितले की, तुम्ही आम्हाला पाणी द्या. तुम्ही 10 टक्के शेअर घ्या. 5 लाख हेक्टरमध्ये नीट पाणी दिले तर तेथील कॉटनचे उत्पादन वाढून ते 15 लाख क्विंटलवरुन 50 लाख क्विंटलपर्यंत जाईल. त्यामुळे मराठवाडयाच्या ॲग्रिकल्चरच्या जी.डी.पी. मध्ये 8 ते 10 पट वाढ होईल. त्या ठिकाणी 5 टक्के म्हणजे अडीच लाख क्विंटल कापूस शासनाला मिळेल. आपण शेतकऱ्यांना पैसे मागू नका. या गोदावरी महामंडळाचे कमोडिटी एक्स्चेंजमध्ये रुपांतर करा. जे पाणी द्याल त्याचे बिल शुगर बॉण्ड, कॉटन बॉण्ड, सोयाबीन, मका या स्वरुपात मिळेल. ज्यावेळी याचे मार्केटिंग करण्यासाठी जगाच्या आपण मार्केटमध्ये जाल तेव्हा गोदावरी महामंडळ 1 लाख कोटी रुपयांचे मालक होईल.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी..)

Have a big and broad vision. मराठवाड्यातील शेतकरी हे प्रचंड कष्ट करतात, प्रचंड मेहनत करतात. त्यांना वेळेवर पाणी दिले तर ते सगळया गोष्टी करायला तयार आहेत. फक्त मार्केटिंगचे काम त्याला देऊ नका. पुढच्या काळात मराठवाड्यातील शेतकरी मार्केटिंगसुध्दा करायला तयार होईल. परंतु पहिल्यांदा त्याला सिंचनासाठी पाणी द्या. त्याच्याकडे ॲग्रिकल्चर आऊट पूटवर 3 ते 5 टक्के रॉयल्टी मागा. तो ती आनंदाने देईल. आजपर्यन्त विकासाच्या दृष्टीकोनातून प्रामाणिकपणे काम करणारा माणूस मराठवाड्याला लाभला नाही. आज काळया मातीशी इमान राखणा-या माणसाची मराठवाड्याला गरज आहे. मी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, त्यांनी या मुंबईच्या मायाजालातून बाहेर पडून काळया मातीमध्ये यावे आणि आमचे प्रोजेक्ट पहावेत, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील सिंचनाच्या वाढत असलेल्या अनुशेषा संबंधीची अत्यंत महत्वाची अशी चर्चा या सदनामध्ये घडवून आणण्यास आपण मान्यता दिली त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी सर्व आकडेवारी देऊन मराठवाडा आणि विदर्भ या मागासलेल्या भागातील सिंचनाचा अनुशेष कसा दूर करता येईल हे प्रभावीपणे या ठिकाणी सांगितलेले आहे. त्याबद्दल मी त्यांनाही धन्यवाद देतो. या मागासलेल्या भागातील राज्यमंत्री महोदय डॉ. सुनील देशमुख यांना हे माहीत आहे की या महाराष्ट्रामध्ये अनेक भाग मागासलेले असून त्यामध्ये सर्वात मागासलेला भाग हा अमरावती विभाग आहे. हा अमरावती भाग सिंचन आणि विकासाच्या बाबतीत मागासलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे विदर्भाचे संपर्क प्रमुख असल्यामुळे विदर्भामध्ये त्यांचे अनेक दिवस वास्तव्य असते. त्यामुळे विदर्भाच्या मागासलेपणाची त्यांना संपूर्ण माहिती आहे. सभापती महोदय, अमरावती विभागाचा जो संपूर्ण भाग आहे त्या बाबतीत पूर्वी "व-हाड म्हणजे सोन्याची कु-हाड" असे म्हटले जात होते. परंतु आज स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर राज्यामध्ये अमरावती भाग हा विकासाच्या आणि सिंचनाच्यादृष्टीने अतिशय मागासलेला राहिलेला आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी सिंचनाच्या बाबतीत विकास झालेला आहे त्याची प्रामुख्याने कोणकोणती कारणे आहेत ते मी या निमित्ताने आपणा पुढे ठेवतो. आज मोठ्या प्रकल्पांबरोबर लहान आणि मध्यम प्रकल्पांच्या बाबतीतही फार मोठा अन्याय झालेला आपण पहातो. मोठ्या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध होत नाही अशी आणि इतर अनेक कारणे दिली जातात. अनेक लहान मोठे प्रकल्प केन्द्र शासनाकडून क्लिअर झालेले नाहीत. झुडपी जंगलामुळे अनेक प्रकल्प रखडलेले आहेत. जे प्रकल्प अस्तित्वात येणार आहेत

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे..........

त्यासाठी केंद्र शासनाने मान्यता दिली, परंतु राज्य शासनाकडून त्याची अंमलबजावणी व्हावयास पाहिजे होती, ती अंमलबजावणी झालेली नाही. इतर प्रगत भागांमध्ये असणाऱ्या प्रकल्पांच्या दृष्टीने विदर्भात असणारे प्रकल्प यामध्ये फार मोठया प्रकारची तफावत दिसून येते. त्यासाठी निधी उपलब्ध केला जात नाही. इतकेच नव्हे तर राज्यपाल महोदयांचे जे निदेश आहेत त्या निदेशांची पायमल्ली केली जाऊन विदर्भावर सिंचनाच्या दृष्टीने सातत्याने अन्याय केला जातो. सन्माननीय वित्त राज्यमंत्री याठिकाणी बसले आहेत. त्यांना अनेकवेळा संबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घ्यावी लागली. त्या बैठकीमध्ये त्यांनी विदर्भातील सिंचनाच्या दृष्टीने जो सर्वात मागासलेला भाग आहे त्या भागाला न्याय द्यावा म्हणून शासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परंतु ज्या दृतगतीने हे मागासलेपण वाढत आहे त्यावरुन शासनाचा विदर्भाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नजरेस येत आहे. याठिकाणी दांडेकर समितीचा उल्लेख झाला. दांडेकर समितीचा अहवाल येऊन 20 ते 25 वर्षे झ ााली. परंतु या समितीच्या निर्मितीनंतरही विदर्भातील जनतेची अशी भावना निर्माण झाली की, या समितीने जो सिंचनाचा अनुशेष निदर्शनास आणला होता, तो अनुशेष भरला गेला नाही. उलट दांडेकर समितीच्या अहवालाचा अभ्यास केला तर या सिंचन अनुशेषामध्ये सातत्याने आणखी वाढच होत आहे, दुप्पटीने वाढ होत आहे असे दिसून येईल. सिंचनाच्या दृष्टीने जो न्याय विदर्भाला मिळणे अपेक्षित होते, तो न्याय आजपर्यंत मिळू शकला नाही. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये जे मोठे व छोटे सिंचन प्रकल्प आहेत त्या संदर्भात अन्याय केला जातो. त्याचे खरे कारण म्हणजे शासनाचे नियम, मापदंड, यार्डस्टीक हेच आहेत. मापदंडामुळे ज्या ज्या भागामध्ये प्रकल्प व्हावयास पाहिजे, ते त्या भागामध्ये होऊ शकत नाहीत. म्हणून माझी शासनाकडे खास मागणी आहे की, विदर्भ आणि मराठवाड्यातील जे मागासलेले भाग आहेत त्या भागांकरिता कोणत्याही प्रकारचे मापदंड, यार्डस्टीक, नियम बाजूला ठेवून या मागासलेल्या भागांमध्ये सिंचन प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने, मान्यता मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाला पाहिजे. आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जे प्रकल्प प्रगतीपथावर आहेत, ज्या प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे, त्यामध्ये विदर्भातील अनेक प्रकल्प आहेत. सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी सांगितले की, मी लहानपणापासून पहात आलो आहे, परंतु अजूनही प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत. आज त्यांचे वय 62 वर्षाचे आहे. जे प्रकल्प 100 कोटी रुपयांचे होते त्यांची किंमत 1000 कोटी रुपयांवर जाऊन पोहोचली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे..........

म्हणूनच ज्या ज्या भागामध्ये प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे त्याकरिता जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा आणि कालमर्यादा ठरवून दिली जावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी सांगितले ते ऐकून मला वाईट वाटले. ते म्हणाले की, आळशीपणामुळेही आमचे प्रकल्प रखडले आहेत. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, सिंचनाच्या संदर्भात जेवढी तीव्रता, जेवढी नाराजी विदर्भाच्या लोकांमध्ये होती, ती लक्षात घेऊन दांडेकर समिती निर्माण करण्याकरिता............

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे....

सर्वात प्रथम त्या काळात कोणी पुढाकार घेतला असेल तर तो विदर्भातील नेत्यांनीच घेतला होता. आजही अनुशेषाच्या संदर्भात आवाज उठवण्याचे काम असो, सिंचनाच्या बॅकलॉग असो तो पूर्ण झ ाला पाहिजे या करिता वेळोवेळी विदर्भाचे लोकप्रतिनिधी एकत्र येत असतात. परंतु दुर्दैवाने जे निर्णय शासनाकडून व्हावयास पाहिजे, जो निधी उपलब्ध व्हावयास पाहिजे तो होत नाही त्यासाठी शासनाने मार्ग शोधून प्रकल्प पूर्ण कसे होतील हे पाहिले पाहिजे. जे मागसलेले भाग आहेत त्या ठिकाणचे जे लोकप्रतिनिधी आहेत त्या ठिकाणच्या सर्व पक्षाच्या लोकप्रतिनधींना एकत्र आणून लहान मोठया प्रकल्पांचे सर्व्हेक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून एक टास्क फोर्स तयार करण्याच्या संदर्भात निर्णय करावा. जेणेकरुन दरवर्षी या सदनामध्ये प्रकल्पांची काय परिस्थिती आहे, कोणत्या कारणामुळे प्रकल्प रखडलेले आहेत यासंदर्भात ही टास्क फोर्स समिती सदनासमोर सर्व वस्तुस्थिती आणू शकेल. त्यासाठी अशा प्रकारची एक टास्क फोर्स समिती निर्माण करण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय करावा. म्हणून माझी आपल्याला विनंती राहील की, प्रकल्पाच्या संदर्भात जे प्रचलित मापदंड आहेत ते मापदंड मराठवाडा किंवा मागासलेले जे भाग आहेत, त्या ठिकाणी ज्या लहान-मोठया प्रकल्पांचे काम रखडलेले आहेत अशा प्रकल्पांना मान्यता मिळण्याकरिता आपण मापदंड मागे घ्यावे किंवा मापदंडामध्ये बदल करावा. प्रत्येक 50 कि.मी. मागे इन्फ्रास्ट्रक्चर बदलत असतात. रत्नागिरी ते भंडारा या ठिकाणच्या वेगवेगळया विभागाचे वेगवेगळे इन्फ्रस्ट्रक्चर आहेत. त्यामध्ये असे मापदंड तयार करा की, ज्या प्रकल्पांचे काम रखडलेले आहे त्या प्रकल्पांचे काम लवकरात लवकर पूर्ण होऊ शकेल. त्यामुळे या ठिकाणी मी जो मुद्दा मांडलेला आहे त्यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी त्यासंदर्भात आपल्या उत्तरामध्ये उल्लेख करावा. गेल्या 3 वर्षापासून माझ्या भागातील काही प्रकल्प रखडलेले आहेत. हे प्रकल्प रखडण्याचे कारण म्हणजे प्रकल्पाच्या संदर्भात सध्या जे मापदंड ठरवून दिलेले आहेत त्यामुळे या प्रकल्पांचे काम रखडलेले आहे. डॉ. सुनील देशमुख जेव्हा मंत्री झाले होते तेव्हा मी त्यांच्याकडे माझ्या भागातील 10-12 शेतक-यांना घेऊन गेलो होतो. आमच्या भागातील रखडलेल्या प्रकल्पांचे काम पूर्ण झाले पाहिजे म्हणून त्यांना विनंती केली होती. खास करुन माझ्या भागातील जी.पी. प्रकल्प हा अकोट तालुक्यात आहे त्याचे काम सुरु व्हावे यासाठी वेळोवेळी मी पाठपुरावा देखील केलेला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे....

मापदंड बदलवल्याशिवाय हा प्रकल्प क्लिअर होऊ शकणार नाही. कोल्हापूरी बंधा-याच्या संदर्भात देखील तीच परिस्थिती आहे. तिल्हारी तालुक्यातील दाणापूर येथील प्रकल्पाच्या कामास सुरुवात झ ााली पाहिजे अशी येथील जनतेची मागणी आहे. परंतु हा प्रकल्प सुध्दा, सध्याच्या मापदंडामुळे क्लिअर होऊ शकत नाही अशी वस्तुस्थिती आहे. अकोट आणि तेल्हारा या विभागात 9 प्रकल्प 20 वर्षापासून सजेस केलेले आहेत. त्यातील फक्त 1-2 प्रकल्पांनाच मान्यता मिळालेली आहे. बाकीचे 7-8 प्रकल्प अजून तसेच रखडलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे........

सभापती महोदय, सातपुडा पर्वतातून पाणी वाहून जाते ते रोखून त्याचा लाभ शेतकऱ्यांना देणाऱ्या दृष्टीने दीपमाळ आणि मुखमल प्रकल्प होणार होते, परंतु ते प्रकल्प आजपर्यंत पूर्ण झालेले नाहीत. मागील कित्येक वर्षापासून आम्ही प्रकल्पांसाठी मागणी करीत आहोत, परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

सभापती महोदय, एक-दोन प्रकल्प वगळता विदर्भातील चितपाणी प्रकल्पाला गती मिळाली. अकोला जिल्ह्यातील खीरकुंड हा मोठा प्रकल्प आहे. हा प्रकल्प व्हावा म्हणून तेथील जनता मागील 25 वर्षापासून मागणी करीत आहे. त्या ठिकाणी सर्व्हे सुध्दा झालेला आहे. परंतु अजूनपर्यंत त्याबाबतीत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

सभापती महोदय, पूर्णा नदी विदर्भातून, मराठवाड्यातील काही जिल्ह्यांतून आणि उत्तर महाराष्ट्रातून वाहत जाते. ही एक महत्वाची नदी आहे. त्या नदीवर आजपर्यंत एकही धरण झालेले नाही. या नदीवर मोठे धरण झाले पाहिजे अशाप्रकारची मागणी खारपट्टा भागातील लोक करीत आहेत. मंत्रिमहोदयांचा जिल्हा खारपट्ट्यात येतो. पूर्णा नदीवर धरण बांधावे अशी मागणी झाली त्यावेळी शासनाकडून सांगण्यात आले की, त्या भागातील जमीन काळी-भुसभुशीत असल्यामुळे धरण होऊ शकणार नाही. त्या संदर्भात आम्ही अनेक ठिकाणांहून माहिती गोळा केली. दिल्लीतील अधिकाऱ्यांशी पत्र व्यवहार केला. अमेरिकेतील एक्स्पर्ट बरोबर पत्र व्यवहार केला. त्यांनी आम्हाला सांगितले की, काळी-भूसभूशीत जमिनीवर धरण होऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार आपणासही माहीत आहे की, पूर्णा नदी किती प्रसिध्द आहे. या नदीचा प्रवाह रोखण्याबाबत शासनाची भूमिका उदासीनतेची आहे. तेव्हा शासनाने वेळ पडल्यास प्रकल्पासंबंधीचे नॉर्म्स बदलावेत व प्रकल्प पूर्ण करावेत जेणकरुन त्या- त्या भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी मिळेल.

सभापती महोदय, अमरावती आणि अकोला भागात खारपट्टा असल्यामुळे तेथील शेतकरी शेती करु शकत नाही. त्या भागात एखादा प्रकल्प झाला पाहिजे अशी तेथील लोकांची कित्येक वर्षापासूनची मागणी आहे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे....

परंतु या संदर्भात निर्णय घेण्याच्या बाबतीत शासन नेहमीच उदासीन राहिलेले आहे. त्यामुळे याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे व या 3-4 अति मागासलेल्या जिल्हयातील लोकांना न्याय द्यावा, अशी विनंती मी याप्रसंगी करीत आहे. मी याठिकाणी ज्या सूचना केलेल्या आहेत, त्याकडेही माननीय मंत्री महोदयांनी जास्तीत जास्त लक्ष द्यावे अशी विनंती करुन सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी हा प्रस्ताव आणण्यासाठी जो पुढाकार घेतला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

-----

..2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यातील वाढत्या सिंचनाच्या अनुशेषाचा जो प्रस्ताव याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, खऱ्याअर्थाने सूर्य पूर्वेकडून उगवतो. त्यामुळे पूर्व विदर्भातून गंगा यावयास पाहिजे. परंतु आज पूर्व विदर्भामध्ये पाण्याची अपुरी व्यवस्था आहे. शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पाणी पोहचत नाही. शेतकऱ्यांच्या शेतीसाठी योग्य प्रमाणात पाणीपुरवठा होत नाही. कारण, आज विदर्भातील पाणी प्रकल्प रखडले असून विदर्भ यामध्ये आघाडीवर आहे. पूर्व विदर्भातील मोठे, मध्यम व लघूसिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने भर दिला पाहिजे. आज वन विभागामुळे अनेक प्रकल्प रखडले असून ते लवकरात लवकर क्लिअर केले पाहिजेत. हलबीटोला तलाव, शंकर तलाव, खरकडी तलाव, काशीनाला तलाव आणि निंबा तलाव असे अनेक तलाव या विभागात अडकले आहेत. हे प्रकल्प वन विभागामुळे रखडले असून त्यांची सोडवणूक करुन घ्यावी व ते पूर्ण करावेत. खऱ्याअर्थाने गोंदिया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली हे चार जिल्हे भात उत्पादक जिल्हे आहेत. परंतु पूर्व विदर्भात सिंचनाची व्यवस्था नसल्यामुळे त्याठिकाणी तलावांचे काम होत नाही. याकडे विभागाचे लक्ष नाही वा तलावांची निगराणी व्यवस्थित होत नाही. यावर्षी पाऊस भरपूर पडला. परंतु नंतर एक महिना पाऊस न आल्यामुळे गोंदिया जिल्हयातील गोंदिया, सडक अर्जुनी, आमगांव व सालेकसा या चार तालुक्यांमध्ये 50 टक्क्यांच्या खाली आणेवारी आलेली आहे. याबाबतीत विधानसभा सभागृहामध्ये घोषणा केली गेली. त्यामुळे पूर्व भागातील तलाव व कालव्यांची व्यवस्था व्यवस्थित केल्यास, त्यांची दुरुस्ती केल्यास व त्यामध्ये पाणी साठविण्याची व्यवस्था केल्यास हा प्रश्न सुटू शकेल. कारण, हे 4 ही तालुके तलावांचे आहेत. त्यामुळे या तलांवाना आपण निश्चितपणे न्याय देण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त प्रमाणात निधीची उपलब्धता करुन द्यावी. वन विभागातून जांभळी व दंडारी तलावांची मुक्तता झालेली आहे. परंतु त्यांवर अजून कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. या दोन तलांवाचे काम तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. हे दोन तलाव पूर्ण झाले तर पूर्व विदर्भातील सिंचन फार मोठया प्रमाणात होईल व सातबाहे प्रकल्पातील पुनारीटोला धरणातून पाणी देता येईल. मध्यप्रदेशचा कोटा सोडला तर ..

नंतर कु.गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .........

महाराष्ट्र राज्यास 24300 हेक्टर जमीन उपलब्ध आहे. या प्रकल्पाचे पाणी 24300 हेक्टर जमिनीला कधीही पोहचू शकलेले नाही. असे मला अतिशय खेदाने सांगावे लागत आहे. अनेक अडखळलेल्या प्रकल्पामुळे हे पाणी या जमिनीपर्यंत पोहचू शकत नाही, त्या जमिनीचे सिंचन होऊ शकले नाही. मी वयाच्या 16-17व्या वर्षापासून बधतो आहे की, आमच्या भागात फक्त रबीचे पीक काढले जाते.आमगाव,सालेकासा येथील 9769 हेक्टर, आणि गोंदीया तालुक्यातील 14531 हेक्टर एवढी जमीन सिंचना खाली येते .आमचे दुर्दैव असे आहे की, दर वर्षी आम्ही केवळ रबीच्या पिकांनाच पाणीपुरवठा करु शकतो.खरीप हंगामातील पिकांना पाणी देऊ शकत नाही . या वर्षी केवळ अडीच हजार हेक्टरला पाणी देण्यात आलेले आहे. आमगावला 1250 हेक्टर, सालेकासाला 500 हेक्टर व गोंदीया तालुक्यास 1250 हेक्टर एवढया जमिनीस रबीच्या पिकांस पाणी देण्यात आले आहे. शेतकऱ्याची पाण्याची मागणी जास्त आहे त्यामुळे लोकप्रतिनिधींना दर वर्षी शेतकऱ्यांचे आंदोलन सहन करावे लागत आहे.इटिया डोह प्रकल्पाची समिती आहे त्यामध्ये सर्व आमदार आणि खासदार त्या समितीचे प्रतिनिधी आहेत. आमचे दुर्दैव असे आहे की, आम्ही शेतकऱ्याची मागणी पूर्ण करु शकत नाही.

अध्यक्ष महोदय, गेल्या 30 ते 35 वर्षात शेतसाऱ्याची जी थकबाकी आहे ती गोंदीयामध्ये4 करोड 8 लाख रुपये, आमगाव सालेकासा मिळून 2 करोड 35 लाख रुपये एवढया रकमेची सरकारला देणी बाकी आहेत. मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, गेल्या 30 ते 35 वर्षात पासून शेतकरी हा शेतसारा देऊ शकत नाही कारण त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची आहे. जे शेतकरी हा शेतसारा देऊ शकत होते, त्यांनी तो शेतसारा दिलेला आहे. अन्यथा 30 -35 वर्षापासून किती तरी शेतसारा शिल्लक राहिला असता. शेतसारा माफ केला जात नाही याची मला जाणीव आहे. शेतकऱ्याची हालाखीची परिस्थितीची पाहता हा शिल्लक असलेला शेतसारा माफ करणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मला आणखी एक मुद्दा मांडावयाचा आहे की, हा जो कॅनल आहे त्या कॅनलच्या 400 कि.मी. च्या अंतरामध्ये मेन कॅनल 60 कि.मी. अंतरावर आहे. वितरीका 111 कि.मी. आहे आणि मायनर 223 कि.मी. आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

या परिसरामध्ये पाण्याचा पुरवठा करावा लागतो ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, रखडलेले जे प्रोजेक्टस आहेत , ते पूर्ण झाले तर निश्चितपणे 24 हजार हेक्टरला पाणी पुरवठा करता येऊ शकतो. परंतु तसे होत नाही.

दरवर्षी दोन्ही हंगामात भातीची रोवणी केली जाते. जमिनीचा जो थर आहे, पोत आहे तो कमी होत चालला आहे. रासायनिक खतांच्या माऱ्यामुळे जमिनीचा पोत निकृष्ठ होत आहे. म्हणून मला शासनास विनंती करावयाची आहे की, या संदर्भात आमदार व खासदारांची बैठक बोलवावी व त्या बैठकीमध्ये पिकांना पाणी देण्याचे धोरण निश्चित केले पाहिजे. पिकांना रोटेशन पद्धतीने पाणी दिले पाहिजे. एखादया शेतकऱ्याला अ एकदा पाणी मिळाले की, त्या नंतर 4 ते 5 वर्ष पाणी मिळत नाही अशी दयनीय स्थिती आहे. यामुळे काय सिंचन होणार आहे ? त्यामुळे रोटेशन पद्धतीने पाणी देताना , एका वर्षी गोंदीयाला पाणी दिले तर दुसऱ्या वर्षी आमगाव, सालेकासाला पाणी दिले पाहिजे. यामुळे पाण्याचे जे वेस्टेज होते ते थांबवता येईल. अशा पद्धतीने पाणीपुरवठा केल तर चणा, उडीद ,मूग या सारखी अन्य डाळी व कडधान्याची पिकेही त्या जमिनीवर घेता येतील. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांना मी सांगू इच्छितो की, आमच्या भागात लाखोळीच्या डाळीचे उत्पादन फार मोठया प्रमाणात होते. शेतकऱ्यांना माहीत असेल की, आमगाव सालेकासा भागात रबीच्या पिकाला पाणी नाही. बाकीची पिके घेण्यासाठी अगोदर पासून तयारी करावी लागते. अगोंदर पासून बियाणे पेरावे लागते. प्रत्येकाला असे वाटते की, रबीच्या पिकाला पाणी मिळाले पाहिजे पण शासनाचे नियोजन नसल्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. रोझेकर..

SRR/ KGS/ MHM/ प्रथम कुमारी धनश्री.......... 18:20

श्री.केशवराव मानकर..........

हे नुकसान टाळण्यासाठी निश्चित रुपाने त्यावर कार्यवाही केली पाहिजे. आमगाव, सालेकसा येथील प्रकल्पांचे निधी निर्धारण केले पाहिजे. सद्य:स्थितीतील निर्णय मान्य नाहीत, अशा प्रकारची चर्चा समितीच्या बैठकीत झालेली आहे.

सभापती महोदय, भंडारा जिल्हयात सोंडयाटोला आणि बावनथडी प्रकल्प आहेत. या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांची बैठक झाली. आंदोलन करीत असल्यामुळे बैठक घेतली. या प्रकल्पांच्या कामाची वाटचाल अत्यंत संथ गतीने सुरु आहे. हे दोन्ही प्रकल्प सुरु करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या दोन राज्यांनी मिळून हे प्रकल्प सुरु केले आहेत. प्रत्यक्षात या प्रकल्पाचे काम सुरु होण्यासाठी अजून दोन वर्ष लागणार आहेत. या प्रकल्पांना निधीची उपलब्धता करुन दिली तर भंडारा जिल्हयातील अनेक भागामध्ये सिंचनाची सोय उपलब्ध होऊ शकते. अत्यंत खेदाने सांगावेसे वाटते की, मी यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. परंतु, तो अतारांकित झाला. ख-या अर्थाने या प्रश्नावर सभागृहात चर्चा व्हावयास हवी होती. माझा एकही प्रश्न आतापर्यन्त पहिल्या 10 क्रमांकात लागलेला नाही.

सभापती महोदय, पुराडा उपसा जलसिंचन योजना आहे. ही योजना पूर्ण झाली आहे. आता यामधून शेतक-यांना पाणी देण्याची गरज आहे. विद्युत विभागाच्या धोरणामुळे विद्युत कनेक्शन न दिल्यामुळे 600 ते 700 हेक्टरमध्ये असलेले शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले आहेत. मंत्री महोदयांना विनंती आहे की, या उपसा सिंचन योजनेला ताबडतोब विद्युत कनेक्शन देऊन न्याय द्यावा व ही योजना पूर्णत्वास आणावी.

सभापती महोदय, आसोली तलावाच्या प्रकल्पाला अडथळा आला आहे. काय असे कारण आहे की, हा प्रकल्प सुरु होत नाही ? या ठिकाणी सिंचनाचा मोठा प्रश्न आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्याची विनंती मी या निमित्ताने करतो. आसोली प्रकल्प तातडीने सुरु केला तर जवळ जवळ 2 हजार हेक्टर जमिनीला पाण्याची उपलब्धता होणार आहे.

सभापती महोदय, तेलंगखेडी, गोरेगाव तालुक्यातील सिंचन प्रकल्प पूर्ण झालेला नाही. या प्रकल्पासाठी फार मोठया निधीची आवश्यकता आहे. हा मोठा प्रकल्प आहे त्यामुळे या संपूर्ण जिल्हयामध्ये मोठी सिंचन क्षमता निर्माण होऊ शकते. ही योजना शेतक-यांसाठी वरदान ठरु शकते. परंतु, शासनाचे धोरण कचखाऊ आहे, असे म्हणता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2.........

श्री.केशवराव मानकर.........

सभापती महोदय, बजेटमध्ये एवढया मोठया योजना केलेल्या आहेत. त्या योजनांचा पुरेपुर लाभ होण्यासाठी पूर्व विदर्भाला अधिक निधी द्यावा, अशी मी शासनाला विनंती करतो. या ठिकाणी मला अजून भरपूर बोलावयाचे होते. पण मला अत्यंत आवश्यक कामासाठी जायचे असल्यामुळे मला अगोदर बोलण्याची संधी द्यावी, अशी विनंती मी माननीय सभापती महोदयांना केली होती. मला अगोदर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो. सभापती महोदय, मराठवाडयाचा मुद्दाम मी उल्लेख यासाठी केला नाही कारण, सन्माननीय सदस्य, श्री.श्रीकांत जोशी व सन्माननीय सदस्य, श्री.धोंडिराम राठोड यांनी सविस्तर चर्चा केली आहे. मराठवाडयातील आणि विदर्भातील अनुशेष येत्या दोन-तीन वर्षात कसा पूर्ण होईल, याची शासनाने दक्षता घ्यावी, अशी मी शासनाला आणि मंत्री महोदयांना आपल्यामार्फत विनंती करतो. मी माझ्या भाषणात उल्लेख केलेल्या मुद्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा व गोंदिया जिल्हयातील सिंचनाचे प्रश्न रोटेशन पद्धतीने सोडवावेत, एवढी विनंती करतो आणि माझ्या शब्दांना विराम देतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

-------------

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहातील कामकाजाबाबत</u>**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 97 च्या चर्चेला किती वेळ असतो. ही चर्चा सोमवारी पुढे सुरु करावी.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : सोमवार, दिनांक 16 एप्रिल 2007 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.30 पर्यन्त विशेष बैठक आपण घेणार आहोत.

यानंतर कुमारी जयश्री.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.रामनाथ मोते )** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी भाषण सुरु करावे.

श्रीमती उषाताई दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी सभागृहाचा फार वेळ घेणार नाही तर मी माझे मुद्दे अतिशय थोडक्यात आवरते घेणार आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, यानंतरचे जे आमचे अशासकीय ठराव आहेत, तेही आपण आजच घ्यावेत म्हणजे पाच ते दहा मिनिटातच संपतील.

**तालिका सभापती** : ठीक आहे, परंतु सध्या प्रस्तावावर जी चर्चा सुरु आहे, ती संपल्याशिवाय आपले अशासकीय ठराव घेता येणार नाहीत.  सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात सिंचनाचा वाढत असलेला अनुशेष.
**मु.शी.**: राज्यात सिंचनाचा वाढत असलेला अनुशेष, या विषयावर
सर्वश्री.धोंडीराम राठोड,सुधाकर गणगणे,वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु.......)

श्रीमती. उषाताई दराडे : सभापती महोदय, त्र्यंबकेश्वर ते बंगालच्या उपसागरापर्यंत सुमारे 1465 किलोमीटरचा प्रवास करीत जाणारी गोदावरी नदी, या नदीवरच मराठवाडयाचे संपूर्ण भवितव्य अवलंबून आहे, तसेच संपूर्ण महाराष्ट्राचे 49 टक्के सिंचन या गोदावरी नदीवरच अवलंबून आहे. मराठवाडयातील पैठण धरणापर्यंत पाणी येण्यासाठी कुठेतरी पाणी अडविले पाहिजे. पैठण धरणाची कॅपॅसिटी 30 हजार दशलक्ष घनफुट पाणी पाठविण्याइतकी आहे व तेवढे पैठणच्या धरणापर्यंत हे पाणी येत नाही कारण कुठेतरी नाशिक व नगरमध्ये हे पाणी अडविले जाते. पैठणच्या धरणामध्ये जास्त पाणी न आल्यामुळे जेवढे सिंचन व्हावयाला पाहिजे होते तेवढे झालेले नाही व होत नाही. या वर्षी अतिवृष्टी झाली आणि म्हणून धरण पूर्ण भरले व महापूराचा धोका निर्माण झाला, परंतु हा अपघाताचा व आपत्तीचा भाग झाला. अतिवृष्टीमुळे धरणाच्या पाण्यामध्ये जी इररेग्यूलॅरिटी निर्माण झालेली आहे, त्याचेही नियोजन होणे गरजेचे होते, त्यामुळे अनेक भानगडी निर्माण झाल्या त्या वेगळयाच. पैठण धरणासाठी जे पाणी साठविले जाते त्या साठयामध्ये वाढ करुन ते पाणी गोदावरी खो-याकडे वळविता आले तर बरे होईल हा एक महत्वाचा मुद्दा या चर्चेच्या निमित्ताने मी या राज्यासमोर ठेवणार आहे. मराठवाडा हा मोस्टली मान्सूनच्या पावसावर विसंबून राहणारा भाग आहे. महत्वाची बाब ही आहे की, पैठण धरणापर्यंत हे पाणी येण्यासाठी जे पाणी वर साठविले होते त्या साठयामध्ये वाढ करण्यासाठी काही निधी आपल्याला गोदावरीकडे वळविता येईल का ? काही नदया पश्चिमेकडे वाहतात आणि काही नद्या पूर्वेकडे वाहतात. काही या नद्यांचे समुद्राकडे वाहून जाणारे पाणी व पश्चिमेकडे वाहणा-या नद्यांचे पाणी जर पूर्वेकडे वळविता आले किंवा मराठवाडयापर्यंत पोहोचविता आले तर तसे आज ख-या अर्थाने त्याची आवश्यकता आहे. हा जरी मोठया खर्चाचा प्रश्न असला तरी देखील मराठवाडयाचा मानव विकास निर्देशांक वाढवावयाचा असेल तर हा खर्च करावाच लागेल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकररावजी रावते आपले ज्ञान मराठवाडयाच्या विकासासंबंधी माझ्यापेक्षा नक्कीच जास्त आहे. आपण मघाशी असे सांगितले की, कोयनेचे पाणीदेखील मराठवाडयाकडे टयुनेल दोन ठिकाणी करुन गोदावरीत वळविता येईल. माझेही असेच मत आहे की, कोयनेचे पाणी जे आहे ते आपल्याला मराठवाडयाकडे वळविता येणे शक्य आहे परंतु त्याकरिता प्रबळ अशी राजकीय इच्छाशक्ती असणे अत्यंत आवश्यक आहे आणि हे

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सौ. उषाताई दराडे .....

करीत असतांना करोडो रुपयांचा निधी हा मराठवाडयातील सामान्य माणसाच्या सर्वांगीण विकासापेक्षा फार मोठा कधीच असणार नाही. ज्यावेळी एखादी नैसर्गिक आपत्ती येते, त्यावेळी आपण करोडो रुपयांचा निधी केंद्राकडून व जागतिक पातळीवर आवाहन करुन मागवितो, मग हा सुध्दा तसाच करोडो रुपयाचा महत्वाचा प्रकल्प समजून शासनाने याकरिता निधी पुरवावा, अशी मी या निमित्ताने विनंती करते. मघाशी मी म्हणाले की, वैतरणा नदीचे पाणीदेखील वळविता येईल जर त्या नदीवर एक किलोमीटरचा बांध घालता आला तर हे पाणी आपल्याला मराठवाडयाकडे वळविता येईल. या विषयाचे अधिक ज्ञान मला नाही पण त्यामुळे मराठवाडयाचा फार मोठया प्रमाणात फायदा होईल हे मात्र नक्की. अशाच प्रकारे कोयनेचे पाणी वळविता येईल का याचा विचार करावा. गोदावरी खो-यामध्ये जे पाणी आम्हाला कमी मिळते ते जास्त मिळविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याला प्रयत्न करता येतील. गोदावरी नदीचे पाणी जर अडविता आले तर गोदावरी खो-यामध्ये जे पाणी कमी मिळते ते पाणी फार मोठया प्रमाणामध्ये वळविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. गोदावरी खो-यामधील 10 वर्षापूर्वीची परिस्थिती अशी होती की, जेथे 115 टी.एम.सी.पाणी अडवायला पाहिजे होते त्या ठिकाणी नाशिक आणि नगरकरिता 180 टी.एम.सी.पाणी अडविण्यात येत होते तर मग त्यावेळी किती पाणी आमच्या वाटयाला येत असेल, याचा विचार आपण केलेला बरा. खर्चाच्या तरतुदीबाबत म्हणाल तर आम्हाला तुम्ही लार्ज प्रकल्प देता, मध्यम प्रकल्प देता आणि त्याला पुरेसा निधी मात्र पुरवत नाहीत आणि दुसरीकडे तेथील शेतक-यांवर एम.आय.टॅक्स मात्र लावण्यात येतो. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो तर अतिशय महत्वाचा असा मुद्दा आहे तो असा की, आपण आपल्या हक्काचे पाणी मागतो तेव्हा शासन नवीन प्रकल्प घेण्याची घोषणा करते. अगोदरच अस्तित्वात असलेल्या प्रकल्पाची उंची वाढविण्यासाठी आग्रह धरतो. त्याचा अपेक्षित खर्च आहे 6,300 कोटी रुपये आणि त्याकरिता एका वर्षामध्ये कधी कधी फक्त 90 कोटी रुपये खर्च केलेले जातात, अशी परिस्थिती आहे. या प्रकल्पाकरिता अजून आम्हाला किमान 2,975 कोटी रुपये देणे आवश्यक होते परंतु आजपर्यंत सरकारकडून वेळेवर निधी प्राप्त न झाल्यामुळे या प्रकल्पाचा खर्च पाच ते सहा पटींनी वाढलेला आहे. तसेच हा खर्च वेळेवर न दिल्यामुळे महागाईमुळे या प्रकल्पांची किंमत आजच्या परिस्थितीत पाच ते सहा पटींनी वाढलेली आहे.

यानंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .........

शासन या प्रकल्पांवर कोटयावधी रुपये खर्च करते. सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी मराठवाडयातील सिंचनाच्या अनुशेषाबाबत प्रस्ताव मांडलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड यांनी अतिशय चांगले मुद्दे मांडलेले आहेत. शासन आम्हाला पाणी देण्याची भाषा करते. प्रकल्पांसाठी निधी देण्याची भाषा करते. परंतु देत असतांना त्यामध्ये दिरंगाई करणे, प्रकल्पांसाठी निधी वेळेवर न देणे, प्रकल्प वेळेवर पूर्ण न होणे, अर्धवट प्रकल्पांसाठी वेळेवर तरतूद न करणे या सर्व गोष्टींचा परिणाम मराठवाडयाच्या सिंचन क्षमतेवर होत आहे. तापी खो-याच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, तापी खो-यातून आम्हाला 6.88 अब्ज घनफूट पाणी मिळावयास पाहिजे. तापी खो-यामध्ये 222 अब्ज घनफूट पाणी उपलब्ध असतांना आम्हाला 2.82 अब्ज घनफूट पाणी देण्याची तयारी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये दाखविण्यात आली होती. आम्हाला फक्त 2.82 अब्ज घनफूट पाणी देण्याचा प्रयत्न केला जातो. आम्हाला तापी खो-यातून पाणी देण्याची दानत दाखविली जाते. परंतु ते पाणी जळगाव येथे अडविले जाते. तापी खो-यातून आम्हाला 6.85 अब्ज घनफूट पाणी मिळावयास पाहिजे. तापी खो-यातील 6.85 अब्ज घनफूट पाण्यावर आमचा अधिकार आहे. मराठवाडयाचा 8.62 भाग कृष्णा खो-यामध्ये आणि गोदावरी खो-यामध्ये येतो. त्या प्रमाणात मराठवाडयाला पाणी द्यावयाचे असेल तर 50 अब्ज घनफूट पाणी मिळाले पाहिजे. परंतु मराठवाडयाला फक्त 21 अब्ज घनफूट पाणी देण्याची तयारी दाखविली जाते. कृष्णा खो-यातील आणि गोदावरी खो-यातील प्रकल्पांमुळे मराठवाडयातील 1,02,360 हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असेल तर शासन हे प्रकल्प का लवकर पूर्ण करीत नाही ? कृष्णा खो-यातील प्रकल्पांचे काम मागच्या 10 वर्षापासून सुरु आहे. शासन कृष्णा खो-यातील प्रकल्पांवर करोडो रुपये खर्च करते. कृष्णा खो-यातील प्रकल्पांवर शासन पैसे खर्च करते, त्यासाठी मी शासनाचे अभिनंदन करते. परंतु मराठवाडयाला न्याय द्यावयाचा असेल तर मराठवाडयातील प्रकल्पांना जास्तीत जास्त गती देण्याची आवश्यकता आहे. मराठवाडयातील 1,02,360 हेक्टर जमीन कृष्णा खो-यातील प्रकल्प पूर्ण होण्याची वाट बघत आहे. धरणातील पाणी वाहून जात असल्यामुळे जवळ जवळ 1 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येत नाही. मराठवाडयातील 2 ते 3 लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाचे प्रकल्प पूर्ण होण्याची वाट बघत आहेत. सिंचनाचे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी एवढा वेळ लागणार

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .........

असेल तर आपण मराठवाडयातील सिंचनाचा अनुशेष कसा दूर करणार आहात ? याविषयी माझ्या मनामध्ये शंका आहे. खरे म्हणजे जल तज्ज्ञांनी किंवा त्यांच्या समित्यांनी दिलेल्या निदेशाचे शासनाने पालन केलेच पाहिजे, याबद्दल कोणाच्याही मनामध्ये संशय असण्याचे काही कारण नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, माननीय राज्यपाल महोदय निदेश देतात. आपण त्यांच्या निदेशाचे स्वागत करतो. जल आयोगाच्या निदेशाचे देखील आपण स्वागत करतो. मराठवाडयाला पाणी देण्याची भाषा केली जाते. मराठवाडयातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पैसे दिले जातात. परंतु त्यामुळे आमची तहान भागत नाही. पाणी दिसते परंतु मिळत नाही आणि जे पाणी आहे त्याचे नियोजन नाही. कृष्णा खो-यातील पाणी शासन आम्हाला देणार नाही. तापी खो-यातील पाणी तुम्ही अडविणार, गोदावरी खोऱ्यातील पाणी तुम्ही वरती चढविणार आणि आम्हाला देतो देतो म्हणून सांगणार. जे पाणी आमच्या मराठवाडयामध्ये आहे, आमच्या जिल्हयामध्ये आहे, ते पाणी देखील आम्हाला नीट वापरता येत नाही, अशी परिस्थिती आहे. मघाशी जलसंधारणाच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित करण्यात आला तो अतिशय सिरीअसली घेण्यासारखा आहे. माझ्या बीड जिल्हयातील 300 पाझर तलावांपैकी कितीतरी पाझर तलावर असे आहेत की, त्यामध्ये पाणी साचत नाही. अनेक मायनर इरिगेशन तलाव असे आहेत की, त्यामध्ये पाणी साठत नाही. काही ठिकाणी कॅनॉल व्यवस्थित नाहीत. कॅनॉल फोडून पाण्याची चोरी केली जाते, अशाप्रकारची परिस्थिती आहे. अरुणवाडीच्या तलावाला मंजुरी मिळालेली आहे. त्यासाठी निधीची तरतूद केलेली आहे. परंतु अद्याप काम सुरु झालेले नाही. शासन प्रकल्पांसाठी निधी देत नाही, असे मी म्हणणार नाही. परंतु निधी देत असतांना त्यामध्ये समन्वय असावयास पाहिजे. जलसंधारण विभाग असेल, जिल्हापरिषदा असतील, गोदावरी महामंडळ असेल, तापी खोरे महामंडळ असेल या सर्वांमध्ये समन्वय असावयास पाहिजे आणि शेवटी माणसाचा विकास असा शेवट असावयास पाहिजे. आम्हाला किती निधी दिला याची आकडेवारी आम्हाला नको आहे. आम्हाला विकास पाहिजे आहे. तो शासन कसा करणार ? गोदावरी खो-यातील पाणी आंध्र प्रदेशला वाहून जाते. चंद्रपूरचे पाणी आंध्र प्रदेशला वाहून जाते. वैतरणेचे, कोयनेचे पाणी समुद्रामध्ये वाहून जाते.

(यानंतर श्री.गागरे ........

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .....

ते वाहून जाणारे पाणी कसेही करुन अडवा आणि आम्हाला द्या. पैठण पासून आंध्र प्रदेशच्या सीमेपर्यंत बंधारे बांधा आणि ते पाणी आम्हाला द्या. या पध्दतीने पाणी रोखले तर आमचा विकास होऊ शकतो. मी वर्तमानपत्रात नुकतीच एक बातमी वाचली, मराठवाड्यात सूक्ष्मसिंचनासाठी 20 कोटी रुपये केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून मिळत आहेत. ही रक्कम वाढवून मिळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. गावांगावातील शेतकऱ्यांनी सूक्ष्मसिंचन करावे, यासाठी आम्ही त्यांना प्रवृत्त करु. खरे तर आपल्या घराच्या पत्र्यावरील पाणी आपल्याच अंगणात अडविले तरी बोअरवेलच्या पाण्याची क्षमतासुध्दा वाढते. जलसंधारण विभाग, जलसिंचन विभाग याद्वारे गोदावरी मराठवाडा विकास महामंडळ आणि इतर महामंडळांना आदेश दिला पाहिजे की, वर अडविले जाणारे पाणी कमी करावे व खाली जाणारे पाणी अडवावे, अर्धवट असलेले प्रकल्प पूर्ण करावेत, नादुरुस्त असलेले प्रकल्प दुरुस्त करावेत. यातील सर्वात महत्वाचा मुद्दा मला असा वाटतो की, जायकवाडी प्रकल्पाचे मुख्य कॅनॉल आणि व सर्व लहान वाहिन्या दुरुस्त करणे गरजेचे आहे. कारण यामधील एकही वाहिनी व्यवस्थित चालत नाही. जे प्रस्थापित शेतकरी आहेत त्यांचे चांगले चालू आहे परंतु सामान्य शेतकऱ्याला पाणी मिळत नाही. तुम्ही माजलगाव तालुक्यामध्ये फिरुन बघा, तेथे तुम्हाला असे दिसेल की, नियोजनाअभावी पाणी सर्वत्र अस्ताव्यस्त पसरलेले असून वाया जात आहे. माझी हात जोडून विनंती आहे की, शासनाला खरोखरच मराठवाड्याचा विकास करायचा असेल तर अशा गोष्टीकडे पाहिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. आता पावसाळा तोंडावर आलेला आहे त्यामुळे यावर्षी तुम्ही जायकवाडीच्या चाऱ्या व कॅनॉल दुरुस्त केल्या पाहिजेत, त्यातील झाडेझुडपे तोडली पाहिजेत. या दृष्टीने नियोजन केले पाहिजे नाहीतर पाणी समोर दिसत असूनही ते शेतकऱ्यांना मिळू शकणार नाही. नियोजनाअभावी अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. शासनाच्या काही योजना खूप क्रांतीकारी आहेत, या योजनांमुळे मराठवाडा व विदर्भाचे सोने होईल ,परंतु त्या फक्त कागदावरच राहतात, हे खरे आहे. असे असले तरी मी या प्रस्तावाला समर्थन देते आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे .....

सूक्ष्मसिंचन योजनेबाबत माझी विनंती आहे की, महिलांच्या बचतगटाकडे ही योजना देऊन कृषी क्षेत्रातील महिलांना नवीन तंत्रज्ञान दिले पाहिजे. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान या वुमेन इन ॲग्रीकल्चरल रिसर्च या केंद्रीय समितीच्या सदस्या आहेत, अशाच प्रकारे महिलांना या कृषी क्षेत्राशी जोडून घेतले पाहिजे. सूक्ष्मसिंचनाचे प्रशिक्षण देऊन ग्रामसभा व बचतगटाच्या माध्यमातून शासनाने महाराष्ट्राचा विकास करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

-------------

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयावर अजून अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. आज आठवडयाचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक सन्माननीय सदस्यांना आपापल्या गावी जायचे आहे. तेव्हा या विषयावरील चर्चा आपण येथेच थांबवावी आणि ही चर्चा पुन्हा मंगळवारी घेण्यात यावी, कारण सोमवारी सकाळी विशेष बैठकीत आंबा पिकाबाबत चर्चा होणार आहे, त्याशिवाय माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा प्रस्ताव सुध्दा आहे.

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज पूर्ण करण्याबाबत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण ही चर्चा मंगळवार, दिनांक 17 एप्रिल 2007 रोजी घ्यावी.

**तालिका सभापती** : आज कामकाजपत्रिकेवरील सर्व कामकाज पूर्ण करावे असे माननीय सभापतींचे निर्देश आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आठवड्याच्या शेवटच्या दिवशी सभागृहाचे कामकाज सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत संपवावयाचे असते असा नियम आहे. वाटल्यास आपण सचिवांना विचारावे.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सभापती महोदय, आठवड्याचा शेवटचा दिवस म्हणून प्रत्येक शुक्रवारी सभागृहाची बैठक सायंकाळी 5.00 वाजल्यानंतर चालता कामा नये असा आपला नियम आहे. वाटल्यास, आपण आपल्या सचिवांना त्याबाबत विचारावे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, ही चर्चा आपण मंगळवारी सकाळी घ्यावी. आज शुक्रवार असल्याने आणि आठवड्याचा शेवटचा दिवस असल्याने सभागृहातील सदस्यांना, मंत्र्यांना देखील आपापल्या गावी जायचे असते ही गोष्ट आपण लक्षात घ्यावी.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : मला आपले म्हणणे मान्य आहे. परंतु माननीय सभापतींचेच निर्देश आहेत की, आजचे कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व कामकाज संपविले गेले पाहिजे. तेव्हा आपली विनंती त्यांच्यापर्यंत पोहोचवून त्यांचे याबाबतचे निर्देश येईपर्यंत आपण थांबले पाहिजे आणि म्हणूनच मी सदस्यांना विनंती करतो की, आपण चर्चेत सहभाग घेऊन भाषण सुरू करावे. ... आता मी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना भाषण सुरू करण्याची विनंती करतो. ...

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी मंगळवारी भाषण करीन ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, सोमवारी आपण आंबा पिका संबंधात चर्चा सकाळी विशेष बैठक घेऊन करणार आहोत तर मग मंगळवारी सकाळी आपण आजची ही चर्चा घ्यावी...

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय सभापतींचे निर्देश येईपर्यंत आपण अशासकीय कामकाज सुरू करावे.

**तालिका सभापती** : आता आपण ही चर्चा पुढे सुरू करू या. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना भाषण करावयाचे आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : होय. पण आपण माझ्या अगोदर सन्माननीय सदस्य श्री.काळे यांना बोलण्यास परवानगी दिली तर हरकत नाही. मी मंगळवारी भाषण करीन.

**तालिका सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.काळे यांनी या प्रस्तावावर भाषण सुरू करावे.

...... 4बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, ठेविले अनंते तैसेचि रहावे या उक्तीनुसार नेहमीच आमच्या मराठवाड्यातील माणसांना, मराठवाडा ही संतांची भूमी आहे असे सांगून मराठवाड्यावर अन्याय होतच असतो. 31 टीएमसी हक्काचे पाणी मराठवाड्याला मिळाले पाहिजे यासाठी खरे म्हणजे यापूर्वी माझी वडील श्री.वसंत काळे यांनी शिक्षक आमदार असतानाही शेतकऱ्यांच्या प्रश्नाविषयी  पाणी परिषदा घेतल्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री.रावते तुळजापूरच्या परिषदेला उपस्थित होते. विकासाच्या प्रश्नावर पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून आम्ही सर्वांनी एकत्र येऊन लढा दिलेला आहे. म्हणूनच मराठवाड्याला त्याच्या हक्काचे 31 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे यासाठी खरे म्हणजे या अर्थसंकल्पामध्ये भरघोस तरतूद व्हायला पाहिजे होती. परंतु आता आपण पाहिले असेल की, पाऊस मोठ्या प्रमाणात झाला आणि उजनी धरणातून किती तरी लाखो क्युसेक्स पाणी वाया गेलेले आहे. हे सोडलेले पाणी खाली गेले. ते कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणामध्ये घेणार नाही म्हणून विरोध दर्शविला होता. म्हणून आमचे म्हणणे आहे की, ठीक आहे. आपल्याकडे जास्त पाणी झाले असेल तर आम्हाला द्या. परंतु त्यासाठी योजना केली पाहिजे. जेणे करून मांजरा धरण आहे त्यात हे पाणी आणता आले तर भविष्यात अनेक सिंचनाचे प्रश्न मार्गी लागणार आहेत. ....

( यानंतर श्री. सरफरे ....4सी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे..

आणि म्हणून भविष्यामध्ये हे 21 टीएमसी पाणी मराठवाडयाला मिळण्यासाठी आपण अर्थसंकल्पामध्ये ठोस तरतूद केली पाहिजे असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. अनेक ठिकाणी आज महाराष्ट्रामध्ये पाऊस चांगला झाला असून सर्व धरणे भरली आहेत. परंतु तरीसुध्दा हे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत गेले पाहिजे, शेवटच्या धरणापर्यंत पोहोचले पाहिजे याकरिता आपण कालवे केले. आज आपण रस्त्याने जातांना पहातो की, अनेक ठिकाणी कालव्यांची दुरुस्ती झालेली नाही, त्यामुळे अनेक ठिकाणी पाणी वाया जाते. त्यामुळे आमच्या मनामध्ये कालवा कालव होते. यापुढील काळात निश्चितपणे कालव्यांची दुरुस्ती झाली पाहिजे. त्याकरिता लागणाऱ्या निधीची तरतूद केली पाहिजे. जर ही धरणे भरली तर त्याचा निश्चितपणे शेतकऱ्यांना लाभ होईल. अशाप्रकारची भरघोस तरतूद या पुढील काळात झाली पाहिजे अशी विनंती करतो व आपण संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री. धोंडीराम राठोड ने नियम 260 के अन्तर्गत मराठवाडा और विदर्भ के सिंचन अनुशेष के बारे में जो प्रस्ताव रखा है, उस पर अपने विचार रखने के लिए मैं खड़ी हूँ. मैं यहां पर विशेष रुप से मराठवाडा के बारे में बात करना चाहूंगी. जब हम बच्चों के कुपोषण की बात करते हैं तो ग्रेड-1, ग्रेड-2, ग्रेड-3 और ग्रेड-4 की बात हमारे सामने आती है. इसी प्रकार से मराठवाडा की जमीन कुपोषित हो गई है, वहां पर फसल के लिए पानी नहीं है. वहां का किसान धूप में पिघलकर मुट्ठी भर अनाज पैदा करता है, उसके सामने आत्महत्या के सिवाय पर्याय नहीं रह जाता. इस सभागृह में आंकड़ों की बात बहुत हो रही है. लेकिन माननीय सदस्य राठोड जी ने सही कहा कि हमारा असली प्रश्न रेड टेपिज्म है. सरकारी कार्यालयों में हमारी फाइलें नहीं सरकती हैं, क्योंकि उन में इच्छा शक्ति का अभाव है. जब तक अधिकारियों में इच्छा शक्ति नहीं होगी, तब तक हमारी अपेक्षाएं पूरी नहीं हो सकती हैं. लेकिन यह काम किस तरह से होगा ? श्री राठोड जी ने कहा कि जानबूझकर यह चीज हो रही है. कम से कम मेरा इस बात से सहमत होना मुश्किल हैं, क्योंकि जहां तक सिंचन विभाग का सवाल है, माननीय मंत्री श्री. अजित पवार के माध्यम से बहुत कुछ नई योजनाओं को मान्यता दी गई है. जहां तक गोदावरी का प्रश्न है, 12 बॅरेजस को मान्यता दी गई है और लोअर दुधना प्रकल्प के लिए निधि उपलब्ध हुई है. 3 साल के लिए यह टाइम बाउन्ड कार्यक्रम दिया गया है. श्री. राठोड जी ने कहा कि जब वे छोटे थे, उस समय जो प्रोजक्ट शुरु हुए थे, 62 साल की उनकी उम्र हो गई है, लेकिन वे प्रोजक्ट आज तक चल रहे हैं. बात कुछ इस प्रकार की है कि आज किसी को भी विश्वास नहीं है कि 3 साल का जो कार्यक्रम दिया गया है, वह पूरा होगा या नहीं, क्योंकि एक शायर ने कहा है :

"तेरे वायदे पर जिये हम तो जानेमन,
खुशी से मर जाते अगर एतबार होता."

सभापति महोदय, कॅनाल्स में जो ब्लॉकेज हो गए हैं, उनको दूर करने की बहुत आवश्यकता है.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : या प्रस्तावावरील अपूर्ण चर्चा सोमवारी घेण्यात येईल, तेव्हा माननीय सदस्यांनी आपले भाषण आता थांबवावे, त्यांनी आपले अपूर्ण भाषण सोमवारी पुन्हा सुरु करावे. तसेच, आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील बाब क्रमांक चौदावरील 1 ते 3 अशासकीय ठराव पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात येतील. सभागृहाची विशेष बैठक सोमवार, दिनांक 16 एप्रिल 2007 रोजी सकाळी 10.00 ते 12.30 या वेळेमध्ये घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता होईल.

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थगि□ होऊ□ सोमवार,दि□□ 16.4.2007 रोजी स□ळी 10.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ सायंकाळी 6 वाजू□ 50 मिनिटां□, सोमवार, दि□□ 16.4.2007 च्या सकाळी 10.00 वाजेपर्य□ स्थगि□ झाली.)

******

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही